चित्रशाळेचा इतिहास

(१८७८ ते १९७३)

[चित्रशाळा संस्थेच्या प्रारंभापासून तिचा अस्त होईपर्यंतचा ९५ वर्षांचा अधिकृत इतिहास]

: लेखक :

रा. प्र. कानिटकर

१९७५

वासुकाका जोशी विश्वस्त निधि, पुणे

चित्रशाळेचा इतिहास

(१८७८ ते १९७३)

[चित्रशाळा संस्थेच्या प्रारंभापासून तिचा अस्त
होईपर्यंतचा ९५ वर्षांचा अधिकृत इतिहास]

: लेखक :

रा. प्र. कानिटकर

१९७५

वासुकाका जोशी विश्वस्त निधि, पुणे

किंमत पाच रुपये

आवृत्ती पहिली
जून १९७५

प्रकाशक
दा. त्र्यं. जोशी
सेक्रेटरी,
व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट
चित्रशाळा भवन, खोली नं. ४५
लक्ष्मी रोड, पुणे - ३०

मुद्रक
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे ४११०३०

एकमेव विक्रेते
गांधी साहित्य भांडार
चित्रशाळा भवन,
लक्ष्मीरोड, पुणे ३०.

विज्ञापना

चित्रशाळा छापखाना व व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट यांच्याबद्दल व त्यांच्या संबंधाबद्दल चित्रशाळेचे अनेक संबंधी व स्नेही विचारणा करीत असतात. त्या सर्वांना पृथक् पृथक् उत्तरे देणे अगर त्यांना कागदपत्रे दाखविणे हे जवळजवळ अशक्यच आहे. चित्रशाळेचे मालक वासुकाका जोशी यांच्या मृत्यूनंतर चित्रशाळेचा जो इतिहास घडला तो कागदपत्रांसह लोकांच्या पुढे मांडावा, या उद्देशाने हे लहानसे पुस्तक तयार केले आहे. ज्यांना आस्था, जिज्ञासा व औत्सुक्य असेल त्यांनी हा इतिहास तपशीलवार वाचावा आणि त्यावरून त्यांना जे काय निष्कर्ष काढावयाचे असतील ते त्यांचे त्यांनी काढावे. आम्ही फक्त त्यांच्यापुढे इत्थंभूत इतिहास ठेवला आहे.

हा इतिहास तुटक व विशिष्ट कालखंडापुरता मर्यादित होऊ नये म्हणून चित्रशाळेच्या स्थापनेपासून ९५ वर्षांची संपूर्ण हकीगत थोडक्यात देण्यात आली आहे. कालक्रमानुसार परिस्थिती बदलते, ध्येये बदलतात, व्यक्ती व व्यक्तींचे कर्तृत्व म्लान होत जाते. आणि शेवटी जर काही शिल्लक उरत असेल तर निरपेक्षपणे केलेले कार्य. चित्रशाळेने राष्ट्रीय आंदोलनात थोडी बहुत कामगिरी केली हे कोणालाही नाकबूल करता येणार नाही. चित्रशाळेचे संस्थापक विष्णुशास्त्री चिपळूणकर हे ज्वलज्जहाल वृत्तीचे होते व वासुकाका जोशी यांची राष्ट्रीय कामगिरी सर्वविश्रुत आहे. ज्या वेळी वासुकाका निधन पावले त्या वेळी हिंदुस्थान स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर उभा होता व आंदोलनाचे पर्व संपत आले होते. व भारतीय जनता त्याच्या परिणामांची मार्गप्रतीक्षा करीत होती.

१९४४ साली श्री. देवगिरीकर स्थानबद्धतेतून सुटून आल्यावर पुढे काय करावे हे कोणालाच सुचत नव्हते. कारण चळवळीची अवस्था संपली होती आणि येणारे स्वराज्य कसे स्थिरावता येईल याची जनतेला चिंता पडली होती. आम्हीही त्याच विवंचनेत होतो. राजकीय प्रश्न संपले होते आणि जातीय प्रश्नांनी उचल खाल्ली होती. पाकिस्तान निर्माण होणार होते, संस्थाने विलीन होणार होती व कालचे चळवळे उद्याचे राज्यकर्ते होणार होते. अशा वेळी समाज-परिवर्तनाचे कार्य हे विधायक स्वरूपाचेच रहाणार होते, यात वाद नव्हता. अशा या विधायक कार्यात चित्रशाळेने अंशतः हातभार लावला व सुबुद्ध जनतेला एक जागतिक दृष्टीकोण उपलब्ध करून दिला.

प्रकाशने असोत, छापखाना असो, मासिके असोत, या सर्वांचा उद्देश जागृती करणे हाच असतो. शास्त्रीबुवांनी निबंधमालेच्या रूपाने, वासुकाकांनी साहित्याच्या रूपाने व पुढील पिढीने प्रकाशनांच्या रूपाने ही जागृती केली. वास्तविकपणे जागृतीचे कार्य हे कधीच संपत नसते. नवीन क्षितिजे दिसतात, नवीन समस्या पुढे उभ्या रहातात व नवीन परिस्थितीला तोंड द्यावे लागते. या सर्वांना आम्ही अपुरे पडलो असलो तरी अप्रामाणिक ठरलो नाही, येवढे समाधानाचे उद्गार जनतेने काढले तरी आम्ही स्वतःला कृतकृत्य समजू. वरील विवेचनाचा असा अर्थ नाही की जी संस्था शास्त्रीबुवांनी काढली तिचे कार्य आता संपले आहे. ते कार्य अधिक शास्त्रीय पद्धतीने व समयोचित प्रकाराने करता यावे म्हणून आतापर्यंत आम्ही प्रयत्न केले आणि छापखाना थांबला असला तरी नव्या कामाचा अंकुर जोरात फोफावणार आहे. ते कार्य योग्य, लायक व कर्तबगार व्यक्तींच्या हातून व्हावे अशी आमची प्रार्थना आहे.

चित्रशाळेचे एक ऋणानुबंधी व 'चित्रमय जगत्' चे माजी संपादक श्री. रा. प्र. कानिटकर यांचा चित्रशाळेशी ४० वर्षांचा संबंध आहे. ते सूक्ष्म अभ्यासू आहेत. काळजीपूर्वक वाचन करणारे आहेत आणि संयमाने लिहिणारे आहेत. चित्रशाळेच्या इतिहासाचे हे काम आम्ही त्यांच्यावर सोपविले व त्यांनी कोठेही तोल जाऊ न देता अत्यंत संयमाने जसा घडला तसा इतिहास वाचकांच्यापुढे मांडला. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहो.

या सर्व निवेदनात काही व्यक्तींचा उल्लेख करण्याचे राहून गेले असल्यास त्यांनी त्याबद्दल क्षमा करावी. विशेषतः शंकरराव जोशी, हरिभाऊ तुळपुळे,


अप्पासाहेब खाडिलकर, रामभाऊ जोशी, विष्णुपंत जोशी व दामुअण्णा रानडे यांच्यासंबंधी अधिक विस्ताराने लिहावयास पाहिजे होते. पण तिथेही संकोच, संयम आणि काटकसर यांचा पगडा मनावर बसला आणि जरूरीपुरतेच त्यांचे नामनिर्देश झाले हे सांगणे आमचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे कोणावरही अन्याय होऊ नये ही आमची दृष्टी होती. म्हणून आमच्या दृष्टीतून काही राहिलेला मजकूर 'पुरवणी' म्हणून पुस्तकाच्या शेवटी जोडला आहे. वाचकांनी या पुस्तकाचा एक संदर्भ ग्रंथ या दृष्टीने उपयोग करावा व काही चुका राहिल्या असतील तर त्या आमच्या नजरेस आणण्याची कृपा करावी. त्यांचा आम्ही जरूर परामर्श घेऊ.

पुणे,
ता. ५–६–१९७५.

त्र्यं. र. देवगिरीकर
वि. अ. पटवर्धन
दा. त्र्यं. जोशी
[विश्वस्त, व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट]


अनुक्रमणिका

चित्रशाळेचा इतिहास



कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर

चित्रशाळेचे आद्य संस्थापक



कै. वासुकाका जोशी

चित्रशाळेचे संवर्धक व मालक

प्रकरण पहिले

पूर्वपीठिका

" मराठी भाषेचे शिल्पकार " विष्णुशास्त्री चिपळूणकर हे चित्रशाळेचे आद्य संस्थापक होत. त्यांचे नाव चित्रशाळेशी कायमचे निगडित झाले आहे, याचा कोणालाही अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही. चित्रशाळेची स्थापना इ. स. १८७८ सालच्या ऑगस्ट महिन्यात झाली. म्हणजे १९७४ च्या ऑगस्टमध्ये चित्रशाळेला ९६ वर्षे पूर्ण झाली आहेत. चित्रशाळेची मूळ सुरुवात ऐतिहासिक पुरुषांची चित्रे छापण्याच्या कल्पनेपासून झाली. यासंबंधी चित्रशाळेचे जनक कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी " निबंधमाले "च्या सहाव्या वर्ष-अखेरीस ७२ व्या अंकात पुढील माहिती दिली आहे:– " आमच्या वाचकांपैकी कित्येकांस माहीत असेलच की, काव्येतिहासाच्या* तिसऱ्या अंकात नाना फडणविसाची लहानशी रंगीत तसबीर घातली होती, तो चित्रशाळेचा आरंभ होय. तेव्हापासून सुधारणा होता होता हल्ली रामपंचायतन, शिवपंचायतन येथपर्यंत मजल येवून ठेपली आहे. या तसबिरीचे काम कोणत्या तऱ्हेचे झाले आहे हे आम्ही स्वतः सांगण्याची आज गरजच उरली नाही. हजारो प्रती उडून दूरदूरच्या गावांहूनही त्यांजविषयी प्रतिदिवशी मागण्या येत आहेत. या उद्योगाच्या संबंधाने आमच्या वाचकांस विशेषेकरून एवढीच एक गोष्ट कळवावयाची आहे

---

* जुनी काव्ये, इतिहास, बखरी व अप्रसिद्ध साधने प्रसिद्ध करण्यासाठी हे मासिक १८७८ साली काढण्यात आले. या मासिकाची मूळ कल्पना का. ना. साने यांची. त्यांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांची संमति घेऊन ज. बा. मोडक यांच्या सहकार्याने हे मासिक सुरू केले. मराठी कवितेचे संपादन मोडक करीत व संस्कृत कवितेचा विभाग शास्त्रीबुवांकडे होता. महाराष्ट्र इतिहास विभाग साने यांनी स्वतःकडे घेतला होता. बुडत असलेल्या हस्तलिखितांचा व जुन्या ग्रंथांचा जीर्णोद्धार हे या मासिकाचे उद्दिष्ट असल्यामुळे त्याच्या ११ वर्षांच्या कारकीर्दीत २२ बखरी, ५०१ पत्रे, २५ संस्कृत प्रकरणे व अनेक मराठी काव्ये प्रसिद्ध झाली. मासिकाचा शेवटचा अंक डिसेंबर १८८९ मध्ये प्रसिद्ध झाला.

की, आमच्या इतिहासप्रसिद्ध पुरुषांच्या मूर्ति चिरकाळ रहाव्या एवढ्याचकरिता मुळी हा कारखाना आम्ही काढला." (डिसेंबर १८८०)

शास्त्रीबुवांच्या काळी पुण्यातील नाना फडणिसांच्या बेलबागेतील दिवाणखान्यात युरोपियन चित्रकारांनी काढलेली मोठमोठी तैलचित्रे लावलेली होती. त्यांत नाना फडणिसांचे एक भव्य तैलचित्र एका इंग्रज चिताऱ्याने काढले होते. हा चित्रकार पेशव्यांच्या दरबारातील इंग्रज वकील सर चार्लस मॅलेट याच्याबरोबर आला होता. त्या तैलचित्राची नक्कल पाणरंगात तयार करून हे चित्र इ. स. १८८४ साली शास्त्रीबुवांच्या निधनानंतर २ वर्षांनी चित्रशाळा छापखान्यात शिळेवर अनेक रंगांत व मोठ्या आकारात छापण्यात आले. त्या वेळी ह्या तसबिरीची किंमत ५ रुपये ठेवण्यात आली होती. हे चित्र खूप मोठे म्हणजे सुमारे ४ फूट उंचीचे व अडीच फूट रुंदीचे आहे. आज ९० वर्षांनंतरसुद्धा त्या चित्रांतील रंग यत्कचिंतही फिके झालेले नाहीत. पहिल्याप्रमाणेच चकचकीत व तजेलदार आहेत. जणू काय, आजच हे चित्र छापले आहे, इतका त्यांत ताजेपणा आहे. या चित्राच्या पाठोपाठ श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांचेही तेवढ्याच आकाराचे भव्य चित्र तशाच पद्धतीने नक्कल करून चित्रशाळेने छापले होते. तेही मूळ बेलबागेतलेच होते.

शास्त्रीबुवा हयात असताना त्यांनी केरोपंत छत्रे, डॉ. विश्राम घोले इत्यादी तत्कालीन प्रसिद्ध पुरुषांच्या तसबिरी काढल्या होत्या. पण त्यांना मागणी येईना, तेव्हा रावजी श्रीधर गोंधळेकर यांनी शास्त्रीबुवांना देवादिकांची चित्रे काढण्यास सुचविले. चित्रशाळेचे मूळ कल्पक फोटो झिंकोमधील ड्राफ्ट्स्मन बाळकृष्णपंत जोशी यांनाही ही कल्पना पटली व ते त्या उद्योगाला लागले. औंधकरांच्या पदरी असलेल्या भिवा सुतार नावाच्या एका उत्कृष्ट चिताऱ्याने रामपंचायतनाचे एक मोठे रंगीत चित्र औंधकरांना तयार करून दिले होते. त्या चित्राचा फोटो पुण्याचा एक फोटोग्राफर राजाराम रंगोबा याने १८७४ साली काढून आणला होता. तो बाळकृष्णपंतांच्या पाहण्यात आला. त्यांनी लगेच त्यावरून रंगीत चित्र तयार करून ते चित्रशाळेत छापले. हे चित्र इतके उत्कृष्ट व आकर्षक झाले होते की, एक महिन्याच्या आतच त्याच्या २००० प्रती हातोहात खपल्या. या रामपंचायतनाच्या चित्राने चित्रशाळेचा पाया घातला व तिला नाव मिळवून दिले. चित्रशाळेचे मूळ उद्दिष्ट कोणते होते व कोणत्या हेतूने

चित्रशाळा जन्मास आली, हे कळण्यासाठी ही हकीगत मुद्दाम येथे दिली आहे.

काशीनाथ नारायण साने, जनार्दन बाळाजी मोडक व शंकर तुकाराम शाळिग्राम यांच्या सहकार्याने शास्त्रीबुवांनी 'काव्येतिहाससंग्रह' नावाचे जे मासिक १८७८ साली सुरू केले होते त्यात ऐतिहासिक लेखांसोबत ऐतिहासिक पुरुषांच्या तसबिरी घालण्याची मूळ योजना होती. ही योजना शाळिग्राम यांच्यामुळे अमलात येऊ शकली. त्यांचे स्नेही बाळकृष्ण वासुदेव जोशी हे सरकारी फोटो झिंकोत ड्राफ्ट्स्मन होते व त्यांचा नकाशे काढण्याचा व्यवसाय होता. तथापि ते उत्तम चित्रेही काढीत असत. शास्त्रीबुवांनी त्यांना प्रथम नाना फडणिसांची तसबीर काढण्यास सांगितले. बाळकृष्णपंतांना फोटो झिंकोच्या कचेरीत नकाशे कसे छापतात हे माहीत होते. तेव्हा नकाशांप्रमाणे निरनिराळ्या रंगांत शिळांवर चित्रे छापता येतील, असे त्यांनी शास्त्रीबुवांस कळविले. तेव्हा ही चित्रे छापण्याचा कारखाना काढण्यास प्रारंभी किती पैसे लागतील याची त्यांनी चौकशी केली. त्यावरून बाळकृष्णपंतांनी एक विलायती प्रेस, पाच सात शिळा, कागद, रंग वगैरे मिळून ४०० रुपयांचा अंदाज दिला. ही रक्कम फारशी नाही व चित्रे छापून काढली असता त्यांची विक्री साधारण बरीच होईल, शिवाय "काव्येतिहाससंग्रहा"त चित्रे घालता येतील, असा विचार करून शास्त्रीबुवांनी बाळकृष्णपंतांना तितकी रक्कम देण्याचे ठरविले आणि पुढे लवकरच शिळा प्रेसचे सामान मुंबईहून आले आणि बाळकृष्णपंतांनी कामास सुरुवात केली. चित्रशाळेच्या उत्पत्तीची ही अशी हकीगत आहे. सुरुवातीला विष्णुशास्त्री चिपळूणकर, बाळकृष्णपंत जोशी व शंकर तुकाराम शाळिग्राम अशी तिघांची भागीदारी होती.

शास्त्रीबुवांच्या हयातीत वासुदेव गणेश ऊर्फ वासुकाका जोशी यांचा चित्रशाळेशी संबंध आला नसला तरी "निबंधमाले"च्या निमित्ताने शास्त्रीबुवांशी त्यांचा परिचय घडून आला होता. शास्त्रीबुवांना निबंधमालेच्या कामासाठी कोणी मदतनीस हवा होता. तेव्हा त्यांना त्र्यंबकराव जोशी यांनी वासुकाकांचे नाव सुचविले. हे त्र्यंबकराव जोशी कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या 'नेटिव्ह प्रेस रिपोर्टर'च्या ऑफिसात काम करीत होते. त्यांना वासुकाका माहीत होते. त्या वेळी वासुकाका जोशी इंजिनियरिंग कॉलेजच्या ॲग्रीकल्चरल क्लासात शिकत होते तरी त्यांना भरपूर वेळ होता व असल्या कामाची आवड

होती. हे त्र्यंबकरावांना ठाऊक असल्यामुळे त्यांनी शास्त्रीबुवांपाशी वासुकाकांची शिफारस केली. तेव्हा वासुकाका 'निबंधमाले' चे काम पाहू लागले. निबंधमालेच्या अंकांचा हिशेब पाहता त्यांना असे दिसून आले की, ज्या वर्गणीदारांची नावे पटावर आहेत पण ज्यांनी वर्गणी भरलेली नाही त्यांना सुद्धा कित्येक अंक मोफत जातात. तेव्हा वासुकाकांनी काटेकोर तपासणी करून मोफत जाणारे अंक बंद केले व १००० ऐवजी ६०० च अंक पाठविले. निबंधमालेच्या या कामाव्यतिरिक्त वासुकाकांचा शास्त्रीबुवांशी न्यू इंग्लिश स्कूलच्या बाबतीत पुढे पुष्कळ संबंध आला होता व त्यांचा परिचय वाढला होता.

शास्त्रीबुवांच्या संस्थांचे व्यवस्थापक होण्याची वासुकाकांची कशी व केवढी योग्यता होती, हे लक्ष्मणराव चिपळूणकर यांनी आपल्या "विष्णुशास्त्री चिपळूणकर" चरित्रात पुढीलप्रमाणे दिग्दर्शित केले आहे : "वासुदेव गणेश जोशी हे हल्लीचे चित्रशाळेचे मॅनेजर आहेत. त्या वेळी या गृहस्थांचे वय अगदी लहान म्हणजे विशीतच असून ते ॲग्रीकल्चरल क्लासात शिकत होते, पण विष्णुशास्त्री यांच्या सहवासाने त्यांच्या मनांत सरकारी नोकरीविषयी अप्रीती व स्वतंत्र उद्योगाविषयी हौस ही उत्पन्न झाली असल्यामुळे त्यांनी किताबखान्याचे नवीन काम मोठ्या उत्सुकतेने पत्करले. हे घरचे खाऊन पिऊन बरेच सुखी असल्यामुळे मला अमुक पगार द्या किंवा हिस्सा द्या वगैरे काही एक न ठरविता ते एकदम उद्योगास लागले. विष्णुशास्त्री यांच्या सहवासाने, त्यांच्या लेखांनी व त्यांच्या स्वतःच्या उदाहरणाने ज्यांच्या अंगी साहस, स्वतंत्र धंदा करण्याबद्दल आवड व सतत निःसीमभावाने उद्योग करणे वगैरे गुण आले त्यांमध्ये रा. जोशी यांचा नंबर पहिलाच लागेल! (पृ. १९८)

निबंधमाला व न्यू इंग्लिश स्कूल यांच्या निमित्ताने शास्त्रीबुवांशी वासुकाकांचा सहा-सात वर्षे घनिष्ठ संबंध आला होता. त्यामुळे शास्त्रीबुवांच्या निधनानंतर किताबखान्याची व्यवस्था वासुकाकांकडे आली. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यानंतर त्यांचे बंधू लक्ष्मणराव, बाळकृष्णपंत जोशी व शंकर तुकाराम शाळिग्राम हे त्रिवर्ग मालक झाले. या तिघांपैकी बाळकृष्णपंत व शाळिग्राम हे हिशेबाच्या बाबतीत अव्यवस्थित असल्यामुळे लक्ष्मणरावांनी वासुकाकांना चित्रशाळेत बोलावले व व्यवस्थापकाचे काम करण्यास सांगितले. अशा प्रकारे वासुकाका १८८३ च्या सुमारास चित्रशाळेत दाखल झाले आणि तेव्हापासून अखेरपर्यंत

म्हणजे ६० वर्षे त्यांनी चित्रशाळा चालविली व ऊर्जितावस्थेस आणली. प्रारंभी चित्रशाळा कर्जात होती. १८८४ साली बाळकृष्णपंतांचा संबंध तोडण्यात आला व तीन वर्षांनी शाळिग्रामांचीही भागीदारी संपुष्टात आली. या दोघांना मालकी हक्काबद्दल प्रत्येकी ३०० रुपये देण्यात आले. हे दोघे गेल्यावर लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर, वासुदेव गणेश जोशी व विनायक त्र्यंबक चिपळूणकर हे तिघे चित्रशाळेचे मालक झाले. १९०० साली या तिघांत भागीदारीचा दहा वर्षांचा करार झाला. त्यांत लक्ष्मणराव सहा आणे व बाकीचे दोघे प्रत्येकी पाच आणे अशी भागी ठरली.

छापखान्याच्या जागेची मालकी

इ. स. १९०५ साली चित्रशाळा छापखान्याची सदाशिव पेठेतील जागा छापखान्याच्या मालकीसह वासुकाका जोशी यांच्या एकट्याच्या मालकीची झाली. तोपर्यंत या जागेचे अनेक मालक झाले. पुष्कळदा ती गहाण पडली व लिलावातही निघाली. ही जागा इ. स. १८१७ साली बखळवजा होती. राघो महादेव हा या जागेचा मूळ मालक होता. त्याने त्या साली ती जागा सगाजी पाटलाला ३००१ चांदवडी रुपयांस विकली. पुढे १८७१ मध्ये या जागेवर इमारत बांधली गेली. या इमारतीचे अनेकदा हस्तांतर होऊन १८८८ साली रा. ब. सीताराम विश्वनाथ पटवर्धन यांच्याकडे ती जागा इमारतीसह ताबेगहाण म्हणून आली. १८९० मध्ये तिचा लिलाव झाला, पण एक महिन्यातच लिलाव घेणारा नंदलाल मारवाडी याने ती पटवर्धन यांना विकली व पटवर्धन या जागेचे आठवे मालक झाले. पटवर्धनांची ही जागा विकत घेऊन तेथे चित्रशाळा आणावी, असे त्या वेळचे चित्रशाळेचे त्रिवर्ग मालक (१) लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर. (२) वासुदेव गणेश जोशी व (३) विनायक त्र्यंबक चिपळूणकर यांनी ठरविले, या वेळपर्यंत चित्रशाळा नारायण पेठेत डोलकर आळीत होती. १८९२ साली पटवर्धनांचा हा वाडा ८००० रुपयांस घेण्याचा करार केला. तथापि १८९६ साली दुसरा करार करून त्याची किंमत ८७७० रुपये ठरविण्यात आली. पण या त्रिवर्ग मालकांजवळ एवढी रक्कम नसल्यामुळे त्यांनी मुंबईचे सुप्रसिद्ध नागरिक कै. डॉ. अण्णा मोरेश्वर कुंटे यांच्या पत्नी गं. भा. सरस्वतीबाई कुंटे यांच्याकडून ९,००० रुपये घेऊन हा वाडा त्यांच्याकडे गहाण टाकला व

सीतारामपंत पटवर्धन यांची रक्कम देण्यात आली. हे ताबेगहाणखत ता. १२–११–१८९६ रोजी नोंदविण्यात आले. या गहाणखतावर साक्षीदार म्हणून लो. टिळकांची सही आहे. हा अस्सल दस्तऐवज आज पुण्यांतील प्रसिद्ध वकील श्री. रघुनाथ महादेव कुंटे यांच्या संग्रही आहे. सरस्वतीबाई कुंटे यांच्याबरोबर चित्रशाळेसंबंधी जेव्हा करार झाला त्या वेळी वरील त्रिवर्गाकडे चित्रशाळेची मालकी होती. पुढे ता. १२–६–१९०५ रोजी ही भागीदारी तोडण्यात येऊन वासुकाकांनी सर्व कर्जासुद्धा चित्रशाळेची मालकी स्वतःकडे घेतली. मालकी हक्काबद्दल लक्ष्मणराव व विनायकराव या दोघा भागीदारांना अनुक्रमे रु. ११५०० व रु. ४,००० देण्यात आले व वासुकाका चित्रशाळेच्या मालकीबरोबर २५,००० रुपयांच्या कर्जाचे मालक झाले. प्रथम चित्रशाळेच्या इमारतीवर जो ९,००० रुपयांचा कर्जाचा बोजा होता त्याची विल्हेवाट लावण्यासाठी त्यांनी घरचे सोनेनाणे विकून ता. १८–१०–१९०५ रोजी यशवंत अण्णा कुंटे यांना व्याजाव्यतिरिक्त ९,००० रुपये रोख देऊन त्यांच्याकडे गहाण असलेली चित्रशाळेची इमारत सोडविली व ते चित्रशाळेचे एकटे निर्वेध मालक झाले.

वासुकाका मालक झाले

वासुकाकांनी लक्ष्मणराव व विनायकराव यांची भागीदारी तोडून जेव्हा स्वतःकडे चित्रशाळेची मालकी १९०५ साली घेतली तेव्हा केलेल्या करारनाम्यात पुढील विधान आढळतेः– “रा. वासुदेव गणेश जोशी हे चित्रशाळेतील कर्जाची वगैरे वाट लावून आपलाही हक्क न ठेवता सर्व चित्रशाळा छापखान्याचा सार्वजनिक ट्रस्ट करून देणार अशा समजुतीने ही व्यवस्था केली आहे.”

यावरून चित्रशाळेची मालकी आपल्यालाच वंशपरंपरा मिळावी अशी वासुकाकांची यत्किंचितही स्वार्थबुद्धी नव्हती. उलट, या संस्थेचे सार्वजनिक विश्वस्तनिधीत रूपांतर करावे असा आपल्या मृत्यूपूर्वी चाळीस वर्षे वासुकाकांनी संकल्प केला होता असे दिसून येते. वासुकाकांच्या निःस्वार्थीपणाचा व विशाल दृष्टीचा यावरून प्रत्यय आल्याखेरीज राहात नाही.

प्रारंभी शिक्षण खात्याचे त्या वेळचे सरकारी अधिकारी रा. ब. सीताराम विश्वनाथ पटवर्धन यांच्यामुळे चित्रशाळेला अनेक कामे मिळू लागली. त्यात

सरकारी मोडी पुस्तकांचे मोठे टेंडर मिळाले. हे काम फार कठीण होते. पण वासुकाकांनी स्वतः १६–१६ तास काम करून टेंडर पूर्ण करून दिले. त्या वेळी चित्रशाळेचे शिळाप्रेसचे काम उत्तम निघत असे व चित्रांच्या बाबतीत चित्रशाळेने लौकिक मिळविलेला होता. तोपर्यंत चित्रशाळेत टाईप नव्हता. त्यामुळे चित्रशाळेतर्फे निघत असलेले "शालापत्रक" मासिक आर्यभूषण छापखान्यातून छापून आणीत.

पुढे हळूहळू चित्रशाळेत छपाईचे काम वाढले. तेव्हा वासुकाकांनी आपले पुतणे शंकर नरहर जोशी यांना मुंबईहून बोलावून घेतले व त्यांना चित्रशाळेचे मॅनेजर केले. ते मुंबईला व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल संस्थेत शिकत होते. ते चित्रशाळेत प्रविष्ट झाले तेव्हा चित्रशाळेला सरकारी कामे भराभर मिळत होती व तिची प्रगती होत होती.

चित्रशाळेत छापलेली देवादिकांची चित्रे लोकांना फार आवडली होती व त्यांना सतत मागणी असे. चित्रशाळेत छापलेल्या चित्रांबद्दल लोकमत काय होते याचा एक मासला म्हणून न. चिं. केळकरांच्या आत्मचरित्रातील पुढील माहिती वाचकांना मनोरंजक वाटेल. केळकर आपल्या "गतगोष्टी"त लिहितातः– "सुमारे १८८२ साली पुण्याच्या चित्रशाळेतील तसबिरी मिरजेस प्रथमच आल्या. त्यांतील रामपंचायतन हे चित्र फारच लोकप्रिय होते. या तसबिरी दुकानात लावलेल्या पहावयास मिळत. त्या तसबिरी पहात बसणे ही माझी भारीतली भारी करमणूक होती." (पृ. ७३)

प्रारंभी चित्रशाळेला जी कामे मिळत होती ती पुढे मिळेनाशी झाली. सरकारी शिक्षण खात्याचा चित्रशाळेवर रोष झाला. त्याचे कारण वासुकाकांचा लोकमान्य टिळकांशी असलेला स्नेहसंबंध व त्यांची राष्ट्रीय वृत्ती. यामुळे सरकारी कामे येईनाशी झाली. वासुकाकांचा क्रांतिकारकांशी संबंध असल्याच्या संशयावरून चित्रशाळा सरकारी अवकृपेला बळी पडली. चित्रशाळेचे नाव काळ्या यादीत समाविष्ट झाले, पण वासुकाकांनी आपली राष्ट्रीय वृत्ती सोडली नाही व ते त्यानंतर सरकारी काम मिळविण्याच्या फंदात पडले नाहीत.

१८८७ पर्यंत चित्रशाळेत एक मोठे लिथो मशीन (शिळा प्रेस) होते व बासुकांनी ४० हजार प्रतीचे मोडी पुस्तकांचे जे काम मिळविले होते ते याच मशीवर पुरे केले. चित्रशाळेत छापलेले पहिले पुस्तक म्हणजे लोकहितवादीकृत

" ऐतिहासिक गोष्टी " हे होय. ते किताबखान्याकरिता १८८४ साली शिळेवर छापले. चित्रशाळेत पुढे टाईप आला व आणखी काही सुधारणा झाल्या. त्याच वेळी विलायती पत्रांतून फोटोंचे ब्लॉक्स येऊ लागले. तेव्हा हा धंदा शिकून येण्यासाठी वासुकाकांनी आपले चिरंजीव रामभाऊ यांना १९०५ साली इंग्लंडला पाठविले. पण त्यापूर्वीच चित्रशाळेत फोटो काढण्याचे काम सुरू झालेले होते. चित्रशाळा फोटो स्टुडिओ त्या काळी फार नावाजला होता. फोटोग्राफीच्या या व्यवसायात चित्रशाळेने नाव मिळविले होते. रामभाऊ जोशी विलायतेहून परत आल्यावर त्यांनी चित्रशाळेत ब्लॉकमेकिंगचे खाते सुरू केले त्यांचे ब्लॉक प्रारंभापासूनच किती उत्तमोत्तम होत होते, हे " चित्रमय जगत् "ची पहिल्या वर्षाची फाईल पाहिली असता कळून येईल.

चित्रशाळा सार्वजनिक संस्था बनली

वासुकाका जोशी हे चित्रशाळेचे संवर्धक व मालक या नात्याने केवळ छापखाना चालविणारे धंदेवाईक नव्हते. ते विविध व्यवसायी व अनेक क्षेत्रांत काम करणारे होते. पुण्यातील एक चळवळे गृहस्थ म्हणून ते त्या काळी ओळखले जात. लो. टिळकांशी त्यांचा दाट स्नेह होता. " केसरी "शी त्यांचा निकट संबंध होता. इतका की, प्रारंभी " केसरी "च्या संपादकांचे पगार चित्रशाळेमार्फत देण्यात येत असत. वासुकाका अनेक सार्वजनिक चळवळींत भाग घेत असत. वासुकाकांच्या सार्वजनिक सेवेची व कार्याची साद्यंत हकीगत त्र्यं. र. देवगिरीकर यांनी लिहिलेल्या " वासुकाका जोशी आणि त्यांचा काळ " या ग्रंथांत आली आहे. हे उद्बोधक, माहितीपूर्ण व विस्तृत चरित्र वाचले असता वासुकाकांनी आपल्या दीर्घायुष्यात केवढी महत्त्वाची कामगिरी केली होती याची यथार्थ कल्पना येईल. पंडिता रमाबाई, पंचहौद मिशनमधील चहा-बिस्किट प्रकरण, क्रीडाभुवनातील दंगल, बापट प्रकरण, दयानंद सरस्वतींची मिरवणूक, नेपाळ प्रकरण, पैसाफंड काच कारखाना इत्यादी अनेक सार्वजनिक चळवळींशी वासुकाकांचा संबंध होता. ते इंग्लंड-अमेरिकेप्रमाणे चीन-जपानलाही जाऊन आले होते.

टिळकयुगातील क्रांतिकारकांशी त्यांचा संबंध होता. पुण्यातला पहिला बॉंब चित्रशाळेत तयार झाला होता, हे किती जणांस माहीत असेल ! सेनापती बापट

व कानडेशास्त्री यांच्याप्रमाणेच बॉंब व पिस्तूल यांच्याशी वासुकाकांचा परिचय होता. पण तो टिळकयुगात आणि दडपशाहीच्या काळात होता. पुढे वासुकाका जोशी महात्मा गांधींचे अनुयायी होताच ते अहिंसेचे कट्टे पुरस्कर्ते व सत्याग्रहाचे उपासक बनले. त्याचप्रमाणे कॉंग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते झाले. कॉंग्रेसचे कार्य व गांधीवादाचा प्रसार हे त्यांनी आपले जीवितध्येय मानले व "चित्रमय जगत्" मासिकाच्या द्वारा त्यांचा एकनिष्ठेने प्रचार केला. "नवा काळ", "लोकशक्ति" व बॅ. बॅप्टिस्टा यांचे "ईस्ट इंडियन्" या वृत्तपत्रांच्या सुरुवातीच्या काळात वासुकाकांनी त्यांना बहुमोल साहाय्य केले होते. कॉंग्रेससाठी वासुकाकांनी पुष्कळ झीज सोसली आहे. कॉंग्रेसचे कोणतेही काम असो, वासुकाका मदत करण्याला पुढे येत. कायदेभंगाची पहिली सभा चित्रशाळेकडे असलेल्या चिटगुप्पीच्या वाड्यात भरली होती व १९३२ साली कायदेभंग करून वासुकाका ७७ व्या वर्षी तुरुंगात गेले होते. तत्पूर्वी १९२१ साली दारू दुकानावर पिकेटिंग केल्या-बद्दल त्यांच्यावर खटला झाला होता व १९२२ मध्ये मुळशी सत्याग्रहात त्यांना शिक्षा झाली होती. अशा रीतीने वासुकाकांचे जीवन बहुविध व बहुरंगी होते. त्यांचे जीवन म्हणजे महाराष्ट्राचा पन्नास वर्षांतील प्रत्यक्ष इतिहासच होय.

वासुकाकांना क्रांतिकारकांबद्दल सहानुभूती वाटत होती हे वर सांगितलेच आहे. रँडशाहीच्या काळात त्यांनी अनेक क्रांतिकारकांना गुप्तपणे साहाय्यही केले होते. ते क्रांतिकारकांना व सरकारविरुद्ध गुप्त कारस्थाने करणारांना आश्रय देत असत. १९३० ते १९४२ या राष्ट्रीय आंदोलनाच्या काळात त्यांनी अनेक देशभक्तांना पुष्कळ मदत पोचविली होती. या काळात म. गांधी, सरदार पटेल, राजाजी, जमनालाल बजाज इत्यादी अनेक पुढाऱ्यांबरोबर वासुकाकांनी विशेष स्नेह संपादन केला होता. राजगोपालाचारी तर त्यांच्या घरी काही दिवस राहिले होते, तर महात्मा गांधी वासुकाकांच्या आहारविहाराची व प्रकृतीची चौकशी करीत. एकदा त्यांच्या समाचारासाठी गांधीजींनी महादेवभाईंना खास पाठविले होते. वासुकाकांच्या मृत्यूनंतर म. गांधींचा जो संदेश आला होता त्यात त्यांनी वासुकाकांच्या स्वत्वनिवृत्तीबद्दल गौरवोद्गार काढले होते.

वासुकाकांनी चित्रशाळा कशी वाढविली ?

वासुकाकांच्या कर्तृत्वामुळे, त्यांच्या सार्वजनिक कार्यामुळे व लो. टिळक,

हरिभाऊ आपटे, चिं. वि. वैद्य, सी. के. दामले. शि. म. परांजपे, बाबासाहेब परांजपे, कृ. प्र. खाडिलकर, वीर वामनराव जोशी, म. रा. बोडस, राजवाडे प्रभृतींच्या निकट संबंधामुळे वासुकाकांच्या हयातीत चित्रशाळा ही सार्वजनिक व राष्ट्रीय संस्था बनली होती. चित्रशाळा हा केवळ छापखाना राहिला नव्हता. पुण्यात त्या वेळी अनेक लहानमोठे छापखाने होते, पण ते नुसते छापखानेच होते. चित्रशाळेप्रमाणे कोणालाही सार्वजनिक संस्थेचे स्वरूप नव्हते. 'केसरी' प्रमाणे चित्रशाळा ही पुण्यातील महत्त्वाची सार्वजनिक संस्था बनली असल्यामुळे देशातील व परदेशातील अनेक व्यक्ती तेथे येत. चित्रशाळेच्या राष्ट्रीयत्वाचे स्वरूप 'चित्रमय जगत्'च्या द्वारे दृग्गोचर होत होते. 'चित्रमय जगत्'च्या खास अंकांमुळे चित्रशाळेवर झडत्या, जामीन, जप्त्या असे प्रसंग आले व काही खास अंक राजद्रोही ठरून सरकारजमा झाले. चित्रमय जगत्चे संपादक त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या घराची झडती रशिया अंकामुळे झाली होती. अशा प्रकारे वासुकाकांची चित्रशाळा ही राष्ट्रीय संस्था म्हणून प्रख्यात झाली होती, व राजकीय चळवळ्यांचा अड्डा बनली होती.

वासुकाकांना विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्याविषयी केवढी आदरबुद्धी व कृतज्ञता वाटत होती व त्यांची स्मृति चिरंजीव करण्यासाठी त्यांनी चित्रशाळे-व्यतिरिक्त आणखी दोन प्रयत्न कसे केले त्यांचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. इ. स. १८९१ साली वासुकाकांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे चरित्र लिहि-णारास २०० रुपयांचे बक्षीस जाहीर केले. त्याप्रमाणे शास्त्रीबुवांचे बंधू लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर यांनी शास्त्रीबुवांचे अधिकृत चरित्र लिहिले. वासुकाकांची प्रेरणा नसती तर त्यांच्या हातून हे उत्कृष्ट चरित्र लिहिले गेले असते की नाही याची शंकाच आहे. शास्त्रीबुवांचा पुतळा उभारून वासुकाकांनी त्यांचे आणखी एक स्मारक केले. हा पुतळा पूर्वीच्या रे मार्केटच्या (म्हणजे हल्लीच्या फुले मंडईच्या) मध्यभागी बसविण्यात आला होता व ता. ४ सप्टेंबर १९२४ रोजी महात्मा गांधींच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले होते. चित्रशाळा हे शास्त्रीबुवांचे आद्य स्मारक होय. अनेक वर्षे चित्रशाळेतर्फे शास्त्रीबुवांची पुण्यतिथि साजरी करण्यात येत असे.

वासुकाका याप्रमाणे जरी सार्वजनिक जीवनात रममाण झाले असले तरी चित्रशाळेकडे त्यांचे दुर्लक्ष नव्हते. देवादिकांच्या रंगीत चित्रांबरोबरच त्यांनी

अनेक महत्त्वाचे व संग्राह्य ग्रंथ प्रसिद्ध केले. प्रकाशनक्षेत्रातील त्यांची ही कामगिरी निर्णयसागर प्रेसच्या तोडीची आहे. संपूर्ण संस्कृत महाभारत, ज्ञानेश्वरी, तुकाराम, नामदेव, रामदास यांचे समग्र ग्रंथ, प्राचीन कोश, शिवरामपंत परांजपे यांचे वाङ्मय, इतिहासाचार्य राजवाडे यांचे इतिहास ग्रंथ, निबंधमाला, अरबी भाषेतील गोष्टी, सरस्वती कोश, लावण्या व पोवाडे, धार्मिक, राजकीय, वैद्यकीय व शास्त्रीय ग्रंथ, कोशवाङ्मय, प्रवासवर्णने, काव्य-कथा-कादंबऱ्या इत्यादी विविध प्रकारचे सुमारे ७५० लहानमोठे ग्रंथ त्यांनी प्रसिद्ध करून मराठी साहित्याच्या भांडारात बहुमोल भर घातली. चित्रशाळेच्या व्यवहाराच्या बाबतीत त्यांना शंकर नरहर जोशी यांच्यासारखा कर्तबगार जोडीदार व सहकारी लाभल्यामुळे वासुकाकांना सार्वजनिक कामात लक्ष घालता आले. चित्रशाळेच्या संवर्धनाचे व उत्कर्षाचे बरेचसे श्रेय शंकररावांना दिले पाहिजे.

पुस्तकांच्या प्रकाशनाबरोबरच वासुकाकांनी राष्ट्रीय मासिके काढण्याचा उपक्रम केला. ' चित्रमय जगत् ' मासिक सुरू करण्यापूर्वी १८९० साली त्यांनी शिक्षण खात्याचे ' मराठी शाळापत्रक ' हे सरकारी मासिक चालवावयास घेतले होते. १९१० साली त्यांनी सुप्रसिद्ध ' चित्रमय जगत् ' मासिक सुरू केले. त्याशिवाय स्फूर्ति, चित्रमय कृषीवल, ध्रुव, आपली शेती, अशी मासिके वासुकाकांनी काढली होती.

केरळ प्रांतातील सुप्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा यांच्या सहकार्याने वासुकाकांनी चित्रशाळेत अनेक रंगीत चित्रे छापली. चित्रशाळेकडे पूर्वी जी सरकारी पुस्तके होती ती चित्रशाळेचे नाव काळ्या यादीत गेल्यामुळे काढून घेण्यात आली होती. तेव्हा वासुकाकांनी स्वतःची शालोपयोगी क्रमिक पुस्तके तयार केली. त्याप्रमाणे मुलांच्यासाठी मुळाक्षरांचे तक्ते वगैरे विविध प्रकारचे बालशिक्षण-साहित्य प्रसिद्ध केले. वासुकाकांनी चित्रशाळा विविध अंगांनी समृद्ध केली होती. १९२० पर्यंत ' चित्रशाळा स्टीम प्रेस ' होता, तो पुढे ऑईल एंजिनवर चालू लागला आणि १९३० साली इलेक्ट्रिक मोटर आली. चित्रशाळेच्या यंत्रसामुग्रीत हळूहळू सुधारणा झाली. ब्लॉक खाते, ड्रॉईंग खाते, सुतार खाते, बायंडिंग खाते, कॅस्टर खाते, मशीन खाते, पुस्तक-प्रकाशन व विक्री खाते अशी अनेक खाती वासुकाकांनी सुरू केली. अशा प्रकारे ४०० रुपयांच्या भांडवलावर सुरू झालेली चित्रशाळा वासुकाकांच्या हयातीत ४ लाखांवर गेली.

वाईजवळ धोमसारख्या खेड्यात जोशीपणाची वृत्ती असलेल्या घराण्यात ता. २८-५-१८५४ रोजी वासुकाकांचा जन्म झाला. १४ व्या वर्षी त्यांच्या शिक्षणाला सुरुवात झाली, पण पुढे तेही फारसे मिळाले नाही. शेती शिक्षण चालू असता विष्णुशास्त्री चिपळूणकरांशी त्यांचा संबंध आला आणि त्यांचे सबंध आयुष्यच बदलले. ८९ वर्षांची त्यांची हयात कशी गेली याचे सविस्तर वर्णन वर आलेच आहे. तथापि एक दोन गोष्टींचा उल्लेख राहिला आहे. सुप्रसिद्ध स्वामी रामतीर्थ यांनी, वासुकाका अमेरिकेत असताना, त्यांना आपले गुरू मानले होते व परदेशात हिंदुस्थानविषयी प्रचार करण्याची प्रेरणा त्यांना वासुकाकांनी दिली होती. वासुकाकांचे कित्येक वैयक्तिक गुण आदर्शभूत होते. त्यांची परोपकार-वृत्ती जशी वाखाणण्यासारखी होती त्याप्रमाणे नियमितपणा, शिस्तप्रियता, व्यायाम, स्वच्छता, आहारविहारातील संयम वगैरे त्यांचे गुण घेण्यासारखे होते. ते आरोग्याचे आदर्श होते. त्यांच्या परिचितांपैकी कोणी आजारी पडला तर वासुकाका त्याच्या समाचाराला गेल्याशिवाय रहात नसत.

१२ जानेवारी १९४४ रोजी वासुकाका जोशी निधन पावले. त्यांनी मृत्यू-पूर्वी एक इच्छापत्र केले आणि आपली सारी संपत्ती सार्वजनिक कार्याला देऊन टाकली. म. गांधींना जेव्हा ही हकीगत समजली तेव्हा ते म्हणाले, "मी वासुकाकांना बरोबर ओळखले होते. ते असे करतील याबद्दल मला शंकाच नव्हती." वासुकाका स्वतःला विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या चित्रशाळेचे एक विश्वस्तच समजत होते.

"चित्रमय जगत्"च्या खास "वासुकाका अंका"साठी देवगिरीकरांनी महात्मा गांधींच्याकडे संदेश मागितला होता. तो त्यांनी सेवाग्रामहून ता. १।११।४४ रोजी पुढीलप्रमाणे पाठविला:—

"भाई देवगिरीकर,

वासुकाका के बारे में मेरे तरफ से क्या मांगोगे। हम दोनों में बहुत बातों में साम्य था। मेरी कलम कैसे आगे चला सके।

आपका

मो. क. गांधी

चित्रशाळेची वाढ व प्रगती

वासुकाका जोशी यांनी चित्रशाळा हाती घेतल्यावर क्रमाक्रमाने चित्रशाळेची वाढ कशी झाली व चित्रशाळेत किती खाती केव्हा सुरू झाली याची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल:—

१९०५ साली	फोटो काढण्याचे काम सुरू झाले.
१९०६ ,,	पुस्तक-प्रकाशनाचा प्रारंभ
१९१० ,,	ब्लॉक-मेकिंग सुरू
१९१० ,,	चित्रमय जगत् मासिक सुरू
१९१० ,,	टाईप फौंड्री
१९१५ ,,	बालवाङ्मय, तक्ते, नकाशे.
१९२२ ,,	स्टीम प्रेसचे रूपांतर— ऑइल इंजिनवर प्रेस चालू लागला.
१९३० ,,	विजेची यंत्रे आली.
१९५२ ,,	चित्रशाळा प्रेसमध्ये लिथोची २ यंत्रे, ५ सिलिंडर्स व ४ ट्रेडल्स होती.
१९५२ ,,	टाइप फौंड्रीमध्ये ६ हातयंत्रे होती व मराठी ९ ते ४८ पॉइंट, इंग्रजी, हिंदी, गुजराती टाईप पाडले जात.

चित्रशाळेत पुढीलप्रमाणे विविध खाती होती:—

कंपोज, ड्रॉइंग, सुतार, बायंडिंग, मशीन, ब्लॉकमेकिंग, टाईप फौंड्री, नकाशे, कचेरी, हिशेब, संपादक, टपाल इ. शिवाय पुस्तकांचे स्वतंत्र दुकान मुंबई येथे होते.

चित्रशाळेत पुढील कामे होत असत :—

(१) मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराती, भाषेतील सर्व प्रकारची पुस्तकांची छपाई.

(२) एक रंगी व अनेकरंगी लिथोवरील पोस्टर्स.

(३) डिझाइन्स, चित्रे, आकृत्या.

(४) एकरंगी अगर अनेक रंगी झिंकचे व कॉपरचे ब्लॉक्स होत असत.

(५) सर्व प्रकारचा टाईप, स्टीरिओज, शाई, फर्निचर, स्टिक्स, रोलर कांपोझिशन, ब्रश इत्यादी मुद्रणसाहित्य विकत मिळत असे.

चित्रशाळा छापखान्यात तीन मासिके छापली जात असत. १९५२ साली एकूण कामगार १७५ होते. १९५८ साली त्यांची संख्या जास्तीत जास्त १८० झाली होती. १९७० साली ८० कामगार काम करीत होते.

चित्रशाळेत पुस्तकांशिवाय शिक्षणविषयक साहित्य, देवादिकांची व पुढाऱ्यांची रंगीत चित्रे, सर्व प्रकारचे नकाशे, पृथ्वीचे ग्लोब, गोष्टींच्या चौकटी, मुळाक्षरांचे पत्ते, देवादिकांचे पत्ते, गंजीफा, ऐतिहासिक जनावरांचे व फळांचे तक्ते, सचित्र वर्णमाला– मराठी, गुजराती, हिंदी, कानडी, उर्दू व बंगाली, मानवी शरीररचनादर्शक तक्ते, प्राणिशास्त्र– आरोग्य– विविध सण– विविध देखावे– निरनिराळ्या देशांतील लोक– म्हणी– पशुपक्षी झाडे– प्राणी इत्यादिकांचे मोठे तक्ते, शाळेत लावण्यासाठी जनावरांची मोठी चित्रे, जग– हिंदुस्थान– युरोप– आशिया– अमेरिका– आफ्रिका यांचे शालेय नकाशे, पाठासाठी गोष्टींची चित्रे, कापडी गुंडाळण्याचे फळे, लाकडी जनवारे, इ. इ.

वरीलशिवाय चित्रशाळेंत निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या वस्तू विक्रीस ठेवण्यात येत असत: पेणची कटलरी–चाकू,कात्र्या वगैरे,पंजाबातील हॉकी स्टिक्स, क्रिकेट बॅटस्, फुटबॉल्स, सावंतवाडीची लाकडी फळे, धरमपूरची खादी, सोयाबीन कॉफी, केशर, चर्मी जोडे, छपाईचा कागद व छापखान्याची शाई इ. इ.

क्रमिक पुस्तके

१९३८ साली चित्रशाळा प्रेसने मराठी पहिली ते सातवी या इयत्तांसाठी ‘ बालबोध वाचनमाला ’ नावाची नवीन मराठी क्रमिक पुस्तके तयार केली होती. ती सरकार मंजूर होऊन काही शाळांतून लावण्यात आली होती.

१९५४ साली बदललेल्या सरकारी धोरणानुसार चित्रशाळेने उच्च माध्यमिक शाळांसाठी निरनिराळ्या विषयांची पुस्तके अभ्यासक्रमानुसार तयार करून घेतली होती. ती शाळाखात्याने टेक्स्ट म्हणून मंजूर केली होती व निरनिराळ्या शाळांनी ती आपल्या अभ्यासक्रमात समाविष्ट केली होती. या २५ पुस्तकांची नावे पुढीलप्रमाणे होत: थोरांचा परिचय (इयत्ता ४), गणित परिचय (इयत्ता ४), बालबोध वाचनमाला (इ. ५–६–७), आपला भारत (इ. ५–६–७), आपले नवे जग (इ. ५–६–७–८–९–१०–११), मायबोलीचा अभ्यास (इ. ८–९–१०), संस्कृत परिमल (इ. ९–१०), भूमिति (इ. १०–११),

आरोग्यशास्त्र (इ. ८–९–१०), शरीरशास्त्र (इ. १०–११). इ.

चित्रशाळेत छापल्या जाणाऱ्या पुस्तकांची व नकाशांची काही ठोक गिऱ्हाइके

तेज ब्रदर्स पुणे, छत्रपति स्टोअर्स, सातारा, नेवे ब्रदर्स, जळगाव, नाईक औरंगाबाद, दादर बुकडेपो मुंबई, बिडकर पंढरपूर, तेलंग पंढरपूर, ओरिएंटल बुकडेपो पुणे, इंटरनॅशनल बुक सर्व्हिस, पुणे, जयचंद तलकसी, मुंबई, जिल्हा लोकल बोर्डस्, सातारा, पुणे, खानदेश, इ. इ.

चित्रशाळा छापखान्यात पुस्तके, नाटकांची, सिनेमाची व निवडणुकीची पोस्टर्स, तक्ते इत्यादिकांच्या छपाईचे काम मोठ्या प्रमाणात होत असे.

छपाईची काही ठोक गिऱ्हाइके:

तेलंग पंढरपूर, बिडकर पंढरपूर, जोशी ब्रदर्स हैद्राबाद, नेवे ब्रदर्स जळगाव, नाईक औरंगाबाद, हिंदुस्थान स्टोअर्स औरंगाबाद, आदर्श स्टोअर्स जळगाव, मॉडर्न बुकडेपो– किताबखाना– व्हीनस बुक स्टॉल– कॉंटिनेंटल प्रकाशन– संयुक्त साहित्य–विश्वकर्मा पुणे, नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली, पब्लिकेशन्स डिव्हिजन दिल्ली, गजानन महाराज चरित्राचे प्रकाशक शेगाव, म. गांधी वाङ्मयाचे प्रकाशक महाराष्ट्र सरकार, जयचंद तलकसी अँड कं. मुंबई, इ. इ.

प्रकरण दुसरे

चित्रशाळेची मासिके

मराठी शालापत्रक

हे मूळ सरकारी शिक्षणखात्याचे मासिक. मराठी शाळामास्तरांचे ज्ञान वृद्धिंगत करण्याच्या हेतूने ते 'पुणे पाठशालापत्रक 'या नावाने १८६१ च्या मे महिन्यात सुरू झाले व जुलै १८६३ मध्ये बंद पडले. पुणे पाठशाळेकडील मंडळी ते चालवीत असत. कृष्णशास्त्री तळेकर हे त्याचे पहिले संपादक होते. नंतर विष्णुशास्त्री पंडित त्या जागेवर आले. पुढे त्याचे रूपांतर होऊन 'मराठी शालापत्रक' या नावाने ते ऑगस्ट १८६३ पासून निघू लागले व डिसेंबर १८७५ मध्ये सरकारने ते बंद केले. हे मासिक मुख्यत: मराठी शाळांतील शिक्षकमंडळीसाठी होते व सरकारी ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल त्याचे संपादक असत. प्रारंभी केरो लक्ष्मण छत्रे त्याचे संपादक होते. त्यांच्यानंतर १८६५ साली कृष्णशास्त्री चिपळूणकर हे मराठी शालापत्रकाचे " कर्ते " झाले. त्यांनी रासेलस, व्याकरणावरील निबंध, अरबी भाषेतील गोष्टी वगैरे पुस्तके या मासिकात क्रमश: प्रसिद्ध केली. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे " संस्कृत कविपंचक " मूळ शालापत्रकात १८७२ मध्ये प्रकाशित झाले. पुढे त्यांनी १८७५ च्या मार्च महिन्यापासून " मराठी कविता " ही लेखमाला सुरू केली. त्या निबंधाच्या प्रास्ताविक लेखातील मिशनऱ्यांवरील टीका शालाधिकाऱ्यांना इतकी झोंबली की शाळा खात्याने हे मासिक बंद करण्याचा तडकाफडकी निर्णय घेतला. शास्त्रीबुवांची लेखणी किती जबरदस्त व प्रभावशाली होती, हे यावरून दिसून येईल.

पुढे पंधरा वर्षांनी सीतारामपंत चिपळूणकर यांच्या साहाय्याने व सरकारी आश्रयाने चित्रशाळेने त्याचे पुनरुज्जीवन करण्याचे ठरविले व वासुदेव गणेश जोशी यांच्या संपादकत्वाखाली पहिला अंक १८९० च्या जानेवारीत प्रसिद्ध झाला. " शालापत्रका 'चे हे तिसरे स्थित्यंतर होय. पहिल्या अंकावर संपादक म्हणून वासुकाकांचे नाव छापलेले होते व चित्रशाळा प्रेसचे नाव प्रकाशक म्हणून होते. या " मराठी शालापत्रका "चे ध्येय व धोरण पूर्वीचेच होते व ट्रेनिंग

कॉलेजातील शिक्षक त्याचे संपादकीय साहाय्यक असत. चित्रशाळेत तेव्हा टाईप नसल्यामुळे ते आर्यभूषण छापखान्यात छापले जात असे. पुढे १८९८ साली ते चित्रशाळेत निघू लागले. त्या वेळी त्याचे ४००० अंक निघत असत व हे मासिक सरकारी आश्रयानेच निघत असल्यामुळे त्यायोगे चित्रशाळेचा फायदाच होत असे. व्याकरणकार रा. भि. जोशी हे त्याचे काही काळ सहाय्यक संपादक होते. या मासिकास जून १९११ पर्यंत म्हणजे सतत २० वर्षे सरकारी आश्रय होता. पुढे सरकारी धोरण बदलल्यामुळे व चित्रशाळेवर सरकारची इतराजी झाल्यामुळे १९१२ पासून सरकारचा आश्रय बंद झाला. तथापि चित्रशाळेने १९१२ च्या जानेवारीपासून ते स्वतःचे मासिक म्हणून त्याच नावाने पुढे चालू केले.

हे मासिक प्राथमिक शिक्षकांना उपयुक्त असल्यामुळे त्याला शिक्षकांचा व शाळांचा आश्रय होता व शाळांतून ते उपयुक्त ठरले होते. १९१६ ते १९२० या काळात इतिहास-संशोधक द. वि. आपटे 'चित्रमय जगत्'बरोबर शालापत्रकाचे संपादनकार्य करीत. नंतर त्र्यं. र. देवगिरीकर यांच्याकडे दोन्ही मासिके आली. एप्रिल १९२९ पासून या मासिकाचे चौथे स्थित्यंतर घडून आले व केवळ 'शालापत्रक' या नावाने ते फक्त मुलांच्यासाठी मुलांचे मासिक झाले आणि तेव्हापासून गेली ४५ वर्षे त्याच स्वरूपात ते चालू आहे. १९७४ च्या जानेवारीत त्याने ८५ व्या वर्षात पदार्पण केले. व त्याच वर्षात ते विराम पावले.

चित्रमय जगत्

मराठी मासिकांच्या सृष्टीत नावाजलेले व अग्रेसर ठरलेले 'चित्रमय जगत्' मासिक १९१० साली अवतीर्ण झाले. या लोकप्रिय मासिकाने महाराष्ट्राच्या बौद्धिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात जी कामगिरी केली ती अपूर्व म्हणावी लागेल. 'विविधज्ञानविस्तार' व 'मनोरंजन' या एके काळी गाजलेल्या मासिकांप्रमाणेच 'चित्रमय जगत्'चे एक स्वतंत्र युग होऊन गेले. 'विविधज्ञानविस्तार' ६८ वर्षे, 'लोकमित्र' ४९ व 'मनोरंजन' ४० वर्षे चालले तर 'चित्रमय जगत्' ची कारकीर्द उणीपुरी ६० वर्षांची झाली. मराठी नियतकालिकांच्या इतिहासात 'चित्रमय जगत्'चे नाव चिरस्मरणीय झाल्यावाचून राहणार नाही.

वासुकाका जोशी हे चित्रमय जगत्चे आद्य संस्थापक होते. ते परदेशात जाऊन आले होते व त्यांनी इंग्लंड—अमेरिकेची सचित्र नियतकालिके पाहिलेली होती. तेव्हा लंडनच्या 'इलस्ट्रेटेड लंडन न्यूज' या सचित्र साप्ताहिकाच्या धर्तीवर व त्या आकाराचे संपूर्ण चित्रमय असे मासिक काढण्याची त्यांनी योजना आखली. शिवाय वासुकाकांचे चिरंजीव रामभाऊ हे नुकतेच विलायतेहून ब्लॉक-मेकिंगची कला शिकून आले असल्यामुळे मासिकात जास्तीत जास्त चित्रे घालणे त्यांना सहज शक्य होते. मराठीत त्या वेळी अशा प्रकारचे एकही सचित्र मासिक नव्हते. विविधज्ञानविस्तार, मनोरंजन, लोकमित्र, नवयुग, लोकशिक्षण अशी काही मोजकीच मासिके त्या काळी प्रसिद्ध होत होती. पण त्यांत चित्रे नसत आणि ती आकारानेही लहान होती. म्हणून चित्रमय जगत्चा आकार दुपटीहून मोठा म्हणजे क्राऊन द्वितीयांश इतका (१३·८" ९·४") ठेवण्यात आला होता. वासुकाकांनी हे मासिक कोणत्या हेतूने काढले व त्यात त्यांचा उद्देश काय होता याचा खुलासा त्यांच्या चरित्रात कोठेही आढळत नाही. तथापि, 'केसरी' साप्ताहिकाच्या ता. ७ डिसेंबर १९०९ च्या अंकात पहिल्या पानावर "चित्रमय जगत्'ची जी मोठी जाहिरात प्रसिद्ध झाली होती तिच्यावरून पुष्कळसा उलगडा होतो. ती जाहिरात अशी :—

चित्रमय जगत्

या नावाचे मासिक पुस्तक आम्ही येत्या जानेवारीपासून सुरू करणार आहो. हे मासिक पुस्तक दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत प्रसिद्ध होईल. प्रत्येक अंकात फोटोवरून तयार केलेली चित्रे व कारटुने (विनोदी चित्रे) देण्यात यावयाची असून चित्रमय जगत् हे अन्वर्थक नाव या मासिक पुस्तकास दिले आहे. चरित्रे, स्थलवर्णने, समारंभांची वर्णने, कादंबऱ्या व नाटके, चर्चात्मक व टीकात्मक वगैरे विषयांचा यात समावेश करण्यात येईल व प्रत्येक विषय सचित्र येईल. महत्त्वाच्या बातम्या मार्मिक टीकेसह देण्यात येतील व बातम्यांना अनुसरून विनोदी चित्रे (कारटुने) व इतर चित्रे घालण्यात येतील.

मासिकाचा आकार क्रा. द्वितीयांशाच्या इतका मोठा असून प्रत्येक अंकात १६ पृष्ठे येतील. शिवाय मलपृष्ठ निराळे येईल. बारा अंकांची

वर्गणी ट. ह. सह ३। रु. पुणे व मुंबई येथील वर्गणीदारांस ३ रु. फुटकळ अंकाची किंमत ४ आणे.

मॅनेजर, चित्रशाळा प्रेस, पुणे.

"चित्रमय जगत्"च्या पहिल्या अंकात पहिल्या पानावर अत्रिकुलोत्पन्न राहतव्य ऋषींचे ऋग्वेदातील "व्यचिष्ठे बहुपाय्ये यतेमहि स्वराज्ये" हे ५ व्या मंडलातील ६६ वे सूक्त सार्थ दिले होते :

"ज्या राज्यव्यवस्थेमध्ये राजाचे अधिकार लोकमताने नियंत्रित झालेले असतात त्यालाच "स्वराज्य" किंवा "बहुपाय्य स्वराज्य" असे नाव आहे. स्वराज्याची इच्छा बाळगणाऱ्या लोकांनी जनतेची दृष्टी व्यापक होईल, त्यांमध्ये ऐक्य बाणेल व ते विद्येने तेजस्वी होतील असे करण्याचा प्रयत्न करावा. व्यापक विचार, ऐक्य व ज्ञान हे तीन मार्ग ज्या ठिकाणी जाऊन एकत्र मिळतील तेथे स्वराज्य असते. असा वेदाचा उपदेश आहे."

राहतव्य ऋषींच्या या सूक्तावरून "चित्रमव जगत्"चे ध्येय कळून येईल. शिवाय पहिल्या अंकात दुसऱ्या पानावर कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे जे पुण्यस्मरण करण्यात आले आहे त्यांतील पुढील वाक्ये ही वाचकांना तितकीच अर्थबोधक वाटतील:– "चित्रमय जगत् हे चित्रशाळेच्या उत्कर्षाचे फल आहे. शास्त्रीबोवांनी न्यू इंग्लिश स्कूल, केसरी–मराठा, चित्रशाळा व किताबखाना ही त्यांनी लाविलेली सर्व झाडे चांगली वाढीस लागून त्यांस सुंदर फळे येत आहेत. चित्रमय जगत् हे त्यांपैकींच एक फळ आहे. त्या दृष्टीने चिपळूणकरांचे अवतार-कार्य संपादण्यासाठी स्वभाषेची सेवा, स्वदेशसेवा, सत्प्रीती व स्वावलंबनप्राप्ती इत्यादि गुणांचे संवर्धन करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे."

१९१० हे साल राजकीय दृष्ट्या एक महत्त्वपूर्ण वर्ष ठरले होते. बंगालची फाळणी झाली होती. क्रांतिकारकांचे आंदोलन जोरात सुरू होते. सरकारच्या दडपशाहीचा कळस झाला होता व लो. टिळक मंडालेच्या तुरुंगात आपले हद्दपारीचे जीवन कंठीत होते. त्याचप्रमाणे इतरत्रही अनेक देशभक्त तुरुंगात खितपत पडले होते. त्याच वर्षी प्रेस ॲक्ट जारी झाल्यामुळे वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्या-वर गदा आली होती. मोर्ले-मिंटो सुधारणा प्रसिद्ध झाल्या होत्या, कलकत्त्याची

राजधानी दिल्लीला येणार होती. पुढाऱ्यांच्या अभावामुळे देशात एकंदरीने औदासीन्याची कळा आली होती. कॉंग्रेस दुर्बळ झाली होती व नेमस्त पक्ष अर्ज विनंत्यांच्या आपल्या कार्यक्रमात दंग होता. देशाचे वातावरण अशा प्रकारे निष्क्रिय व निर्जीव झाले होते. देशाच्या अशा राजकीय परिस्थितीत "चित्रमय जगत्"चा जन्म झाला.

चित्रमय जगत् मासिक सुरू होताच ते इतके लोकप्रिय झाले की त्याचे पहिले तीन अंक तावडतोब खपले व जानेवारीचा अंक पुन्हा छापावा लागला. मासिकाच्या अंकाला पुनर्मुद्रणाचा योग यावा ही गोष्ट तेव्हा अपूर्वच होती आणि आजसुद्धा अपूर्वच म्हणावी लागेल. पहिल्या अंकावर मुद्रक व प्रकाशक म्हणून रामचंद्र वासुदेव जोशी यांचे नाव होते. त्या काळी मासिकावर संपादकाचे नाव घालण्याची आवश्यकता नव्हती. प्रारंभीच्या काळात नाटककार अनंत वामन बर्वे, "करमणूक" साप्ताहिकाचे सहसंपादक ज. र. आजगावकर, सेनापति बापट व ज. स. करंदीकर ही मंडळी संपादकीय सल्लागार व मदतनीस होती. कृ. गो. किनरे हे पहिल्या अंकापासून लेखक होते.

मासिकात भरपूर चित्रे व विनोदी चित्रे (कार्टुने) देण्याचे जसे धोरण होते त्याप्रमाणे त्यात नानाविध विषयांवर व्यासंगपूर्ण लेख येत असत. विविध प्रकारचे भारदस्त लेख, मनोरंजक गोष्टी, प्रवासवर्णने, चरित्रे, आरोग्यविषयक व शास्त्रीय माहितीचे लेख, चुटके वगैरेमुळे मासिक सर्वांगपरिपूर्ण व उच्च दर्जाचे होते. नाटकांची सचित्र व सविस्तर परीक्षणे हे प्रारंभीच्या काळात चित्रमय जगत्चे वैशिष्ट्य समजले जात असे. सुरुवातीचा पहिला लेख कटाक्षाने धर्मविषयक असे. कित्येक वर्षे ही प्रथा अखंडपणे चालू होती. त्या काळातले थोर पुढारी, प्रसिद्ध व्यक्ती व विचारवंत लेखक चित्रमय जगत्साठी लिहीत असत. चित्रमय जगत्च्या लेखकवर्गात शि. म. परांजपे, कृ. प्र. खाडिलकर, चिं. वि. वैद्य, लो. टिळक, इतिहासाचार्य राजवाडे, न. चिं. केळकर, वि. सी. गुर्जर, वैकुंठराय, कृष्णशास्त्री घुले, डॉ. खानखोजे, वीर वामनराव जोशी, लोकनायक अणे, दा. वि. गोखले, श्री. कृ. कोल्हटकर, दाजी नागेश आपटे, सरदार किबे, माधवराव बोडस, ह. ना. आपटे, सी. के. दामले, ल. ब. भोपटकर, के. रा. कानिटकर, ग. र. अभ्यंकर, द. वा. पोतदार अशांसारख्या प्रसिद्ध व्यक्तींचा समावेश होता. कवि अनंततनय, आनंदराव टेकाडे, गोविंदाग्रज, तिवारी यांच्या कविता

चित्रमय जगत्‌मध्ये येत असत. सावरकरांची "सागरा प्राण तळमळला" ही कविता प्रथम चित्रमय जगत्‌मध्ये प्रसिद्ध झाली. लोकमान्य टिळकांचा "हिंदु-धर्माचे स्वरूपलक्षण" हा लेख १९१५ साली प्रसिद्ध झाला होता तर "भारतीय विवाह संस्थेचा इतिहास" या राजवाड्यांच्या लेखाने खळबळ उडविली होती. पहिल्या महायुद्धाच्या काळात खाडिलकरांची महायुद्धावरील लेखमाला अत्यंत गाजली होती व खेडोपाडी तिचे सामुदायिक पारायण होत असे. दा. वि. गोखले यांचे "स्वराज्याचा लढा" हे दरमहाचे राजकीय सदर लोकप्रिय झाले होते. चित्रमय जगतमध्ये नवीन नवीन गोष्टी आल्या पाहिजेत, असा वासुकाकांचा आग्रह असे. म्हणून ते इंग्लंड–अमेरिकेतून मासिके मागवीत व त्यांचा जास्तीत जास्त उपयोग करण्यास संपादकांना सांगत. मराठी मासिकांतून अशा प्रकारची माहिती येत नव्हती. पहिल्या महायुद्धाच्या वेळी चित्रमय जगत्‌ने येवढी अफाट लोकप्रियता मिळविली होती की, त्याचा जास्तीत जास्त खप २० हजारांपर्यंत गेला होता. तेव्हा चित्रमय जगत्‌ची वार्षिक वर्गणी पातळ प्रत २॥ रु. व जाड प्रत ५॥ रु. अशी होती.

वासुकाकांनी "चित्रमय जगत्" मासिक मराठीप्रमाणे हिंदी, गुजराती व कानडी भाषेत काढावयाचे योजिले होते. त्याप्रमाणे त्याच्या गुजराती व हिंदी आवृत्त्या निघाल्या. गुजराती चित्रमय जगत् ३३ वर्षे (१९१५ ते १९४८) व हिंदी चित्रमय जगत् १३ वर्षे (१९१९ ते १९३२) चालले. हिन्दी–गुजरातीमधील नामांकित लेखक या मासिकांना संपादक म्हणून लाभले होते. कानडी चित्रमय जगत् दोन वर्षेच चालले. इंग्रजी आवृत्तीही काढण्याचा चालकांचा विचार होता, पण ती निघाली नाही.

इतिहाससंशोधक द. वि. आपटे १९१५ ते १९२१ पर्यंत "चित्रमय जगत्"चे संपादक म्हणून काम पाहात असत. त्यानंतर त्र्यं. र. देवगिरीकर संपादक झाले. म्हणजे संपादकीय कार्यव्यवस्था पाहू लागले. ते कँप एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलचे मुख्याध्यापक होते. ती नोकरी सोडून देशसेवा करण्याच्या इच्छेने ते चित्रमय जगतमध्ये १९२१ साली दाखल झाले. त्यांच्या दीर्घकालीन कारकीर्दीत चित्रमय जगत्‌ला राष्ट्रीय वळण मिळाले व एकमेव राजकीय मासिक म्हणून त्याची प्रतिष्ठा वाढली. देवगिरीकरांनी परिश्रमपूर्वक काढलेले चीन, रशिया व लष्करी अंक हे त्या काळी खूप गाजले होते. त्यांनी

स्वतः परिश्रम करून व अभ्यास करून हे वैशिष्ट्यपूर्ण विशेषांक तयार केले होते. मराठीत अशा प्रकारचा स्वयंप्रेरणेचा उपक्रम या पूर्वी कोणी केला नव्हता. देवगिरीकरांचे हे खास अंक प्रासंगिक स्वरूपाचे नव्हते, तर स्वतंत्र ग्रंथांच्या योग्यतेचे होते. चित्रमय जगत्‌चा "राशिया अंक" प्रसिद्ध झाल्यावर मीरत खटल्याच्या निमित्ताने चित्रशाळेची व देवगिरीकर यांच्या घराची झडती झाली होती.

चित्रमय जगत्‌च्या ५९ वर्षांच्या जीवनात एकूण ७१० अंक निघाले व सुमारे २५०० पृष्ठे मजकूर प्रसिद्ध झाला. विविध प्रकारच्या विषयांवर खास परिश्रमपूर्वक काढलेले असे ५५ विशेषांक निघाले. या विशेषांकांची नुसती नामावली पाहिली तरी त्यांनी किती विषय व्यापले होते हे दिसून येईल. चित्रमय जगत्‌चा पहिला जादा अंक जून १९१० मध्ये सांगलीच्या राज्यारोहणप्रसंगी काढला होता व तो अनेक चित्रांनी सजविला होता. दुसरा खास अंक १९११ सालच्या डिसेंबरात "दिल्ली दरबार" अंक म्हणून जो निघाला होता तो अतिशयच गाजला. त्यात संस्थानिकांची, राजेरजवाड्यांची व देखाव्यांची इतकी चित्रे होती की त्याला ग्राहकांकडून पुन्हा मागणी आली. म्हणून लागलीच १९१२ च्या जानेवारीत दुसरा "दिल्ली दरबार" खास अंक काढावा लागला. दर वर्षी जानेवारीत वर्षारंभाचा खास अंक निघत असेच. त्याशिवाय पुढे विशिष्ट विषयावर जादा विशेषांक निघू लागले. लष्कर, उद्योगधंदे, महायुद्ध, जागतिक शांतता, कॉंग्रेस, राज्यघटना, स्वातंत्र्य, अन्नधान्य, नियोजन, सर्वोदय, काश्मीर युद्ध, सीमासंघर्ष, प्रेक्षणीय भारत, योजना अशा विषयांप्रमाणे जगातील निरनिराळ्या राष्ट्रांसंबंधी विशेषांक काढण्यात आले होते. त्यात चीन, राशिया, आशिया, युरोप, झेकोस्लोवाकिया, जपान, जर्मनी, स्पेन, कोरिया, काश्मीर, अमेरिका, पाकिस्तान इत्यादी अनेक देशांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे भगवान बुद्ध, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, वासुकाका जोशी, विनोबा, पं. जवाहरलाल नेहरू यांना वाहिलेलेही खास अंक निघाले. त्यांचाही निर्देश केला पाहिजे. शिवाय कॉंग्रेसविषयक अनेक विशेषांक प्रसिद्ध झाले होते, ते निराळेच.

'चित्रमय जगत्'वर संपादक म्हणून कित्येक वर्षे कोणाचेच नाव नव्हते. मुद्रक प्रकाशकाप्रमाणे संपादकाचे नाव छापलेच पाहिजे असा कायदा १९२७ पर्यंत नव्हता. त्या वर्षी नियतकालिकांवर संपादकाचे नाव प्रसिद्ध करण्याची

सक्ती सुरू झाली. तेव्हा ऑगस्ट १९२७ पासून चित्रमय जगत्‌वर संपादक म्हणून त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर यांचे नाव घालण्यात आले. त्यांचा तुरुंगवासाचा काही काळ वजा करता ते १९५० पर्यंत संपादक होते. नंतर संयोजक झाले. त्यांच्या अनुपस्थितीत व ते पार्लमेंटचे सभासद झाल्यावर रा. प्र. कानिटकर चित्रमय जगत्‌चे संपादक होते. १९६८ साली मासिक बंद होईपर्यंत ते त्या स्थानावर होते.

चित्रमय जगत्‌चे राजकीय धोरण कट्टर राष्ट्रवादी असल्यामुळे त्याच्यावर अनेक गंडांतरे आली. १९३० सालचा लष्करी अंक जप्त करण्यात आला व त्याबद्दल ४००० रु. जामीनकी मागण्यात आली. १९३०–३२ सालच्या कायदेभंगाच्या व सत्याग्रहाच्या चळवळीत आक्षिप्त मजकुराबद्दल जामीनकी मागण्यात आली. फेब्रुवारी १९३२ च्या अंकात ना. के. बेहेरे यांची 'सप्तर्षी' ही कविता व मार्च १९३२ च्या अंकात बंगालच्या गव्हर्नरवर गोळी झाडणारी वीणा दास हिचे निवेदन प्रसिद्ध केल्याबद्दल ही जामीनकी मागण्यात आली व हे दोन्ही अंक जप्त करण्यात आले. चित्रशाळा व चित्रमय जगत् कॉंग्रेसवादी असल्यामुळे त्यांच्यावर सरकारची वक्रदृष्टी होती. चित्रशाळा हे सरकारच्या दृष्टीने सरकारविरुद्ध चळवळ करणाऱ्याचे केंद्र होऊन बसले होते. संपादक, चित्र-चालक व कामगार यांनी चळवळीत भाग घेऊन तुरुंगवास भोगला होता. चित्र-शाळेप्रमाणे चित्रमय जगत्‌चेही नाव सरकारच्या काळ्या यादीत समाविष्ट झाले होते. चित्रमय जगत्‌ने राष्ट्रीय लढ्यात केलेली कामगिरी मराठी नियतकालिकांच्या इतिहासात चिरस्थायी होऊन राहील यात शंका नाही. चित्रमय जगत्‌ने राष्ट्रीय चळवळीचा जितका व जितक्या आवेशाने पुरस्कार केला, कॉंग्रेसच्या धोरणाचा मनःपूर्वक पाठपुरावा केला व म. गांधींच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार केला तितका कोणत्याही मराठी नियतकालिकाने केला नाही.

चित्रमय जगत्‌चे आणखी एक वैशिष्ट्य या ठिकाणी अवश्य नमूद केले पाहिजे. गेली ४५ वर्षे चित्रमयजगत्‌चे संपादक अगर संयोजक त्र्यं. र. देवगिरीकर प्रासंगिक विषयांवर जे संपादकीय स्फुट विचार सातत्याने लिहीत असत त्यांत भारतीय व आंतरराष्ट्रीय राजकारणाचा धावता इतिहास ग्रथित झालेला असे. ही स्फुटे अत्यंत अभ्यासपूर्वक व मननीय असत. त्यांत प्रचलित राजकारणावर व सरकारवर योग्य ती टीका असे, त्याचप्रमाणे कॉंग्रेस पक्षाचा पुरस्कार

करूनही निर्भीडपणे दोषादिग्दर्शनही करण्यात येत असे. पण ही टीका समतोल असल्यामुळे या संपादकीय स्फुटांना उच्च दर्जा प्राप्त झाला होता. हे संपादकीय स्फुट विचार स्वतंत्र पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याच्या योग्यतेचे आहेत व ते तसे प्रसिद्ध केल्यास राजकीय कार्यकर्त्यांना मार्गदर्शक होतील, असे अनेकांनी तत्संबंधी वेळोवेळी उद्गार काढले होते.

"मराठी नियतकालिकांचा इतिहास" या ग्रंथात चित्रमय जगत्‌विषयी १९३९ साली पुढील उद्‌गार काढण्यात आले होते:– "चित्रमय जगत् मासिकास आजतागायतच्या नियतकालिकांत श्रेष्ठत्व, महत्त्व, भारदस्तपणा आणि आकर्षकता प्राप्त झाली आहे. बृहन्महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखकांचा पाठिंबा, भरपूर चित्रे व प्रकाशनातील नियमितपणा या गुणत्रयीमुळे चित्रमयजगत्‌ला स्थैर्य व असामान्य लोकप्रियता मिळाली आहे." (रा. गो. कानडे– पृ. २१)

हे उद्‌गार यथार्थ असले तरी त्याबरोबरच चित्रमयजगत्‌च्या ध्येयधोरणाचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. कै. वासुकाका जोशी यांच्या मृत्युपत्रानुसार ध्येय-निष्ठेने व विशिष्ट धोरणाने हे मासिक चालविण्याचे चालकांवर बंधन होते. वासुकाकांनी आपल्या मृत्युपत्रात मासिकांच्या धोरणासंबंधीचा आदेश पुढील-प्रमाणे दिला होता:– "मासिके माझ्या पूर्वीच्याच धोरणाने चालवावी. त्यात बदल करू नये. देशाच्या प्रचलित परिस्थितीनुरूप प्रचलित प्रश्नांची त्यांत चर्चा व्हावी, त्या परिस्थितीत भाग घ्यावा व त्याप्रमाणे मजकूर मासिकात येत जावा. या मासिकांचे सध्याचे जे संपादक आहेत ते जोपर्यन्त माझे मागील धोरण कायम ठेवतील तोपर्यन्त त्यांना संपादक म्हणून कायम ठेवावे. विश्वस्तांनी हल्लीचे जे धोरण आहे ते कायम ठेवून मासिके चालवावी."

वासुकाकांची मासिकांबाबत व्यावहारिक व व्यापारी दृष्टी नसल्यामुळे त्यांनी जाहिरातींबाबत कधी प्रयत्न केला नाही. लोकाश्रय मिळेल तो मिळेल, त्यावर ते अवलंबून राहिले. आणि मुख्य म्हणजे आपली विशिष्ट दृष्टी व राष्ट्रीय धोरण त्यांनी कधीही दृष्टीआड होऊ दिले नाही. त्यांनी कधीही मासिकांना व्यापारी स्वरूप दिले नाही.

वासुकाकांच्या नंतरही त्यांचे धोरण संपादकांनी व विश्वस्तांनी निष्ठेने पाळले. त्यांनी चित्रमय जगत्‌च्या ध्येयाशी व धोरणाशी कोणत्याही प्रकारे प्रतारणा केली नाही. चित्रमय जगत्‌च्या नोव्हेंबर १९६३ च्या अंकात दिलेल्या जाहि-

रातीत विश्वस्तांनी वर्गणीदारांना उद्देशून जी विनंती केली होती ती पाहिली असता या ध्येय-धोरणाचा आणखी उलगडा होईल. वर्गणीदारांना केलेली ती जाहीर विनंती पुढीलप्रमाणे होती:— "जानेवारी १९६४ पासून चित्रमय-जगत्‌ची वार्षिक वर्गणी ७ रु. करणे भाग पडत आहे, याबद्दल आम्हांस दुःख होते. ७ रुपये वर्गणी घेऊनही मासिक चालविणे कठीण जाणार आहे, इतकी महागाई वाढली आहे. चित्रमय जगत् हे मासिक धर्मादाय विश्वस्त निधीतर्फे चालविण्यात येते, त्यामुळे आम्हांला ही सेवा करता येते. फायद्याकडे लक्ष ठेवून आम्ही हे मासिक चालवीत नाही. जी संस्था कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी काढली व ज्या संस्थेची जोपासना कै. वासुकाका जोशी यांनी केली ती संस्था एक राष्ट्रीय ध्येय पुढे ठेवून हे मासिकाचे कार्य चालवीत आहे, येवढेच आम्ही निवेदन करू इच्छितो. वर्गणीदारांनी पूर्ववत् लोभ कायम ठेवावा अशी विनंती आहे.— व्यवस्थापक"

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या परिस्थितीत बदल झाला, परकीय सत्तेशी झगडा करण्याचे दिवस संपले, जनतेची अभिरुचि बदलली व एकंदरच स्थित्यंतर घडून आले. त्यामुळे वासुकाकांनी निर्दिष्ट केलेल्या धोरणानुसार मासिक चालविणे दुर्घट झाले. तरीही हजारो रुपयांचा तोटा सोसून विश्वस्तांनी हे मासिक चालविले. जनतेला 'राजकीय शिक्षण' देण्याचे ध्येय पुढे ठेवून व नफ्याची दृष्टी न ठेवता मासिक चालविण्याने विश्वस्तांनी देशकार्य केले असे म्हटले पाहिजे. सवंग लोकप्रियतेच्या नादी न लागता, तत्त्वाशी प्रतारणा न करता व परिस्थितीच्या वहात्या वाऱ्याबरोबर वाहून न जाता, स्वाभिमानाने व निष्ठेने मार्गक्रमण करून या मासिकाला कृतकृत्यतेचे समाधान लाभले. १९१० सालच्या जानेवारी महिन्यात निघालेले चित्रमय जगत् मासिक ५९ वर्षांचे आयुष्य उपभोगून जानेवारी १९६८ च्या अंकानंतर विराम पावले.

स्फूर्ति

बेळगावचे सुप्रसिद्ध नाटककार व 'भासाची नाटके,' 'माझी बहीण' इत्यादि नाटकांचे कर्ते कृष्णाजी लक्ष्मण सोमण ऊर्फ 'किरात' यांच्या संपादकत्वाखाली नोव्हेंबर १९२८ पासून हे नवीन मासिक चित्रशाळेने सुरू केले. हे मासिक आपल्या नावाप्रमाणेच स्फूर्तिदायक होते. प्रारंभी त्याचा आकार

काऊन ७·२ × ४·८ म्हणजे पुस्तकाएवढा होता. पण तो लवकरच वाढविला. राष्ट्रीय जागृती करणाऱ्या लघुकथा प्रसिद्ध करून विचारजागृती करणे, नाटके, लघुकथा, कादंबऱ्या, चरित्रे प्रसिद्ध करणे हे या मासिकाचे उद्दिष्ट होते. प्रारंभी किरातांची नाटके क्रमशः प्रसिद्ध झाली. या मासिकात ऐतिहासिक लघुकथाही येत असत. राजकीय चळवळीच्या काळात जामीनकी मागितल्यामुळे १९३४ च्या जानेवारीत ते बंद करावे लागले. र. गो. सरदेसाई हे ' स्फूर्ति ' मासिकाचे जानेवारी १९३१ ते फेब्रुवारी १९३२ पर्यंत जाहीर संपादक होते.

चित्रमय कृषीवल

वासुकाकांना शेतीची आवड असल्यामुळे त्यांनी वा. रा. गाडगीळ यांचे ' महाराष्ट्र कृषीवल ' हे मासिक चालविण्यास घेतले व ते " चित्रमय कृषीवल " या नावाने जुलै १९३१ पासून सुरू केले. ते दोन वर्षे चालले व जून १९३३ ला बंद केले.

ध्रुव

ललित वाङ्मय व ललित कला यांस वाहिलेले हे पुरोगामी विचारांचे मासिक एप्रिल १९३५ पासून रा. प्र. कानिटकर यांच्या संपादकत्वाखाली पंधरा वर्षे चालले. त्याने मराठी मासिकांच्या जगात चांगला नावलौकिकही मिळविला होता. या मासिकात सामाजिक व वाङ्मयविषयक लेख येत असत, शिवाय आरोग्य व आहार, सिनेमासृष्टी, विचारविहार, विनोद आणि विश्रांति, चालू महत्त्वाच्या घडामोडी अशी त्यात विविध सदरे होती. ध्रुव मासिकाने लघुकथा, गोमंतक, निसर्गोपचार, घटनापरिषद, आरोग्य, साहित्य संमेलन, म. गांधी संस्मरण असे अनेक वैशिष्ट्यपूर्ण विशेषांक प्रसिद्ध केले होते. क्रमशः दोन कादंबऱ्याही प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. दर वर्षी दिवाळी अंक सचित्र स्वरूपात व दीडपट पृष्ठांचा निघत असे. महाराष्ट्राच्या वैचारिक वाङ्मयात ध्रुवाने महत्त्वाची भर घातली आहे. ध्रुव मासिकाचा पहिला अंक वर्षप्रतिपदेला एप्रिल १९३५ मध्ये निघाला व १९५० च्या मार्च महिन्याच्या अंकानंतर ते बंद करण्यात आले.

आपली शेती

या नावाचे आणखी एक शेतकीविषयक मासिक वासुकाकांचे नातू जी. अनंतन् यांच्या संपादकत्वाखाली जुलै १९४७ पासून सुरू करण्यात आले व मार्च १९५० मध्ये विश्वस्तांच्या ठरावानुसार बंद झाले. या मासिकाचे ध्येय-वाक्य पुढीलप्रमाणे होते. “ हिंदुस्थानातील शेती करू इच्छिणाऱ्या प्रत्येक बांधवा-करिता सहाय्यभूत होणारे मासिक—विधायक, पक्षभेदरहित व वादविवादापासून अलिप्त.’’ या मासिकांत शेतीविषयक विविध मजकूर येत असे.

प्रकरण तिसरे

वासुकाका जोशी यांचे मृत्युपत्र

वासुकाका जोशी यांनी निधनापूर्वी सुमारे चार महिने म्हणजे ता. १७-९-१९४३ रोजी आपले अखेरचे मृत्युपत्र करून ठेवले होते. त्या मृत्युपत्रात त्यांनी आपल्या वडिलोपार्जित व स्वसंपादित स्थावर व जंगम मिळकतीचा तपशील दिला असून तिची कशी विल्हेवाट करावयाची हे कलमवार सांगितले आहे. त्यांनी आपल्या काही जवळच्या नातेवाईकांना किरकोळ देणग्या वगैरे दिल्या. आहेत, पण त्यांनी आपल्या इस्टेटीचे कोणालाही वारसदार केले नाही. आपल्या नातेवाईकांसाठी या मृत्युपत्रात त्यांनी काहीही राखून ठेवले नाही. आपल्या सर्व मिळकतीचा विनियोग सार्वजनिक कार्यासाठी लोकहितार्थच व्हावा असे त्यांनी नमूद करून ठेवले आहे. सर्व इस्टेटीची व्यवस्था पाहण्यास त्यांनी ५ जणांचे विश्वस्त मंडळ नेमले व त्यांच्यामार्फत चित्रशाळेची व खाजगी मिळकतीची कायमची व्यवस्था चालावी असे निवेदन केले आहे. ते आपल्या मृत्युपत्रात म्हणतात :—

"कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी ज्या उद्देशाने प्रेरित होऊन चित्रशाळा संस्था काढली, त्या उद्देशाने मी ती संस्था आजपर्यंत चालविली. तोच उद्देश डोळ्यांपुढे ठेवून विश्वस्तांनी माझ्या पश्चात् चालावे अशी माझी इच्छा आहे.

चित्रशाळेसारखी केवळ ट्रस्टींनी चालविलेली संस्था अत्यंत नावारूपाने चालावी अशी माझी इच्छा आहे व ती माझे ट्रस्टी पुरी करतील अशी मला आशा आहे."

वासुकाकांच्या ह्या इच्छापत्रावरून वासुकाका किती ध्येयदृष्टीचे व निःस्वार्थ बुद्धीचे होते व मूठभर खाजगी कुटुंबीयांच्या हिताची दृष्टी न ठेवता त्यांनी आपली सर्व संपत्ती सार्वजनिक कार्याला कशी अर्पण केली हे दिसून येईल. हे मृत्युपत्र म्हणजे व्यापक देशहितबुद्धीने केलेले एक आदर्श मृत्युपत्र होय, असे म्हणण्यास हरकत नाही.

वासुकाकांचे हे समग्र मृत्युपत्र पुढे देत आहो :

मृत्युपत्र

रोजी मृत्युपत्र करून ठेवणार :—

मी वासुदेव गणेश जोशी, उमर वर्षे ८८, जात ब्राह्मण, धंदा छापखान्याचा, राहणार पुणें पेठ सदाशिव घरनंबर २७२, कारणें मृत्युपत्र करून ठेवितों ऐसाजे :—

[१] माझा आतां वृद्धापकाळ झालेला आहे. अलीकडे मला बरें नसतें व मला आता देहाचा भरंवसा वाटत नाहीं, म्हणून माझे पश्चात् माझे सर्व मिळकतीचा विनियोग कसा व्हावा यासंबंधानें मी जें कांहीं ठरविलें आहे तें खाली दिल्याप्रमाणें आहे :—

[२ अ] माझ्या वडिलांचा वृद्धापकाळ झाला असतां त्यांनीं आपले हातांनींच वडिलोपार्जित मिळकतीच्या वांटण्या करून दिल्या होत्या. त्या वांटणीप्रमाणें माझे वांट्यास ता. वाई, जि. सातारा येथील मौजें धोम येथील रि. स. नं. ३१३/१, ३१३/५, ३१४/७, या, मौजें वरखडवाडी येथील रि. स. नं. ५१/१ ही व मौजें अभिपुरी येथील रि. स. नं. १४५/३, १४५/५, १४५/७, १४५/९, १४५/११, १५१/१, १५१/२, १५१/५, १५१/७, १५१/११, ३०२/११, ९/३, २५/४, १५३/६, या सर्व जमिनी माझे वाट्यास आल्या व त्यांचा मालकी हक्कानें मी आतांपर्यंत उपभोग घेत आहे. मला वडिलार्जित मिळकत आली ती एवढीच, याव्यतिरिक्त वडिलोपार्जित मिळकत मला मिळालेली नाहीं.

[२ ब] मौजें खेड, जि. पुणें येथील ब्राह्मण आळींतील माझीं घरें म्यु. घ. नं. १११ व ११२ व जमिनी रि. स. नं. ३२, ३३, ३४, शिरोली येथील जमिनी रि. स. नं. २४, ६६, टाकळकरवाडी येथील जमिनी सर्व्हे नं. १५०३, १५०४ व खेड येथील गांवठाणांतील बखळ ही ताबेंगहाण असलेली माझी मिळकत पूर्णपणें स्वसंपादित अशी आहे.

[२ क] पुणें येथें माझे मालकीचा चित्रशाळा छापखाना सदाशिव पेठ घ. नं. १०२६ व तदनुषंगिक सर्व गोष्टी म्हणजे छापखान्याची जागा, त्यावरील इमारती, त्यांतील सर्व मशिनरी, कपाटें वगैरे लाकडी सामान, पुस्तकें, इतर प्रकाशनें व त्यांचे हक्क आणि चित्रमयजगत् (मराठी व गुजराथी), ध्रुव व शालापत्रक वगैरे मासिकें ही सर्व माझी स्वकष्टार्जित मिळकत आहे.

[२ का] पुणें येथील सदाशिव पेठेंतील घ. नं. २७२ हें माझें राहतें घर व त्यांतील सर्व सामान, कपाटें, इत्यादि, त्या घरांत असलेलें चित्रशाळा छापखान्याचें मालकीचें, पुस्तकें वगैरे इतर सामान ही सर्व माझी स्वसंपादित मिळकत आहे.

[२ की] पुणें पेठ सदाशिव घ. नं. ९३७ (बापट वाडा या नांवानें प्रसिद्ध असलेलें घर), ती जागा आणि त्यांतील छापखान्याच्या मालकीचें सर्व सामान ही माझी स्वसंपादित मिळकत आहे.

[२ कु] पुणें येथील सदाशिव पेठेंतील माझेकडे भाड्यानें असलेल्या चिटगुप्पी यांचे वाड्यांतील चित्रशाळा छापखान्याचे मालकीचें सर्व सामान ही माझी स्वकष्टार्जित मिळकत आहे.

[२ कू] पुणें पेठ शिवाजीनगर येथील माझ्याकडे ९९ वर्षांच्या करारानें भाड्यानें असलेली सुमारें सात एकर जागा (प्लॅट नं २४०, २४१, २४२) त्यावरील इमारती नं. २६७, ८८५, व तेथें असलेले छापखान्याचे मालकीचें सर्व सामान, तसेंच पेठ शिवाजीनगरमधील भांडारकर इन्स्टिटयूट रोडवरील खिंडीसमोरील जागा, जी मजकडे ९९ वर्षांच्या करारानें आहे ती, ही सर्व स्वसंपादित आहे.

[२ के] ओरिएन्टल विमा कंपनींत उतरलेल्या माझ्या एक हजार रुपयांच्या विम्याची येईल ती रक्कम.

[२ कै] चि. रा. वामन हरी जोशी ऊर्फ पंडित, रा. धोम, यांच्या धोम येथील दोन जमिनी, एक सरकारी जिराईत जमीन, दळेकचन रि. स. नं. ३१/५ व दुसरी— या मजकडे गहाण आहेत त्या गहाणांचे हक्क हीहि माझी स्वसंपादित मिळकत आहे.

येणेंप्रमाणें माझी मिळकत आहे. या व्यतिरिक्त आणखी कांहीं माझी मिळकत असेल, कीं, जिचा येथें उल्लेख करावयाचा राहिला असेल ती सर्व स्थावर जंगम मिळकत माझी वर दिल्याप्रमाणें स्वसंपादित आहे. तिचा विनियोग करण्याचा मला पूर्ण हक्क आहे. तेव्हां ती व्यवस्था माझ्या या मृत्युपत्रांत लिहिल्याप्रमाणें व्हावी अशी माझी इच्छा आहे.

[३] माझ्या मिळकतीचा विनियोग आजपर्यंत मीं सार्वजनिक कार्यांतच केला आणि माझ्या पश्चातहि माझ्या मिळकतीचा विनियोग बव्हंशीं लोकहितार्थच

व्हावा अशी माझी इच्छा आहे; म्हणून माझ्या नातेवाइकांपैकीं कांहींना मी खालीं दिल्याप्रमाणें देणग्या वगैरे देण्यांत येऊन उरलेल्या माझ्या सर्व संपत्तीचा विनियोग मी खालीं लिहून ठेविल्याप्रमाणें सार्वजनिक हिताकरितांच व्हावा.

[४] माझा मुलगा कै. रामभाऊ यांच्या दोन मलींपैकीं एक चि. सौ. ताराबाई मुतालिक इचें लग्न झालें आहे. तिला माझ्या मिळकतींतून दर वर्षी रु. १०० (अक्षरीं शंभर) चोळीबांगडीसाठीं म्हणून तिच्या हयातीपर्यंत द्यावेत. कै. रामभाऊंची दुसरी मुलगी चि. सरला इचें लग्न अजून व्हावयाचें आहे. तिचें लग्न होईपर्यंत आतां ज्याप्रमाणें तिच्या शिक्षण वगैरेंवर खर्च चालू आहे, त्याचप्रमाणें तिच्या प्रीत्यर्थ खर्च व्हावा. हा खर्च ट्रस्टींनीं माझे मिळकतींतून करावा. तिचे लग्नाप्रीत्यर्थ रुपये पांच हजार किंवा कमीजास्त लागल्यास करण्यांत यावा. तिलाहि तिचे हयातीपर्यंत चि. ताराबाईप्रमाणेंच दरसाल रु. १०० (अक्षरीं शंभर) चोळीबांगडीसाठीं म्हणून माझे मिळकतींतून देण्यांत यावे. या माझ्या नाती ज्या ज्या वेळीं माहेरीं म्हणून येतील त्या त्या वेळीं त्यांच्या जेवणाची व त्यांना राहण्याच्या स्वतंत्र जागेची सोय ट्रस्टींनीं करावी.

[५] माझे नातू (माझी वडील मुलगी कै. सईबाई हिचे मुलगे) चि. वसंत गणेश व चि. अनंत गणेश देवकुळे हे लहानपणापासून माझेजवळच असून त्यांचें शिक्षणही मीच केले आहे. त्यांनीं माझे छापखान्यांत काम करावें अशी माझी इच्छा असून तशी व्यवस्था मीं केली आहे. त्यांना विश्वस्तांनी दरमहा प्रत्येकीं साठ रुपये पगार द्यावा. मात्र त्यांनीं छापखान्याचे नियम व शिस्त पाळून रोज वक्तशीर येऊन काम केलें पाहिजे. त्यांनीं वक्तशीर काम केलें तरच त्यांना वरील पगार मिळावा. पुढें त्यांना पगार वाढविणें वगैरे त्यांच्या कामाच्या हुशारीवर व ट्रस्टींच्या मर्जीवर राहील. सदाशिव पेठेंतील घ. नं. २७२ या माझ्या राहत्या घरांतील आठ खणापर्यंत जागा चि. वसंत गणेश यांस व चार खणांपर्यंत जागा चि. अनंत गणेश यांस दरसाल नाममात्र एक रुपया भाडें घेऊन त्यांचे हयातीपर्यंत त्यांना स्वतःस राहण्यास द्यावी. सदर जागा त्यांना ज्या द्यावयाच्या त्या ट्रस्टींनी जागेच्या सोयीप्रमाणें द्याव्या. माझ्या या घरांत चि. वसंत गणेश व चि. अनंत गणेश यांस राहणें सोयीचें न वाटल्यास त्यांनीं बाहेर राहावें. ते बाहेर राहिल्यास त्यांस त्यांचे हयातीपर्यंत अनुक्रमें दरमहा रु. १० (अक्षरीं दहा) व रु. ५ (अक्षरीं पांच) भाड्याबद्दल म्हणून द्यावे. माझ्या कुटुंबातील इतर

मंडळींच्या व विद्यार्थ्यांच्या जेवणाची जी सोय आहे त्यांत चि. वसंतराव यांस व त्यांच्या कुटुंबांतील मंडळीस भाग घ्यावयाचा असल्यास त्यांनीं आपला होईल तो भोजनखर्च विश्वस्तांना दिला पाहिजे. चि. अनंतराव यांनीं लग्न होईपर्यंत त्यांना वाटल्यास वरील भोजनव्यवस्थेंत जेवीत जावे. चि. वसंत गणेश देवकुळे यांनीं मॅनेजर चित्रशाळा यांचे सहाय्यक (असिस्टंट मॅनेजर) म्हणून काम करावें. चि. अनंत गणेश देवकुळे यांना माझे मनांतून आम्हीं पूर्वी काढीत असलेल्या " चित्रमय कृषीवल " या मासिकाचे संपादक करावयाचे आहे. अनुकूल परिस्थिति येतांच ट्रस्टींनी हें मासिक पुनश्च सुरू करावें. तोंपर्यंत चि. अनंत गणेश यांनीं शेतकीविषयक पुस्तकें लिहावींत व ध्रुव मासिकाच्या शेतकी विभागाचें संपादन करावे. अर्थात् चित्रमय कृषीवल हें नवीन मासिक सुरू केल्यानंतर ध्रुवांत त्या विषयांवर लेख लिहिण्याचे त्यांना कारण उरणार नाहीं. तसेंच माझी नात कलावती इचे लग्नाप्रीत्यर्थ ट्रस्टींनीं माझे मिळकतींतून रुपये २०० (अक्षरीं दोनशें) खर्च करावेत.

[६] माझ्या नाती म्हणजे माझ्या पुतण्याच्या मुली चि. चंद्रू (चि. भिकाजी नरहर जोशी यांची मुलगी) व चि. सिंधु [चि. विष्णु नरहर जोशी यांची मुलगी] या दोघी शिक्षणाकरितां मजजवळच आहेत. त्यांचें शिक्षण व लग्न होईपर्यंत राहण्याजेवणाचा खर्च माझे मिळकतींतूनच व्हावा. त्यांचे लग्नाचे वेळीं त्यांना लग्नाप्रीत्यर्थ प्रत्येकीं शंभर रुपये मदत म्हणून देण्यात यावी. माझे नातू चि. नरहरी ऊर्फ बाळ (चि. वामन हरी जोशी यांचा मुलगा) व चि. प्रभाकर भिकाजी जोशी हे दोघेहि मजजवळ राहूनच शिक्षण घेत आहेत. त्यांचे वयाचे मानानें शिक्षण पुरें होईपर्यंत त्यांचे शिक्षणाचा व राहण्याचा खर्च सध्यां चालू आहे त्याप्रमाणें माझे मिळकतींतून होत राहावा. माझा दुसरा नातू चि. राजाराम भिकाजी जोशी हाहि लहानपणापासून माझेजवळच आहे. त्याचें शिक्षणपोषण वगैरे माझे खर्चानें माझेजवळच झालें आहे. तो इलेक्ट्रिक वायरमनचें काम व सुतारकाम या परीक्षांत पास झाला आहे. त्यानें माझे छापखान्यांत काम करावें अशी माझी इच्छा आहे. तरी विश्वस्तांनीं त्याचा योग्य उपयोग करून घ्यावा व त्याचे कामाचे मानानें त्यास पगार द्यावा. त्यालाहि माझे राहते घरांत दरसाल नाममात्र एक रुपया भाडें घेऊन दोन खण जागा स्वतःस राहण्यास द्यावी. त्याचा होईल तो भोजनखर्च त्यानें विश्वस्तांस द्यावा.

[७] माझे नातू चि. दामोदर त्र्यंबक जोशी हे दहा पंधरा वर्षें माझेजवळच असून माझेच छापखान्यांत काम करीत आहेत. त्यांना माझे नातू चि. वसंत गणेश व चि. अनंत गणेश देवकुळे यांचेप्रमाणेंच साठ रुपये पगार देण्यांत यावा. त्यांना माझे राहते घरांतील म्हणजे सदाशिव घ. नं. २७२ मधील आठ खणांपर्यंत जागा ट्रस्टींनीं आपल्या सोयीप्रमाणें दरसाल नाममात्र रुपया एक भाडें घेऊन त्यांना स्वतःस हयातीपर्यंत राहण्यास द्यावी. त्यांना या घरांत राहणें सोयीचें न वाटल्यास त्यांनीं बाहेर राहावें व तसें ते बाहेर राहिल्यास त्यांना दरमहा रुपये १० [अक्षरीं दहा] भाड्याबद्दल निराळे द्यावे. सध्यांच्या भोजन-व्यवस्थेंत चि. दासुअण्णा व त्यांचे कुटुंबांतील मंडळी यांनीं भाग घेतल्यास त्यांचे प्रीत्यर्थ होणारा खर्च त्यांनीं ट्रस्टींना द्यावा. सध्यांचे मॅनेजर माझे पुतणे रा. शंकर नरहर जोशी यांचे सेवानिवृत्तीनंतर चि. दामोदर त्र्यंबक जोशी यांना ट्रस्टींनीं चित्रशाळेचे मॅनेजर नेमावें व त्यांचे हुशारीप्रमाणें त्यांचे पगारांत योग्य ती वाढ करावी. चि. वसंत गणेश, चि. अनंत गणेश देवकुळे व चि. दामोदर त्र्यंबक जोशी यांनीं चित्रशाळेंत काम करणें ते विश्वस्तांचे देखरेखीखालीं व त्यांच्या तंत्रानेंच करावें. विश्वस्तांचें व त्यांचें न जमल्यास त्यांनीं काम करूं नये व विश्वस्तांनीं त्यांस कमी करावें. परंतु त्यांस कमी केलें तर त्यांना प्रत्येकीं दरमहा तीस रुपये पेन्शन म्हणून माझे मिळकतींतून मिळावे किंवा त्यांना वाटल्यास याऐवजीं त्यांनीं आपलें पेन्शन त्या वेळच्या त्यांच्या पगाराप्रमाणें सरकारी पेन्शन स्केलप्रमाणें विश्वस्तांकडून ठरवून घ्यावें.

[८] माझे पुतणे रा. शंकर नरहर जोशी हे गेलीं ४७ वर्षें चित्रशाळा छापखान्यांची सेवा करीत आले आहेत. या संस्थेस त्यांची बहुमोल मदत झाली आहे. त्यांचे हातून संस्थेचें काम होईल तोंपर्यंत त्यांना मॅनेजर म्हणून कामावर ठेवावें व त्यांचा पगार आहे तसाच चालू राहावा. वृद्धापकाळामुळें आतां आपल्या हातून काम होत नाहीं असें त्यांनीं सांगितल्यावरच त्यांना सेवानिवृत्त करावें. सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना त्यांचे हयातीपर्यंत दरमहा रु. १०० [अक्षरीं शंभर] पेन्शन म्हणून चित्रशाळेतून द्यावे. सध्यां ते माझे मालकीचे घर सदाशिव पेठ घ. नं. ९३७ बापट वाडा येथें राहात आहेत. आज ते राहात आहेत व हल्लीं वापरीत आहेत ती जागा त्यांचे हयातीपर्यंत त्यांचेकडे दरसाल नाममात्र एक रुपया भाडें घेऊन ठेवावी.

[९] माझे पुतणे रा. वामन हरी जोशी ऊर्फ पंडित यांच्या मौजें धोम, ता. वाई, जि. सातारा येथील दोन जमिनी, एक–सरकारी जिराईत जमीन दळेकचन रि. स. नं. ३१/८ व दुसरी– कीं ज्या [दोनशें रुपयांचा कागद, साठ रुपये हातउसनवार व कर्ज फेडण्याकरितां रुपये एक हजार श्री. दत्तोपंत कानिटकर यांस दिले ते असे सर्व मिळून रुपये बाराशें साठ या रकमेस] मजकडे गहाण आहेत, त्या गहाणखतान्वयें मला उत्पन्न होणारे सर्व हक्क चि. नरहर वामन जोशी व त्यांचे बंधु सदरील गहाण देणार यांचे चिरंजीव यांस ट्रस्टींनीं माझेतर्फे बक्षीस म्हणून कागद करून द्यावा. मात्र या जमिनी त्यांनीं किंवा त्यांच्या मुलांनीं विकतां अगर गहाण टाकतां उपयोगी नाहीं.

[१०] मौजें धोम येथील श्री नरसिंहाच्या बागेकरितां मदत म्हणून दरसाल वीस रुपये ट्रस्टींनीं देत जावे. मात्र बागेची व्यवस्था योग्य चालली आहे कीं नाहीं हे ट्रस्टींनीं चौकशी करून पाहात जावें.

[११] चित्रशाळा छापखाना माझे स्वतःचे मालकीचा स्वसंपादित आहे. सदर छापखाना व त्यांत निघणारीं मासिकें, पुस्तकें, चित्रें, वगैरेंचे मालकी हक्क आणि छापखान्याचे सर्व सामान, कागद, पुस्तकें, यंत्रें, कपाटें, वगैरे देणें–घेणें वजा जाता राहिलेल्या मिळकतीची व्यवस्था खालीलप्रमाणे करावी. त्याजबद्दल स्वतंत्र ट्रस्ट मी न केल्यास ट्रस्टींनी करावा. ज्या जागेंत चित्रशाळा छापखाना आहे ते घर व त्याचे शेजारील बापट वाडा हें घर माझे मालकीचें असोन तीं दोन्ही घरें जोंपावेतों चित्रशाळा छापखाना, प्रकाशनें वगैरे चालू आहेत तोंपर्यंत छापखान्याकडेच असावींत, त्याबद्दल दरसाल रुपये १५०० [अक्षरीं पंधराशें] भाडें म्हणून चित्रशाळेनें माझे खाजगीकडे देत जावें. या घरांची घरपट्टी वगैरे सर्व कर, दुरुस्ती, इमारतींत फेरबद्दल अगर नवें बांधकाम हें चित्रशाळेनें करावें. **चित्रशाळेस घरें नको असतील त्या वेळी तीं असतील तशीं माझे खाजगीकडे ताब्यांत द्यावीं.** सदर चित्रशाळेमार्फत सध्यां चार मासिकें चालू आहेत. तीं मासिकें माझ्या पूर्वींच्याच धोरणानें चालवावीं. त्यांत बदल करूं नये. मासिकें पूर्वींच्याच धोरणानें चालवावीं याचा अर्थ देशाच्या प्रचलित परिस्थितीनुरूप प्रचलित प्रश्नांची चर्चा त्यांत व्हावी, त्या परिस्थितींत भाग घ्यावा व त्याप्रमाणें मजकूर मासिकांत येत जावा. या मासिकांचे सध्यांचे जे संपादक आहेत ते जोंपर्यंत माझें मागील धोरण कायम ठेवतील तोंपर्यंत त्यांना त्या त्या मासिकांचे संपादक म्हणून कायम ठेवावें.

श्री. त्र्यं. र. देवगिरीकर हे सध्यां तुरुंगांत आहेत, ते परत आल्यावर संपादकाचें आपलें काम पाहूं लागतील. ते नौकरीवर असेपर्यंत त्यांचा पगार नेहमींप्रमाणें चालूं राहावा व त्यांच्या विम्याचे हप्ते आजपर्यंत चित्रशाळेनें भरले आहेत तसेच ते पुढेंहि भरत जावेत. चार मासिकांचे संपादक पुढीलप्रमाणें आहेत :–[१] चित्रमयजगत्–मराठी सं. त्र्यं. र. देवगिरीकर, [२] चित्रमयजगत्–गुजराथी सं. तुळजाशंकर गौरीशंकर याज्ञिक, [३] ध्रुव–सं. रा. प्र. कानिटकर, [४] शालापत्रक–सं. दामोदर पांडुरंग रानडे. या संपादकांनीं विश्वस्त जे नियम करतील त्याप्रमाणें वागलें पाहिजे. विश्वस्तांनीं हल्लींचें जें धोरण आहे तें कायम ठेवून मासिकें चालवावीं. मासिकें अगर मासिक आर्थिक अगर अन्य दृष्ट्या चालविणें अशक्य झाल्यास ती बंद करण्याचा अधिकार विश्वस्तांना आहे. तसेंच नवीं मासिके, वृत्तपत्रें, पुस्तकें वगैरे काढण्याचा व तीं चालविण्याचा अधिकार विश्वस्तांस आहे. केतकीपक्षीय चित्रशाळा पंचांग शके १८४६ पासून आजपर्यंत नफ्यातोट्याकडे न पाहतां चित्रशाळा स्वतःचे खर्चानें प्रसिद्ध करीत आहे, तसेंच तें पुढेंहि काढावें व त्याच्या प्रचाराचा प्रयत्न करावा.

चित्रशाळेची व्यवस्था करण्यास विश्वस्तांस पूर्ण हक्क आहे. नोकरांचे पगार कमी करण्याचा, वाढविण्याचा, त्यांस कामावरून काढण्याचा, प्रॉव्हिडंट फंडासारख्या योजना चालविण्याचा आणि नोकरवर्गाच्या सोयीसाठीं योग्य व कायदेशीर खर्च करण्याचा विश्वस्तांना हक्क आहे. चित्रशाळेचे हिशेब दर वर्षीं लायसेन्स्ड ऑडिटरकडून तपासून घ्यावेत.

[१२] कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं ज्या उद्देशानें प्रेरित होऊन चित्रशाळा संस्था काढली, त्या उद्देशानें मी ती संस्था आजपर्यंत चालविली. तोच उद्देश पुढें डोळ्यांपुढें ठेवून विश्वस्तांनीं माझ्या पश्चात् चालावें अशी माझी इच्छा आहे.

[१३] वरीलप्रमाणें देणग्या वगैरे देऊन जी काय माझी मिळकत उरेल ती व तिचें उत्पन्न यांचा विनियोग खालीं लिहिल्याप्रमाणें माझे इच्छेनुरूप व्हावा :–

चित्रशाळेच्या व्यवहारांतून जो नफा राहील त्यांतून $\frac{1}{4}$ [एक चतुर्थांश] रक्कम मी खालीं ठरविलेल्या योजनेकडे खर्च करावी. बाकीचा $\frac{3}{4}$ [तीन चतुर्थांश] नफा विश्वस्तांनीं आपले मर्जीप्रमाणें राजकीय, औद्योगिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यांकडे खर्च करावा. आधुनिक पद्धतीचें शेतीचें ज्ञान जनतेंत पसरविण्याकडे

विशेष लक्ष द्यावें. सदर नफ्यांतून चित्रशाळेकडे अगर अन्य कारणांकरितां पुण्यास येणाऱ्या पाहुण्यांच्या राहण्याभोजनाकरितां खर्च करावा. **चित्रशाळा चालविणें अशक्य झाल्यास त्या सर्व मिळकतीचें उत्पन्न मीं खालीं लिहिलेल्या बाबींकडे खर्च करावें.**

[१४] चित्रशाळेच्या व बापट वाड्याच्या व्यतिरिक्त माझ्या अन्य मिळकतीचें संरक्षण, दुरुस्ती, बांधणी वगैरेंचा खर्च, तसेंच माझे नातेवाइकांकरितां मीं वर निर्दिष्ट केलेला खर्च आणि **म्युनिसिपल व अन्य कर व डिप्रिसिएशनचा खर्च वजा जातां जें उत्पन्न उरेल तें व चित्रशाळेच्या नफ्यापैकीं येणारा एक चतुर्थांश असें उत्पन्न एकत्र करून त्या उत्पन्नाचे चार विभाग करावेत.** यांपैकीं एका विभागांतून ट्रस्टींना योग्य वाटेल अशा गरीब व होतकरू विद्यार्थ्यांस **शेतकी शिक्षणासाठीं म्हणून स्कॉलरशिप द्यावी.** मात्र अशा विद्यार्थ्यानें आपल्या शिक्षणाचा लाभ जरूरीप्रमाणें चित्रशाळा संस्थेस द्यावा. दुसरा भाग माझा नातू चि. अनंत गणेश देवकुळे यास तो शेतकीसंबंधानें कांहीं संशोधन करील तर त्या संशोधनाचे खर्चासाठीं द्यावा. सदर संशोधन त्यांनीं योग्य देखरेखीखालीं केलें पाहिजे व त्याबद्दल रिपोर्ट ट्रस्टींकडे दिला पाहिजे. त्यांच्या हातून हें न झाल्यास ट्रस्टींना योग्य वाटेल अशा दुसऱ्या कोणा संशोधकास शेतकीच्या संशोधनासाठीं वरील अटीवर मदत म्हणून द्यावी. माझा नातू चि. कृष्णाजी त्र्यंबक जोशी हा ॲग्रिकल्चर कॉलेजमध्यें गेल्यास त्याची कॉलेजची निम्मी फी चित्रशाळेनें द्यावी व शिक्षण पुरें होईपर्यंत त्यास दोन खण जागा माझे राहते घरांत राहण्यास द्यावी. उरलेले दोन भाग गरीब होतकरू विद्यार्थ्यांचे राहण्यासाठीं व त्यांच्या कलात्मक (ड्रॉइंग, पेन्टिंग वगैरे) शिक्षणासाठीं खर्च करावेत. या गरीब विद्यार्थ्यांच्या राहण्याजेवणाची सोय माझे घरांत म्हणजे सदाशिव २७२ मध्यें करावी. अर्थात् अशा विद्यार्थ्यांचा उपयोग शक्य तर चित्रशाळेकडेच करावा. मात्र अशा विद्यार्थ्यांनी सरकारी नोकरी करतां कामा नये, हें बंधन त्यांजवर राहावें. व त्याकरितां विश्वस्तांनीं योग्य ते नियम करावेत.

[१५] वरीलप्रमाणें माझ्या मिळकतीची व चित्रशाळेची माझे पश्चात् व्यवस्था करण्यास मी या मृत्युपत्रान्वयें खालील ट्रस्टी नेमीत आहें.

[१] हरी विठ्ठल तुळपुळे, वकील, एम्. एल. ए., शिवाजीनगर, पुणें ४.
[२] शंकर नरहर जोशी, हल्लींचे मॅनेजर चित्रशाळा, पुणें २.

[३] त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर, सं. चित्रमयजगत्, पुणें २.
[४] दामोदर त्र्यंबक जोशी, बी. ए. [टिळक], पुणें २.
[५] वसंत गणेश देवकुळे, बी. एस्सी. पुणें २.

हे जे मी ट्रस्टी नेमीत आहें त्यांपैकी एखादा **मरण पावल्यास अथवा एखाद्याची ट्रस्टी म्हणून काम करण्याची इच्छा नसल्यास त्याची जागा बाकीच्या ट्रस्टींनीं दुसऱ्या योग्य इसमाची निवड करून भरावी.** ट्रस्टींना त्यांच्या न्याय्य व कायदेशीर मेहनतीबद्दल मोबदला घेण्यास हरकत नाहीं.

[१६] याप्रमाणें माझ्या सर्व मिळकतीची व्यवस्था व्हावी व मी वर नमूद केलेल्या कारणांसाठीं वर नमूद केलेल्या उद्देशाने देणग्या वगैरे देऊन उरलेल्या उत्पन्नाच्या निरंतरचा ट्रस्ट वरील उद्देशासाठी, वर लिहिल्याप्रमाणे माझ्या पश्चात् व्हावा. चित्रशाळेसारखी केवळ ट्रस्टींनीं चालविलेली संस्था अत्यंत नांवारूपानें चालावी अशी माझी इच्छा आहे व ती माझे ट्रस्टी पुरी करतील अशी आशा करून मी हें माझें मृत्युपत्र पुरें करतों.

हे मृत्युपत्र मीं आज तारीख १७ सप्टेंबर १९४३ रोजीं आपल्या राजीखुषीनें व अक्कलहुशारीनें करून ठेवलें आहे. या मृत्युपत्रानें मी पूर्वी करून ठेवलेलीं सर्व मृत्युपत्रें रद्द करीत आहे.

हे मृत्युपत्र लिहिणार :—
ग. रा. पाटणकर.

वासुदेव गणेश जोशी, दस्तुर खुद्द.
ता. १७ सप्टेंबर १९४३.

साक्षीदार :—

जी. बी. जोशी, श्रीलक्ष्मी नरसिंह–भुवन, नं. ११७०|२१ बी.,
शिवाजीनगर, पुणें ५

विनायक शिवराम परांजपे, ६६ शुक्रवार, पुणें शहर.

डी. ए. फाटक, ऑनररी मॅजिस्ट्रेट, फर्स्ट क्लास, हवेली, पुणें.

या मृत्युपत्रांत वासुकाकांनी धोम येथील आपल्या वडिलोपार्जित शेत जमिनी, खेड येथील घरे, पुणे येथील घरे, बखळी व प्लॉट व चित्रशाळा छापखाना यांचा सविस्तर नामनिर्देश केला असून कोणत्या नातेवाईकाला काय द्यावे याची यादी दिली आहे. चित्रशाळा व मासिके कशी चालवावी याबद्दल वासुकाकांनी मृत्युपत्राच्या ११ व्या कलमात सविस्तर सूचना दिल्या आहेत. त्यांच्या जिंदगीची

व चित्रशाळेची त्यांच्या पश्चात् व्यवस्था पाहण्यास त्यांनी आपल्या मृत्युपत्रान्वये पुढील पाच ट्रस्टींची नेमणूक केली आहे :–(१) हरी विठ्ठल तुळपुळे, वकील, एम्. एल्. ए. शिवाजीनगर, पुणें ४. (२) शंकर नरहर जोशी, हल्लीचे मॅनेजर, चित्रशाळा, पुणें २. (३) त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर, संपादक चित्रमय जगत् पुणे २. (४) दामोदर त्र्यंबक जोशी, बी. ए. (टिळक), पुणें २. (५) वसंत गणेश देवकुळे. बी. एस्सी. पुणें २.

वासुकाकांच्या निधनोत्तर त्यांच्या मिळकतीची व्यवस्था करण्याचे काम मृत्युपत्रानुसार नेमलेल्या विश्वस्तांनी हाती घेतले. प्रथम ता. १३–१२–१९४४ रोजी रीतसर वारसापत्र (प्रोबेट) घेतले. त्यासाठी रु. १६,६१६ खर्च आला. ते घेताना वासुकाकांच्या मुलीचे मुलगे वसंत, अनंत व जयंत देवकुळे यांनी मृत्युपत्राला व प्रोबेटला विरोध केला. वासुकाकांना पुत्रसंतति नसल्यामुळे वासुकाकांच्या मुलीचे मुलगे म्हणून आपणच त्यांचे कायदेशीर वारस आहो, असे म्हणून वासुकाकांच्या इस्टेटीवर त्यांनी आपला हक्क सांगितला. पण वासुकाकांचे मृत्युपत्र हे रीतसर, कायदेशीर व भक्कम पायावर उभारलेले असल्यामुळे देवकुळे बंधूंच्या हरकती यशस्वी होऊ शकल्या नाहीत. या मृत्युपत्राला आणखी कोणीही विरोध केला नाही. या ठिकाणी आणखी एक महत्त्वाची गोष्ट नमूद केली पाहिजे. वासुकाकांनी हे मृत्युपत्र केले त्या वेळी ह. वि. तुळपुळे व त्र्यं. र. देवगिरीकर हे १९४२ च्या चळवळीत स्थानबद्ध होते. त्यामुळे वासुकाकांच्यावर त्यांचा प्रभाव पडण्याची शक्यताच नव्हती. वासुकाकांनी स्वयंस्फूर्तीने हे मृत्युपत्र केले हे निर्विवाद आहे.

वासुकाकांच्या मृत्युपत्रानुसार ता. ६–६–१९४९ रोजी ट्रस्ड डीड करण्यात आले. ते नोंदविण्याचा खर्च रु. ५,४१२ आला. मृत्युपत्राप्रमाणे दोन स्वतंत्र ट्रस्ट निर्माण केले. वासुकाकांच्या स्थावर मालमत्तेचा एक व चित्रशाळेच्या मालमत्तेचा दुसरा असे दोन ट्रस्ट स्वतंत्रपणे नोंदविण्यात आले.

पहिला ट्रस्ट व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट व दुसरा ट्रस्ट व्ही. जी. जोशी चित्रशाळा प्रेस ट्रस्ट या नावाने ते ता. २२–९–१९५२ रोजी नोंदविण्यात आले व त्यांना अनुक्रमे ई ६ व ई ७ असे नंबर देण्यात आले,

दोन्ही ट्रस्टची कार्यक्षेत्रे अगदी भिन्न असून त्यांचे उद्देशही वेगवेगळे आहेत. ई ६ हा व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट असून त्यात वासुकाकांची सर्व स्थावर

मालमत्ता चित्रशाळेच्या जागेसह समाविष्ट आहे. या इस्टेटीच्या उत्पन्नातून शेती संशोधनासाठी शिष्यवृत्या, चित्रकलेच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या, सार्वजनिक कार्याला देणग्या वगैरे द्याव्या, असे नमूद करण्यात आले आहे. धर्मादायासाठी या मालमत्तेचा विनियोग व्हावा, असे या ट्रस्टचे मुख्य उद्दिष्ट आहे. ई ७ हा व्ही. जी. जोशी चित्रशाळा प्रेस ट्रस्ट असून चित्रशाळा प्रेस चालविणे, मासिके चालविणे, पुस्तकांचे प्रकाशन करणे, गिऱ्हाइकांची छपाईची कामे करणे इत्यादी धंदेवाईक व व्यावसायिक कामे करणे असे ह्या ट्रस्टचे स्वरूप निर्देशित करण्यात आले आहे.

मृत्युपत्रान्वये केलेल्या ट्रस्ट डीडमध्ये २४ व्या कलमात असे नमूद करण्यात आले आहे की, ट्रस्टींना चित्रशाळा चालविता आली नाही तर ती जनरल ट्रस्टकडे देण्यात यावी.

प्रारंभापासून दोन्ही ट्रस्टचे ट्रस्टी एकच होते. प्रत्येक ट्रस्टचे वेगवेगळे नव्हते व दोन्ही ट्रस्टच्या सभा एकत्रच होत होत्या. १२–९–१९६८ पासून दोन्ही ट्रस्टच्या सभा स्वतंत्रपणे घेण्यास सुरवात झाली.

मृत्युपत्रात उल्लेखिलेले चित्रशाळेचे एक विश्वस्त शंकर नरहर जोशी ता. १०–२–१९४४ रोजी निधन पावल्यावर त्यांच्या जागी मुंबईच्या "नवा काळ" पत्राचे संपादक यशवंत कृष्ण खाडिलकर यांची ता. १२–२–४५ रोजी सर्वानुमते निवड करण्यात आली. आद्य विश्वस्तांपैकी एक विश्वस्त व ट्रस्ट बोर्डाचे अध्यक्ष ह. वि. तुळपुळे ता. १०–९–५७ रोजी मृत्यु पावले. तेव्हा त्यांच्या जागी दा. पां. रानडे यांना ता. १४–१०–१९५७ रोजी ट्रस्टी म्हणून घेण्यात आले. रानडे व खाडिलकर यांनी अनुक्रमे ता. १९–८–१९६४ व २–३–१९६६ रोजी राजीनामे दिले. तेव्हा वि. अ. पटवर्धन यांची ५–४–१९६६ ला विश्वस्त म्हणून नेमणूक करण्यात आली. म्हणजे ता. २७–९–१९६८ या दिवशी त्र्यं. र. देवगिरीकर, दा. त्र्यं. जोशी, व. ग. देवकुळे व वि. अ. पटवर्धन असे चौघेजण दोन्ही विश्वस्त निधींचे विश्वस्त होते. खाडिलकर व रानडे यांनी राजीनामे दिलेले असले तरी जून १९६९ पर्यंत त्यांची नावे जनरल ट्रस्टवर राहिलेली होती. ती दा. त्र्यं. जोशी यांच्या अर्जावरून काढण्यात आली व पटवर्धन यांचे नाव दाखल करण्यात आले. (चेंज रिपोर्ट नं. २९४ ता. १२–९–१९६९).

वासुकाकांच्या पाठोपाठ एक महिन्यातच चित्रशाळेचे मॅनेजर शंकर नरहर जोशी कालवश झाल्यामुळे वासुकाकांच्या मृत्युपत्राप्रमाणे दामोदर त्र्यंबक जोशी यांची चित्रशाळेचे मॅनेजर म्हणून नेमणूक झाली व ता. १४–२–११४४ रोजी चित्रशाळा प्रेसचे कीपर म्हणून त्यांनी कलेक्टरपुढे डिक्लेरेशन केले. त्या दिवसापासून दा. त्र्यं. जोशी यांनी चित्रशाळेची सर्व सूत्रे हाती घेतली व मृत्यु-पत्रानुसार व. ग. देवकुळे यांची असिस्टंट मॅनेजर म्हणून नियुक्ति झाली.

प्रकरण चौथे

चित्रशाळेतील एक ‘ प्रकरण ’

वासुकाकांच्या मृत्युपत्रानुसार चित्रशाळेची व्यवस्था जरी विश्वस्तांच्या हाती गेली तरी चित्रशाळा प्रेसचा दैनंदिन कारभार करण्याची सत्ता व्यवस्थापकांकडे आली. जोशी हे मुख्य व्यवस्थापक होते व देवकुळे हे दुय्यम व्यवस्थापक होते. पण आश्चर्याची गोष्ट ही की हे दुय्यम व्यवस्थापक आपणच मुख्य व्यवस्थापक आहो, अशा पद्धतीने प्रथमपासूनच वागू लागले. त्यांना त्यांच्या दर्जाप्रमाणे काम नेमून दिले होते तरी ते मुख्य व्यवस्थापकांच्या प्रत्येक कामात हस्तक्षेप करू लागले. तेव्हा साहजिकच व्यवस्थापकांना त्यांच्याविरुद्ध विश्वस्तांकडे तक्रार करणे भाग पडले. विश्वस्तांनी दोघांचे म्हणणे ऐकून सबूरी करण्याचा सल्ला दिला. तरी देवकुळे यांची वागणूक बदलली नाही. तथापि देवकुळे यांचे वागणे जेव्हा प्रमाणाबाहेर गेले तेव्हा १९५० साली चित्रशाळेचे मुख्य विश्वस्त ह. वि. तुळपुळे यांनी देवकुळे यांना सहा महिने सक्तीची रजा द्यावी असा निर्णय घेतला.

चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या सभांचे अहवाल पाहिले तर १९४६ साली किंवा त्यापूर्वीही देवकुळे यांच्याविरुद्ध मॅनेजर जोशी यांच्या तक्रारी सुरू झाल्या होत्या. ता. २७-११-४८ रोजी चित्रशाळेचे हिशेबनीस कांबळे यांनी देवकुळे यांच्या विरुद्ध तक्रार केली होती. देवकुळे यांच्याविरुद्ध मॅनेजर जोशी यांनी अनेक तक्रारी विश्वस्तांच्या सभेत वेळोवेळी मांडल्या होत्या. पण विश्वस्त मंडळाचे दोघे सदस्य ह. वि. तुळपुळे व त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या सहानुभूतीचा फायदा देवकुळे यांना मिळाला व त्यांना सहा महिने भरपगारी रजा देण्यात आली. या प्रकरणी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष ह. वि. तुळपुळे यांनी व. ग. देवकुळे यांना जे पत्र लिहिले होते ते वाचले असता देवकुळे यांच्या वर्तनावर यथार्थ प्रकाश पडतो. म्हणून त्यासंबंधी अधिक काही न लिहिता ते पत्रच पुढे उद्धृत करीत आहे :

ह. वि. तुळपुळे, चित्रशाळा ट्रस्ट बोर्डाचे अध्यक्ष, यांचे पत्र

“ श्री. व. ग. देवकुळे,
असि. मॅनेजर, चित्रशाळा, पुणे, यांस—

तुम्ही पाठविलेले पत्र विश्वस्तांच्या सभेत वाचण्यात आले व त्यावर विचार करण्यात आला. त्याचबरोबर श्री. दामुअण्णा जोशी यांनीही पाठविलेल्या पत्राचा विचार केला गेला. तुमच्या पत्रावरून तुमच्यासंबंधी केलेल्या तक्रारींचे निराकरण होत नाही. त्या तक्रारींचे निराकरण करण्यास तुम्ही स्वत: हजरही राहिला नाहीत.

तुमच्या पत्रात तुम्ही स्वतः मॅनेजरच्या हाताखाली दुय्यम जागेवर (Subordinate) आहा याचीही दखल घेतली नाही. त्याचप्रमाणे गेल्या बैठकीत तुम्ही आपण होऊन चित्रशाळेची जबाबदारी घेण्यास मी तयार आहे, असे म्हटले असता कोणा तरी सभासदाने 'तुम्ही संघाचे काम सोडावयास, नवी जबाबदारी घेतल्यावर तयार व्हाल का', असा सहज प्रश्न विचारला. त्यात तुमची निष्ठा चित्रशाळेकडे जास्त का संघाकडे जास्त हे समजून घेण्याचा हेतू होता. तुम्ही संघाचे कार्य सोडण्यास नकार दिलात. यापलीकडे या बैठकीत या संबंधात जास्त काही झाले नाही. तुम्ही त्यासंबंधी विश्वस्तांचा आग्रह अमुक अमुक होता असे जे म्हटले आहे ते खोटे आहे.

आम्ही विश्वस्त एकमताने आपणांस कळवू इच्छितो की, तुमची चित्रशाळेत असिस्टंट मॅनेजर म्हणून असलेली नोकरी ही वुइलमध्ये म्हटल्याप्रमाणे विश्वस्तांचे व तुमचे पटेपर्यंतच राहाणार आहे. विश्वस्तांचे व तुमचे न पटल्यास ते तुम्हांला कमी करू शकतील. तुम्ही गेल्या बैठकीत मॅनेजरनी नियम वगैरे करावे असे म्हटले होते. असे नियम हाताखालच्या एकाद्या नोकराबद्दल कोणीही करीत नाही. सर्व नोकरवर्गाचे जे नियम तेच त्याला ही लागू असतात.

श्री. दामुअण्णा जोशी मॅनेजर यांनी आज गेली ५-६ वर्षे तुमच्या कामासंबंधी व तुमच्या वर्तनासंबंधी अनेक वेळा ट्रस्टींच्या पुढे तक्रारी केल्या. पण ट्रस्टींनी तुमचे व त्यांचे कालांतराने जमेल या आशेवर आजपर्यंत कोणताही निर्णायक ठराव केला नाही. २९–६–४६ व २३–११–४६ रोजी तुमच्या हजेरीत झालेल्या ठरावात तुम्ही मॅनेजर सांगतील तसे वागावे असे एकमताने ठरले, पण त्याची अंमलबजावणी तुमच्याकडून होत नाही असा अनुभव आलेला आहे. तरी तुमच्यासंबंधी मॅनेजरनी केलेल्या लेखी व तोंडी तक्रारींचा अधिक विचार करणे आम्हांला जरूर वाटत आहे. तुमच्याविरुद्ध तक्रारी असल्यामुळें त्यासंबंधीची चौकशी व विचार करण्याच्या कामात तुम्ही कामावर

असणे इष्ट नसल्यामुळे तुम्हांला भरपगारी सहा महिन्यांची रजा देण्यात येत आहे. सहा महिन्यांच्या मुदतीनंतर ट्रस्टी तुम्हाला निकाल कळवितील.

कळावे.

आपला,

ह. वि. तुळपुळे
अध्यक्ष, चित्रशाळा ट्रस्ट बोर्ड
(ता. ३–६–५०)

या बाबतीत ट्रस्टींच्या सभेत पुढील ठराव करण्यात आला :—

श्री. दामुअण्णा जोशी यांनी असिस्टंट मॅनेजर श्री. वसंतराव देवकुळे यांच्यासंबंधी केलेल्या तक्रारींचें पत्र वाचण्यात आले. या तक्रारी श्री. वसंतराव देवकुळे यांच्यासंबंधी असल्यामुळे त्या तक्रारींच्या चौकशीच्या व विचाराच्या काळात त्यांनी नोकरीवर असणे इष्ट नसल्यामुळे त्यांना सहा महिन्यांची भरपगारी रजा देण्यात येत आहे. ट्रस्टींचा निकाल त्यांना सहा महिन्यांत कळविला जाईल. ह्या प्रकरणाची चौकशी करून त्यांचा अहवाल ट्रस्टींच्या पुढे ठेवण्यासाठी श्री. भाऊसाहेब तुळपुळे यांना अधिकार देण्यात येत आहे.

(ता. ३–६–५०)

पुढे ३१–१२–१९५० रोजी ट्रस्टींची जी बैठक झाली त्या बैठकीत भाऊसाहेब तुळपुळे यांनी चौकशीचा अहवाल सभेपुढे मांडला व त्यानंतर पुढील ठराव करण्यात आला :–

" मॅनेजर जोशी यांनी असिस्टंट मॅनेजर देवकुळे यांच्याविरुद्ध केलेल्या तक्रारींसंबंधीचा अहवाल ही सभा एकमताने मंजूर करीत आहे. भाऊसाहेबांच्या अहवालात नमूद केलेल्या आक्षेपांची पुनरावृत्ती होणार नाही असे वसंतराव देवकुळे यांनी आश्वासन दिले. ते लक्षात घेऊन ता. १ जानेवारी १९५१ पासून देवकुळे यांनी कामावर हजर व्हावे, असे ही सभा ठरवीत आहे.

देवकुळे यांनी असे आश्वासन देऊनही ते प्रामाणिकपणे पाळले नाही, व त्यांच्या वर्तनात जसा पाहिजे तसा बदल झाला नाही, हे दुर्दैव होय.

प्रकरण पांचवे

देवगिरीकरांचा राजीनामा

वासुकाकांच्या निधनानंतर त्यांच्या सर्व जिंदगीचा कारभार विश्वस्तांच्या हाती आला व त्यांनी ता. १२-१-१९४४ ते ता. २७-९-१९६८ पर्यंत कसा कारभार केला व वासुकाकांचे इच्छापत्र कोणत्या प्रकारे अंमलात आणले त्याचा येथे सविस्तर इतिहास देण्याचे कारण नाही. एक तर हा कारभार एका दृष्टीने एकमताने चालला होता व दुसरे म्हणजे चॅरिटी कमिशनर यांना पाठविलेल्या निवेदनात ट्रस्टींच्या २४ वर्षांच्या कारकीर्दीचे समग्र इतिवृत्त आले आहे. चॅरिटी कमिशनर यांनी चित्रशाळेच्या हिशेबासंबंधी काही खुलासा मागविला होता तो या निवेदनात दिला आहे. हे निवेदन परिशिष्टात पाहावयास मिळेल. या दोन तपांच्या कालखंडात ' चित्रशाळा भवन ' ही सुमारे पाच लाखांची इमारत बांधण्यात आली व चित्रशाळेच्या मागील बाजूचे नूतनीकरण करून स्थावर मालमत्ता वाढविण्यात आली. ' चित्रशाळा भवन ' ह्या तिमजली इमारतीच्या निर्मितीचे श्रेय मुख्यतः देवगिरीकरांना आहे व ते त्यांना निर्विवादपणे दिले पाहिजे. त्यांनी पुढाकार घेऊन योजकता दाखविली म्हणूनच लक्ष्मीरोडवर ही प्रचंड वास्तू उभी राहिली.

वासुकाकांच्या हयातीतच चित्रशाळा ही राष्ट्रीय संस्था बनली होती व त्यांच्यानंतर त्यांच्या मृत्युपत्रानुसार तिचे हे राष्ट्रीय स्वरूप कायम ठेवून ती विशिष्ट ध्येयाने व विशिष्ट धोरणाने चालविण्याची जबाबदारी वासुकाकांनी नेमलेल्या विश्वस्तांवर येऊन पडली. या विश्वस्तांनी छापखाना चालविताना, मासिके चालविताना अगर नवीन प्रकाशने हाती घेताना वासुकाकांचे धोरण जवळजवळ पूर्णपणे अंमलात आणले, असे म्हणण्यास हरकत नाही. त्याचप्रमाणे चित्रशाळेची सार्वजनिक प्रतिष्ठा कायम ठेवण्याच्या कामी विश्वस्तांनी कसूर केली नाही. विश्वस्त मंडळाचे पहिले अध्यक्ष हरिभाऊ तुळपुळे हे जुने काँग्रेस कार्यकर्ते होते. पुणे जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते, तुरुंगात जाऊन आले होते व कायदेमंडळाचे सभासदही होते. विश्वस्त-

मंडळाचे दुसरे अध्यक्ष व चित्रमय जगत्चे संपादक त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या सार्वजनिक कार्याचा आढावा घेतला तर त्यांच्यामुळेही चित्रशाळेचे राष्ट्रीय स्वरूप अधिकाधिक उज्ज्वल झाले असे म्हणता येईल. ते महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते, काँग्रेसच्या वर्किंग कमिटीत त्यांची नेमणूक झाली होती, ते सात वेळा तुरुंगात जाऊन आले होते, ते पहिल्या लोकसभेत होते व दहा वर्षे राज्यसभेचे सदस्य होते. पुढे ते महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष झाले. त्यांच्या प्रतिष्ठेचा चित्रशाळेला अनेक दृष्टींनी व्यावहारिक उपयोग झाला. त्यांच्यामुळे चित्रशाळेचे नाव दिल्लीपर्यंत जाऊन पोचले. चित्रशाळेत काही काळ सरकारी व सार्वजनिक संस्थांची कार्यालये होती. महाराष्ट्र सरकारच्या स्वातंत्र्येतिहास समितीची कचेरी दोन-तीन वर्षे चित्रशाळेत होती. त्याचप्रमाणे गांधी स्मारक निधीचे कार्यालय प्रारंभापासून चित्रशाळेतच होते. अनेक सार्वजनिक कार्यकर्ते चित्रशाळेला भेट देत व विचारविनिमयासाठी तेथे जमत. काँग्रेसच्या घडामोडी, गोवा सत्याग्रह वगैरे अनेक गोष्टींची तेथे चर्चा चाले. यावरून चित्रशाळेचे राष्ट्रीय स्वरूप वासुकाकांच्या मूळ ध्येयधोरणाप्रमाणे कायम होते, इतकेच नव्हे तर वर्धिष्णुही होते, हे कोणालाही मान्य करावे लागेल.

चित्रशाळेचे धोरण व प्रतिष्ठा

चित्रशाळेच्या विश्वस्तांनी ज्याप्रमाणे लक्ष्मीरोडवर ‘ चित्रशाळा भवन ’ ही इमारत बांधली व विश्वस्त निधीप्रमाणे तिचा विनियोग केला, त्याप्रमाणे विश्वस्तांनी सार्वजनिक कार्यालाही देणग्या दिल्या. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या चिपळूणकर सभागृहाला एक हजार रुपयांची देणगी दिली व पुणे विद्यापीठाला विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे भव्य तैलचित्र नजर केले. वासुकाकांनी आपल्या मृत्युपत्रात लिहून ठेवल्याप्रमाणे विश्वस्त वागले व त्यांनी वासुकाकांचे धोरण पाळण्याचे व चित्रशाळेची प्रतिष्ठा राखण्याचे आपले कर्तव्य चोखपणे बजावले, असेच कोणालाही निर्विवादपणे कबूल करावे लागेल.

मासिकांच्या बाबतींतही विश्वस्तांनी व संपादकांनी कै. वासुकाकांनी आपल्या मृत्युपत्रांत निर्दिष्ट केलेलें धोरण अत्यंत निष्ठेने व तंतोतंतपणे पाळले, हे कोणालाही नाकारता येणार नाही. ‘ चित्रमय जगत् ’ मासिकाला ह्या ध्येयनिष्ठेपायी कोणत्या संकटमय अवस्थेतून जावे लागले व किती नुकसान सोसावे लागले याचा इतिहास

दुसऱ्या प्रकरणात सविस्तरपणे दिला आहे. विश्वस्तांनी चॅरिटी कमिशनर यांना पाठविलेल्या खुलासापत्रात म्हटल्याप्रमाणे चित्रमय जगत् हे मासिक सर्वसामान्य जनतेस राजकीय शिक्षण देण्यासाठी ध्येयनिष्ठेने चालविण्यात येत होते. चालकांनी नफ्याची दृष्टी न ठेवता नुकसान सोसूनही हे मासिक ५९ वर्षे नेटाने चालविले व त्यायोगे एक श्रेष्ठ दर्जाचे देशकार्यच केले असे म्हटले पाहिजे. त्याबरोबर संपादकही अल्पवेतनावर ध्येयबुद्धीने काम करीत होते, याचीही जाणीव ठेवण्यात आली पाहिजे. मासिकांचे ध्येय व धोरण अत्यंत कटाक्षाने संभाळण्यात संपादकांनी कसूर केली नाही. चित्रशाळेचे राष्ट्रीय स्वरूप उत्तरोत्तर संवार्धित करण्याच्या कामी 'चित्रमय जगत्' मासिक खास अंकांच्या रूपाने सहाय्यभूत झाले याचाही या संदर्भात उल्लेख करणे अवश्य आहे. 'चित्रमय जगत्' बंद होईपर्यंत चित्रशाळेची अशी परिस्थिती होती व या परिस्थितीतूनच विश्वस्त मंडळ वाटचाल करीत होते. 'चित्रमय जगत्' मासिक बंद करण्यात आल्यानंतर मात्र सर्व परिस्थिती बदलली.

या सर्व काळात दा. त्र्यं. जोशी हे चित्रशाळेचे मुख्य व्यवस्थापक व व. ग. देवकुळे दुय्यम व्यवस्थापक होते. पण १९६६ साली देवकुळे यांच्या हाती सर्व कारभार येताच त्यांनी आपला अधिकार गाजविण्यास सुरुवात केली. त्यांचे वर्तन इतर विश्वस्तांना मान्य नव्हते. "चित्रशाळा भवनाची" ची मालकी चित्रशाळा प्रेसकडे आहे असे देवकुळे यांचे म्हणणे होते. पण इतर विश्वस्तांचे तसे मत नव्हते. म्हणून सर्वानुमते असे ठरले की, कोर्टामार्फतच भवनाची मालकी ठरवून घ्यावी. त्याप्रमाणे ता. १२–९–१९६८ रोजी डिस्ट्रिक्ट कोर्टात अर्ज करण्यात आला. त्या वेळी त्र्यं. र. देवगिरीकर, दा. त्र्यं. जोशी, व ग. देवकुळे व वि. अ. पटवर्धन हे चौघेजण दोन्ही विश्वस्त मंडळांचे सदस्य होते.

१९६८ च्या जानेवारीत "चित्रमय जगत्" मासिक विश्वस्तांनी बंद केल्यानंतर काही महिन्यांनी देवकुळे यांनी देवगिरीकर यांच्यावर आरोप करणारे एक अपमानास्पद पत्र ट्रस्टींना लिहिले. त्यामुळे व देवकुळे यांच्या एकूण व्यवहारास कंटाळून चित्रशाळा प्रेस ट्रस्ट बोर्डाचे अध्यक्ष त्र्यं. र. देवगिरीकर यांनी ता. २७–९–१९६८ रोजी चित्रशाळा प्रेस ट्रस्टचा राजीनामा दिला व फक्त जनरल ट्रस्टचेच काम पाहण्याचा निर्णय घेतला.

देवगिरीकरांचे राजीनाम्याचे पत्र

देवगिरीकर यांनी आपल्या राजीनाम्याचे पत्र दा. त्र्यं. जोशी, सेक्रेटरी चित्रशाळा ट्रस्ट बोर्ड, यांना उद्देशून लिहिले होते. ते पुढीलप्रमाणे आहे :—

चित्रशाळा प्रेस, पुणे २.
ता. २७–९–१९६८

श्री. दामुअण्णा जोशी,
चिटणीस, चित्रशाळा प्रेस ट्रस्ट, पुणे....यांसी—

मी या पत्रद्वारा चित्रशाळा प्रेसच्या विश्वस्तनिधीचा राजीनामा देत आहे. त्यांत सभासदत्व व अध्यक्षपद दोन्हींचा अंतर्भाव होतो. १ ऑक्टोबरपासून माझा चित्रशाळा छापखान्याशी संबंध उरला नाही.

वास्तविकपणे १ जानेवारी १९६८ लाच माझा राजीनामा ट्रस्टींनी स्वीकारावयास पाहिजे होता. पण मला १ वर्षे थांबा असे सांगण्यात आले. ज्या वेळी चित्रमय जगत् बंद करण्याचे ठरले, तेव्हां मला या निधिविषयीं रस उरला नाहीं. मी या संस्थेत जो आलो, तो कांहीं राष्ट्रीय दृष्ट्या कार्य करण्यास संधि मिळावी म्हणून आलो. पण चित्रमय जगत् बंद झाल्यानंतर मला येथे राहण्याचे कारणच उरले नाहीं. मूळ संस्थापकांचा हेतू विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी ज्या उद्देशानें ही संस्था काढली, तो हेतू साध्य करावा असा होता. १९६८ च्या सुरुवातीपर्यंत त्या दिशेने मी काम केले. चित्रमय जगत् युयुत्सु वृत्तीने चालविले जात होते. हिंदी स्वातंत्र्याला पोषक असे कमीत कमी २०–२५ खास अंक काढले. ते मी एकट्याने काढले व त्याकरतां जिवाचे रान केले. सरकारी रोष पत्करला. माझ्या घराच्या त्या करता झडत्या झाल्या. काही खास अंक जप्त झाले. एक दोन वेळां जामिनक्याही भराव्या लागल्या. या संस्थेचा एक सेवक म्हणून व संस्था राष्ट्रीय वृत्तीची म्हणून मी ५–६ वेळां तुरुंगवासही सोसला. अर्थात हा देहदंड स्वखुषीनें मी पत्करला. संस्थेने मला तसें सांगितले नव्हते व संस्थेने माझ्याकरतां कांहीं झीजही सोसली नाहीं. माझ्या त्यागाचे मोल मी कधीं अपेक्षिले नाहीं, पण माझ्या त्यागामुळे संस्थेबद्दल एक अभिमानास्पद वातावरण व लौकिक निर्माण झाला. त्याचे श्रेय किंवा अपश्रेय ज्याला जसे द्यावयाचे असेल तसे द्यावे.

चित्रमय जगत् हे एक ध्येयवादी मासिक होते. त्यांत नफ्यातोट्याचा विचार नव्हता. तोटा आला तरी मूळ संस्थापकांच्या वृत्तीशी प्रामाणिक राहावे ही जशी माझी वृत्ती होती, तशी माझ्याबरोबर विश्वस्त म्हणून काम करणाऱ्या अन्य विश्वस्तांची होती. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. त्यांना त्याबद्दल पश्चात्ताप न वाटता अभिमानच वाटेल. मी हे मासिक चालवितांना मूळ संस्थापकांच्या उद्देशाशी कधीही बेईमान झालो नाहीं. मी काँग्रेसचा होतो, तरी काँग्रेसवर प्रखर टीका करण्यास मागेपुढे पाहिले नाहीं. पण आमचा हा ध्येयवाद अर्थवादाशी जमला नाहीं. मी धंदेवाईक म्हणून या संस्थेत आलो नाहीं व कै. वासुकाकांची ती दृष्टी असती, तर मी कधीही संस्थेत आलो नसतो. त्यांना माझ्यापासूनच्या अपेक्षा धंदेविषयक नाहींत हे अनेक वेळा मी बोलून दाखविले होते. धंद्याची बाजू सांभाळणे ही कामे मॅनेजर व असिस्टंट मॅनेजर यांच्याकडे होती. जर मासिकाच्या स्वरूपांत, ध्येयात व उद्देशांत बदल केला असता तर हे मासिक इतर मासिकांप्रमाणे चालले असते. तेव्हां आर्थिक बाजू त्यांना सावरता आली नसली तर तो त्यांचा दोष नाहीं. त्यांनाही उद्देशाबाहेर जाता आले नाही. परिस्थिती बदलते. अभिरुची बदलते. नव्या समस्या निर्माण होतात, नव्या अपेक्षा जन्म पावतात. सरकारी व निमसरकारी आश्रयस्थाने शोधावी लागतात. सरकारी आश्रय मिळतो, पण अभिमान गमवावा लागतो व वेडेवाकडे प्रकार करावे लागतात. त्यांपैकीं कांहींही चित्रमय जगतने केलेले नाहीं. त्याचा अंत झाला असला तरी त्यानें आपल्या अभिमानास्पद कार्याला गालबोट लागूं दिले नाहीं. चित्रशाळा प्रेस, चित्रशाळा प्रकाशन व मासिके हे सर्व एकत्र मानण्यात आले आहेत. एकातला तोटा दुसऱ्यातून भरून काढावा ही दृष्टी. काही वर्षे छापखाना व प्रकाशने ही अर्थलाभ करून देत. पण ह्या तिहींचा समतोल केव्हांपासून व कां ढासळूं लागला याची कारणे विद्यमान व्यवस्थापक श्री. दामुअण्णा जोशी हे देऊं शकतील. पण कांहीं ढोबळ गोष्टी मीही सांगू शकेन.

मी १९४४ साली सुटून आल्यानंतर जुन्या यंत्रसामुग्रीवर भागणार नाहीं, असे मॅनेजर सांगू लागले म्हणून आम्ही (१) मिले मशिन (रु. २०,०००|–) (२) जपानी मशिन (रु. १०,०००/–) (३ व ४) कटींग व स्टिचिंग मशिन (रु. १०,०००/–) (व ५) ऑफसेट मशिन (रु. २०,०००/–) अशी

सुमारें ६०–६५००० रुपयांची नवी यंत्रे आणली. याशिवाय इतर किरकोळ यंत्रेही घेतली. सुमारें एक लाख रुपयांची नवी यंत्रसामुग्री आम्ही घेतली. अलिकडे श्री. वसंतराव देवकुळे यांच्या आग्रहाने सुमारें १०,०००/– रुपयांचे वॉर्निशिंग मशिनही घेतले. पण हे सर्व नवे साहित्य खरेदी करतांना खर्च वाढत चालला. प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅज्युइटी, बोनस, महागाई भत्ता, कामगार इन्शुरन्स, वॉररिस्क इन्शुअरन्स, पगारवाढ वगैरे खर्च वाढत चालले. शहरांत नव्या छापखान्यांची व चढाओढींची भर पडली. कामगारवर्ग हाही रंजीस आला. गिऱ्हाईक वाढत्या दराने पैसे देण्यास नाखूष असतात. ते दुसरीकडे जातात. गिऱ्हाइके तुटताना कामाच्या सुबकपणाची तुलना होते. या सर्व गोष्टींना तोंड देणे अशक्य नव्हते. पण त्याकरतां लक्षावधी रुपये भांडवल घालावे लागले असते. हुकुमी गिऱ्हाइकांचा तुटवडा हेही एक कारण होते.

प्रकाशनाने काही पाठ्यपुस्तके मिळवून परिस्थितीशी टक्कर दिली. चित्रशाळेच्या पुस्तकांच्या साठ्यांत भर पडली. त्याची दर्शनी किंमत ५–६ लाख रुपयांच्या घरांत आहे. भांडवल गुंतुन पडते व त्यामुळें नवी प्रकाशने काढणें कठीण होत गेले. ह्याहि परिस्थितींत आम्ही टिकाव धरून वर येऊ शकलो असतो. पण विश्वस्तांत जो सलोखा व जे सहकार्य पाहिजे होते ते उपलब्ध न झाल्यामुळे नवे नवे प्रश्न निर्माण झाले. याहि परिस्थितीत संस्था टिकविणे व वाढविणें अशक्य नाहीं. पण त्याकरितां विश्वस्त मंडळींत एकमत पाहिजे. ते नसल्यामुळे मी व माझे सहविश्वस्त आम्ही दूर होण्याचे ठरविले.

मला शेवटी एकाच गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. कै. वासुकाका जोशी यांचा इच्छापत्र करताना एकच उद्देश होता. आपल्या मिळकतीतून सार्वजनिक कार्याकरतां धर्मादाय (चॅरिटी) केल्या जाव्यात. तो उद्देश पुढें ठेवून मी व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट करितां ५॥ लाख किंमतीच्या इमारती बांधल्या. ते कर्ज ठेवींच्या स्वरूपात भाडेकरूकडून घेतले आहे व ते भाड्यातून फिटणारे आहे. सुमारें १२ ते १५ वर्षें त्याला लागतील. भाड्यांपैकीं ४० टक्केपर्यंत महापालिकेचा कर त्यावर द्यावा लागतो.

माझ्या राजीनाम्याच्या या पत्रांत मी खरीखुरी परिस्थिती अत्यंत संयमाने मांडली आहे. नव्या विश्वस्तांना आमच्यापेक्षा अधिक धडाडीने छापखाना चालविता येईल. त्यांना परमेश्वर यश देवो अशी इच्छा व प्रार्थना करून मी हे

निवेदन संपवितो.

आपला,
त्र्यं. र. देवगिरीकर

ता. क. नव्या विश्वस्तांनी जरा सावधगिरीनें वागावे म्हणजे सर्व ठीक होईल. परस्परांनी परस्परांच्या सद्हेतूबद्दल शंका घेऊ नये.

त्र्यं. र. देवगिरीकर

स्वीकृती :—
ता. २७–९–६८
सही : दा. त्र्यं. जोशी,
सेक्रेटरी
चित्रशाळा प्रेसट्रस्ट
सही : व. ग. देवकुळे,
विश्वस्त.
२७–९–६८

[खरी नक्कल]

राजीनाम्याने झालेला स्फोट

देवगिरीकरांचा राजीनामा म्हणजे एक भयंकर भूकंपच ठरला! त्याने इतकी खळबळ उडविली की पुढील चार वर्षे कोर्टकचेऱ्यांना त्याच्या शिवाय दुसरा वादाचा विषयच मिळाला नाही! हा राजीनामा उर्वरित ट्रस्टींपैकी काहींना वरदानासारखा वाटला असेल. कारण देवगिरीकर एकदा गेले म्हणजे आपल्याला हवे ते करता येईल असे कोणाला वाटले असेल. आणि ते स्वाभाविकच होते. कारण देवगिरीकर विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष असेपर्यंत कोणाला काही भलते-सलते करता येत नव्हते. पण देवगिरीकर दोन्ही ट्रस्टमधून निवृत्त झाले नव्हते. फक्त त्यांनी चित्रशाळा प्रेस ट्रस्टचा राजीनामा दिला व चित्रशाळा प्रेसशी असलेला आपला संबंध तोडला. पण व. ग. देवकुळे हे अधिक कायदेबाज निघाले व देवगिरीकर यांनी दोन्ही विश्वस्त निधींचा राजीनामा दिला आहे असे म्हणून कायदेशीर हरकती काढू लागले. देवगिरीकरांनी दोन्ही ट्रस्टचा राजीनामा दिलेला आहे अशा आशयाचा पहिला चेंज रिपोर्ट देवकुळे यांनी अ. चॅरिटी

कमिशनरकडे पाठविला. तो अ. ॲरिटी कमिशनरनी फेटाळल्यावर त्यांनी डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे धाव घेतली. देवकुळे यांनी तेव्हापासून कोर्टकचेऱ्या करण्याशिवाय जणू दुसरा उद्योगच केला नाही असे म्हटल्यास चालेल. आपला मुद्दा शाबीत करण्यासाठी देवकुळे यांनी कोर्टाची व वकिलांची घन केली व चित्रशाळेचा पैसा नाहक खर्ची घातला.

चॅरिटी कमिशनरकडे पहिला अर्ज

चित्रशाळा प्रेस ट्रस्टचे एक विश्वस्त व. ग देवकुळे यांनी असिस्टंट चॅरिटी कमिशनर, पुणे विभाग, यांच्याकडे ता. ५–१०–६८ रोजी अर्ज पाठवून त्यांना असे कळविले की, त्र्यं. र. देवगिरीकर, वि. अ. पटवर्धन, य. कृ. खाडिलकर व दा. पां. रानडे या चौघा ट्रस्टींनी राजीनामे दिले असल्यामुळे दोन्ही ट्रस्टमधून त्यांची नावे काढून टाकावी व ज. ग. देवकुळे यांचे नाव नवे ट्रस्टी म्हणून दाखल करावे. (चेंज रिपोर्ट नं. ३३८). त्या अर्जात त्यांनी असे कळविले की ता. २–१०–१९६८ रोजी झालेल्या ट्रस्टींच्या सभेत देवगिरीकर व पटवर्धन यांचे राजीनामे मंजूर करण्यात आले व ज. ग. देवकुळे यांना नवे ट्रस्टी म्हणून घेण्यात आले.

व. ग. देवकुळे यांचे म्हणणे असे की, एका ट्रस्टचा राजीनामा दिला की दोन्ही ट्रस्टचा आपोआपच राजीनामा दिला जातो, त्याचप्रमाणे एका ट्रस्टवर दुसरा ट्रस्टी घेतला म्हणजे तो दुसऱ्याही ट्रस्टचा आपोआपच सभासद होतो. अशा समजुतीने देवकुळे यांनी हा अर्ज केला.

देवकुळे यांनी चित्रशाळा प्रेस ट्रस्ट (नं. ई. ७) च्या बाबतीत जो चेंज रिपोर्ट (नं. ३३३) दिला त्याला देवगिरीकरांनी आक्षेप घेतला नाही. म्हणून तो असिस्टंट चॅरिटी कमिशनरनी ता. १८-१०-६८ रोजी मान्य केला. पण देवकुळे यांनी दुसऱ्या ट्रस्टबद्दल जो चेंज रिपोर्ट (नं. ३३८) दिला त्यावर मात्र वादळ माजले. देवगिरीकरांनी त्या रिपोर्टाला विरोध केला. तेव्हा असि. चॅरिटी कमिशनरनी चौकशी करून देवगिरीकरांनी फक्त एकाच ट्रस्टचा (चित्रशाळा प्रेस ट्रस्ट) राजीनामा दिला आहे. दुसऱ्या ट्रस्टचा (जनरल ट्रस्ट) दिलेला नाही, असा निकाल दिला.

असि. चॅरिटी कमिशनर (एम्. जी. मदन) यांनी ता. २६–६–६९

रोजी असा निर्णय दिला की, चेंज रिपोर्ट नं. ३३८ बेकायदा आहे व देवगिरीकर जनरल ट्रस्टचे ट्रस्टी आहेत, त्यांनी फक्त चित्रशाळा प्रेस ट्रस्टचा राजीनामा दिलेला आहे. दोन ट्रस्ट स्वतंत्र असल्यामुळे राजीनामेही स्वतंत्र व वेगवेगळे असणे जरूर आहे. पटवर्धनांचे नाव रजिस्टरमध्ये नसल्यामुळे त्यांच्या राजीनाम्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तरी त्यांचे नाव रीतसर दाखल करण्यात यावे. देवगिरीकरांनी कोणत्या ट्रस्टचा राजीनामा दिला याबद्दल जर संशय होता तर त्याचे वेळीच निराकारण का करून घेतले नाही? त्यांनीं दोन्ही ट्रस्टचा राजीनामादिलेला नाही असा माझा निर्णय आहे. तसेच ता. २–१०–६८ रोजी झालेली ट्रस्टींची सभा बेकायदा आहे व त्या सभेत झालेले कामकाज रद्दबादल आहे. त्या सभेला देवगिरीकर यांना रीतसर आमंत्रण नव्हते, त्यामुळे ते हजर राहिले नाहीत. त्या सभेत ज. ग. देवकुळे यांची झालेली नेमणूकही बेकायदा आहे. त्यांचे नाव जनरल ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून कायदेशीर ठरत नाही. (ता. २६–१०–१९६९)

तेव्हा देवकुळे यांनी असिस्टंट चॅरिटी कमिशनर (एम्. जी. मदन) यांच्या या निकालावर मुख्य चॅरिटी कमिशनरकडे ता. २२-१-७० रोजी अपील केले. या अपीलाच्या बाबतीत, दोन्ही ट्रस्ट एकच आहेत, एकाच ट्रस्टच्या दोन शाखा किंवा पोटविभाग आहेत, तेव्हा एका ट्रस्टचा राजीनामा दिला म्हणजे दोन्हीं-चाही दिल्यासारखाच आहे, सोयीसाठी निरनिराळी नोंदणी केली आहे, असा देवकुळे यांच्यातर्फे दावा मांडण्यात आला होता.

डेप्युटी चॅरिटी कमिशनर एम्. एस्. आपटे यांचे निकालपत्र

हा दावा डेप्युटी चॅरिटी कमिशनर (अपीलाचा अधिकार असलेले) एम्. एस्. आपटे यांच्यापुढे चालला व त्यांनी ता. २-४-७० रोजी असिस्टंट चॅरिटी कमिशनरनी दिलेला निर्णय फिरविला व अर्जदाराला अनुकूल असा निकाल दिला. या निकालपत्रात त्यांनी कै. वासुकाका जोशी यांच्या मृत्युपत्रापासून देवगिरीकरांच्या चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या राजीनाम्यापर्यन्त सर्व गोष्टींचा आढावा घेतला असून देवगिरीकरांच्या पत्रातील विशिष्ट शब्दयोजनेवर हा सर्व वाद उभा राहिला आहे असे म्हटले आहे. देवगिरीकरांच्या पत्राच्या आधारे पाहिले तर त्यांनी दोन्ही निधींचा राजीनामा दिला आहे असे सिद्ध होते. वार्धक्यामुळे

जर देवगिरीकरांनी एका ट्रस्टचा राजीनामा दिला असेल तर दुसऱ्या ट्रस्टवर ते त्याच कारणामुळे राहू शकत नाहीत. दोन्ही ट्रस्टचे ट्रस्टी पहिल्यापासून एकच असून 'चित्रशाळा ट्रस्ट बोर्ड' या नावाने दोन्ही ट्रस्टचा प्रारंभापासून एकत्र उल्लेख करण्यात आलेला आहे. ट्रस्ट बोर्डच्या बैठकांचे अहवाल 'चित्रशाळा ट्रस्ट बोर्ड' या नावाने ठेवण्यात येत असत. कोठेही दुसऱ्या ट्रस्टचा निर्देश नाही. सोयीसाठी दोन ट्रस्ट वेगवेगळे नोंदले आहेत. वास्तविक ते एकच आहेत. दोन ट्रस्ट निरानिराळे नसल्यामुळे एका ट्रस्टचा राजीनामा दिला म्हणजे दुसऱ्या ट्रस्टचा आपोआप दिला जातो, या तत्त्वाप्रमाणे देवगिरीकरांचा राजीनामा दोन्ही ट्रस्टचाच आहे हे निर्विवाद आहे, असा डेप्युटी चॅरिटी कमिशनरनी निर्णय दिला. त्यांनी आपल्या निकालपत्रात देवगिरीकरांच्या राजीनाम्याच्या पत्रातील शब्दांचा कीस काढून त्यांचे शब्द व त्यांचा अर्थ याबद्दल काथ्याकूट केला होता. शेवटी त्यांनी निकालपत्रात असे म्हटले की, देवगिरीकर व पटवर्धन यांचे राजीनामे चित्रशाळा ट्रस्ट बोर्डाच्या ज्या बैठकीत मंजूर झाले ती बैठक कायदेशीर होती व ज. ग. देवकुळे यांची नवीन ट्रस्टी म्हणून झालेली नेमणूक कायदेशीर आहे, असे म्हणून त्यांनी असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांनी दिलेला निर्णय फिरविला व चेंज रिपोर्ट नं. ३३८ मान्य केला. (ता. २ ४ १९७०)

डेप्युटी चॅरिटी कमिशनर एम्. एस्. आपटे (अपीलाचा खास अधिकार असलेले,) यांचे संपूर्ण निकालपत्र पुढे दिले आहे.

डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांचे निकालपत्र

असिस्टंट चॅरिटी कमिशनर (श्री. एम्. जी. मदन) यांनी १९६८ चा चेंज रिपोर्ट नं. ३३८ नामंजूर ठरविला व व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या बाबतीत सुचविलेल्या दुरुस्त्या स्वीकारण्यास नकार दिला, हे त्यांनी चुकीचे केले आहे काय याचा विचार करणे हा या अपीलातील मुख्य प्रश्न आहे. या खटल्यातील वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे :—

चित्रशाळा प्रेसचे संस्थापक व 'चित्रमय जगत्' या सुप्रसिद्ध मासिकाचे प्रकाशक कै. व्ही. जी. ऊर्फ वासुकाका जोशी यांनी ता. १७–९–१९४३ रोजी केलेल्या मृत्युपत्रान्वये छापखाना व काही घरे यांच्यासह आपल्या सर्व मालमत्तेची विल्हेवाट केली. मृत्युपत्राच्या १५ व्या कलमात त्यांनी आपल्या

मालमत्तेची व्यवस्था करण्यास पाच जणांना एक्झीक्यूटर्स व ट्रस्टी म्हणून नेमले व १६ व्या कलमात त्यांच्या मालमत्तेचा एक ट्रस्ट निर्माण करावा अशी त्यांना सूचना केली. वासुकाका जोशी ता. १२–१–१९४४ रोजी निधन पावले. त्यानंतर लवकरच एक ट्रस्टी शंकर नरहर जोशी निधन पावल्यामुळे उरलेल्या चौघा ट्रस्टींनी श्री. यशवंत कृष्ण खाडिलकर यांना पाचवे ट्रस्टी म्हणून घेतले. या पाच जणांनी वासुकाकांच्या मृत्युपत्रात सांगितल्याप्रमाणे वासुकाकांच्या मालमत्तेचे ट्रस्ट डीड ता. ६–६–१९४९ रोजी केले. त्यानंतर या ट्रस्टींनी ट्रस्ट डीडप्रमाणे दोन वेगवेगळे ट्रस्ट रजिस्टर केले. त्यांची नावे व नंबर अनुक्रमे 'व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट'–ई ६ व 'व्ही. जी. जोशी चित्रशाळा प्रेस ट्रस्ट'–ई ७ असे आहेत.

अलीकडे ता. ५–१०–१९६८ रोजी या खटल्यातील वादींनी वरील दोन रजिस्टर्ड पब्लिक टस्टचे एक ट्रस्टी व सेक्रेटरी या नात्याने असिस्टंट चॅरिटी कमिशनर, पुणे विभाग, यांच्याकडे असा अर्ज केला की, ज्या अर्थी या दोन्ही ट्रस्टचे ट्रस्टी पहिल्यापासून एकच आहेत व या दोन्ही ट्रस्टचे आजपर्यन्तचे सर्व कामकाज व व्यवहार "चित्रशाळा प्रेस ट्रस्ट बोर्ड" या नावाने सोयिस्करपणे चालत आलेला आहे त्या अर्थी ट्रस्टींच्या बाबतीत काही बदल झाल्यास तो दोन्ही ट्रस्टमध्ये करण्यात यावा आणि एखाद्या ट्रस्टीच्या राजीनाम्यामुळे किंवा नेमणुकीमुळे काही बदल झाला असल्यास दोन्ही ट्रस्टमध्ये त्याची नोंद करण्यात यावी. या पत्रानंतर दोन वेगवेगळे चेंज रिपोर्ट करण्यात यावेत असा सल्ला देण्यात आला आणि त्याप्रमाणे वरील ट्रस्टी व सेक्रेटरी यांनी बॉबे पाब्लिक ट्रस्ट ॲक्टाच्या २२ व्या कमलाप्रमाणे बोर्ड ऑफ ट्रस्टीजमधील बदलासंबंधी दोन चेंज रिपोर्ट केले. यांपैकी १९६८ चा चेंज रिपोर्ट नं. ३३३ पाब्लिक ट्रस्ट नं. इ. ७ या ट्रस्टला अनुलक्षून होता तर १९६८ चा चेंज रिपोर्ट नं. ३३८ पब्लिक ट्रस्ट नं. इ. ६ या ट्रस्टला उद्देशून होता. या दोन रिपोर्टांतील विषय एकच होता. तो म्हणजे (१) य. कृ. खाडिलकर (२) दा. पां. रानडे (३) त्र्यं. र. देवगिरीकर व (४) वि. अ. पटवर्धन या चौघा ट्रस्टींची नावे दोन्ही ट्रस्टमधून काढून टाकणे व ज. ग. देवकुळे यांचे नाव नवे ट्रस्टी म्हणून दोन्ही ट्रस्टमध्ये समाविष्ट करणे. पाब्लिक ट्रस्ट नं. इ. ७ (व्ही. जी. जोशी चित्रशाळा प्रेस ट्रस्ट) यासंबंधी ३३३ नंबरचा जो चेंज रिपोर्ट करण्यात आला

होता तो त्या वेळचे असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांनी योग्य ठरवून ता. २८–१०–६८ रोजी मान्य केला असे दिसते. त्यांनी त्यासंबंधी पुढील हुकूम काढला.

श्री. देवगिरीकर हजर आहेत. हा चेंज रिपोर्ट मान्य करण्यास त्यांची हरकत नाही. म्हणून या बाबतीत चौकशीची गरज नाही. चेंज रिपोर्ट स्वीकारण्यात येत आहे.

दुसरा चेंज रिपोर्ट नं. ३३८ यासंबंधी असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांनी त्याच दिवशी पुढील हुकूम दिला :—

" श्री. देवगिरीकर हजर आहेत. या चेंज रिपोर्टाला त्यांचा विरोध आहे आणि त्यांचे असे म्हणणे आहे की त्यांनी राजीनामा दिलेला नाही. म्हणून या विषयाची सुनावणी करण्यासाठी तारीख ठरविली जावी व श्री. देवगिरीकर, श्री. पटवर्धन यांसह सर्व ट्रस्टींना त्याप्रमाणे रिपोर्ट देणाऱ्या ट्रस्टींना नोटिसा काढण्यात याव्यात. "

म्हणून, चेंज रिपोर्ट नं. ३३३ प्रमाणे वरील चार संस्थापक ट्रस्टींची नावे कमी करण्याचा व नवे ट्रस्टी म्हणून ज. ग. देवकुळे यांचे नाव समाविष्ट करण्याचा हुकूम देण्यात आला. हा बदल पब्लिक ट्रस्ट नं. इ. ७ या पुरताच मर्यादित आहे. दुसरा ट्रस्ट नं. ६ या बाबतीत मागणी करण्यात आलेला बदल हा वादस्तंभ ठरला व त्याची चौकशी करण्यात यावी असे ठरविण्यात आले. म्हणून चेंज रिपोर्ट नं. ३३८ च्या बाबतीत सर्व ट्रस्टींना नोटिसा पाठविण्यात आल्या. नोटिसीला उत्तर म्हणून चालू प्रतिवादी श्री. त्र्यं. र. देवगिरीकर व श्री. वि. अ. पटवर्धन यांनी संयुक्तपणे असा दावा केला की, उभयतांनी पब्लिक ट्रस्ट नं. इ. ६ (व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट) या ट्रस्टचा राजीनामा दिलेला नाही म्हणून ते अद्यापि त्या ट्रस्टचे ट्रस्टी आहेत; तसेच ता. २–१०–६८ रोजी झालेल्या सभेत इतर ट्रस्टींनी घेतलेले निर्णय बेकायदेशीर आहेत, म्हणून श्री. ज. ग. देवकुळे यांची नवे ट्रस्टी म्हणून झालेली नेमणूक बेकायदा व गैर आहे, असेही त्यांनी कळविले. असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांनी चेंज रिपोर्ट नं. ३३८ बाबतीत चौकशी करताना दोन्ही पक्षांचा पुरावा विचारात घेऊन असे ठरविले की, श्री. त्र्यं. र. देवगिरीकर यांनी पब्लिक ट्रस्ट नं. इ. ६ या ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून राजीनामा दिलेला नाही आणि श्री. वि. अ. पटवर्धन

यांचे नाव रजिस्टरमध्ये दाखल झालेले नसल्यामुळे त्यांचे नाव कमी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तसेच, ज्या सभेत श्री. ज. ग. देवकुळे यांची नवे ट्रस्टी म्हणून नेमणूक झाली ती सभा योग्य व कायदेशीर नव्हती, कारण त्या सभेला श्री. देवगिरीकर गैरहजर होते आणि नव्या ट्रस्टींची नेमणूक सुद्धा कायदेशीर नव्हती. शेवटी असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांनी चेंज रिपोर्ट नं. ३३८ ता. २६–६–६९ रोजी काढलेल्या हुकुमान्वये संपूर्णपणे फेटाळला. या निर्णया-विरुद्ध ट्रस्टी व सेक्रेटरी श्री. व. ग. देवकुळे यांनी प्रस्तुत अपील केले आहे. म्हणून प्रस्तुत अपीलाच्या बाबतीत कोणता प्रश्न उद्भवतो हे प्रारंभी सांगितलेच आहे.

या प्रश्नासंबंधी माझा निर्णय होकारार्थी आहे. त्याची कारणे पुढीलप्रमाणे होत—

पुढील विषयाकडे वळण्यापूर्वी मला प्रथम हे सांगितले पाहिजे की चालू अपीलातील मुख्य विषय, नव्हे एकमेव विषय, प्रतिवादी नं. १ श्री. त्र्यं. र. देवगिरीकर यांनी दिलेला राजीनामा हा आहे. प्रतिवादी नं. २ श्री. वि. अ. पटवर्धन यांच्या राजीनाम्याचा स्वीकार करणे व दुसऱ्या ट्रस्टमधून (नं. इ. ६) त्यांचे नाव काढून टाकणे, या गोष्टी चेंज रिपोर्ट नं. ३३८ मध्ये आहेत. त्यांचा विशेष उल्लेख प्रस्तुत अपीलात करण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे श्री. य. कृ. खाडिलकर व श्री. दा. पां. रानडे यांची नावे कमी करण्याबाबत चेंज रिपोर्टात जी मागणी केली आहे तोही प्रश्न माझ्यापुढे आणण्यात आलेला नाही.

कै. व्ही. जी. ऊर्फ वासुकाका जोशी यांनी ता. १७–९–१९४३ रोजी केलेल्या मृत्युपत्रातील १६ व्या कलमानुसार ट्रस्टी व एकझिक्यूटर यांनी ता. ६–६–१९४९ रोजी जे ट्रस्ट डीड केले त्यातूनच व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट (नं. ई. ६) व "व्ही. जी. जोशी चित्रशाळा प्रेस ट्रस्ट "(नं. ई. ७), असे दोन ट्रस्ट निर्माण करण्यात आलेले आहेत हे पूर्वीच सांगितले आहे. वादीच्या वकिलांप्रमाणे प्रतिवादीच्या वकिलांनीही ट्रस्ट डीडचे निरानिराळे अर्थ लावले आहेत आणि प्रत्येकजणाने श्री. देवगिरीकरांच्या राजीनाम्याबाबत आपली बाजू मांडताना त्याचा आधार घेतला आहे. म्हणून वादीचे वकील असे समर्थन करतात की, मृत्युपत्रातील १६ व्या कलमान्वये केलेल्या ट्रस्टडीडप्रमाणे ज्या

अर्थी ट्रस्ट निर्माण करण्यात आलेला आहे त्या अर्थी ट्रस्टी व एक्झिक्यूटर यांच्या मनात एक ट्रस्ट व त्याच्या दोन शाखा किंवा दोन विभाग मालमत्तेच्या व्यवस्थेच्या दृष्टीने करण्याचे असले पाहिजे. त्याचप्रमाणे बाँबे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० यातील कलमानुसार हे दोन ट्रस्ट वेगवेगळे जे रजिस्टर करण्यात आले ते मालमत्तेच्या सोयीस्कर व्यवस्थेसाठी करण्यात आले असे समजले पाहिजे. वादीच्या वकिलांच्या म्हणण्याचा असा अर्थ होतो की, ट्रस्टीबाबत एखादा जरी बदल झाला तरी त्याची नोंद पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन ऑफीसच्या दप्तरात दोन्ही ट्रस्टमध्ये झाली पाहिजे. या तत्त्वानुसार एखाद्या ट्रस्टीने दिलेला राजिनामा हा दोन्ही ट्रस्टचा आहे व त्याचा उर्वरित ट्रस्टींनी स्वीकार करावा हे न्याय्य व उचित आहे. वादीच्या वकिलांनी असे आग्रहपूर्वक प्रतिपादन केले की, ता. २७–९–१९६८ व २–१०–१९६८ रोजी भरलेल्या उर्वरित ट्रस्टींच्या सभांमध्ये देवगिरीकरांचा राजीनामा स्वीकारण्यात त्यांनी अत्यंत सुयोग्य व न्याय्य असेच वर्तन केले. त्यांनी पब्लिक ट्रस्ट नं. ई ६ व ई ७ या दोन्ही ट्रस्टमधून श्री. देवगिरीकरांचे नाव कमी करण्यात यावे, कारण चेंज रिपोर्ट नं. ३३८ हा योग्य व कायदेशीर आहे, असे त्यांनी आपले म्हणणे मांडले.

प्रतिवादींचे वकील यांनी आपल्या उत्तरात असे प्रतिपादन केले केले की, ट्रस्ट डीडमध्ये नमूद केलेल्या कलमांवरून दोन प्रकारच्या व्यवस्थेसाठी व विविध उद्देशाने दोन स्वतंत्र ट्रस्ट निर्माण करण्यात आले आहेत, हे उघड व निर्विवाद आहे. आणि त्यांनी आपल्या समर्थनार्थ चित्रशाळा प्रेस ट्रस्टमधील १, २ व ४ (१) आणि जनरल ट्रस्टमधील २५, २७ व २९ (४) या कलमांचा हवाला देऊन असे सांगितले की, बाँबे पब्लिक ट्रस्ट ॲक्टच्या तरतुदीप्रमाणे दोन ट्रस्ट हे वेगवेगळे रजिस्टर केले आहेत आणि ट्रस्ट डीडमधील व्यवस्थेनुसारच ते केले आहेत. दोन्ही ट्रस्टचे ट्रस्टी ट्रस्ट डीडप्रमाणे एकच असले तरी ३१ व्या कलमात निरनिराळ्या ट्रस्टींचाही उल्लेख आहे. पण एकच ट्रस्टी असले तरी बिघडत नाही.

माझ्या मते, वासुकाकांच्या दोन प्रकारच्या मालमत्तेसाठी दोन स्वतंत्र ट्रस्ट निर्माण करणे व बॉबे पब्लिक ट्रस्ट कायद्यानुसार दोन स्वतंत्र ट्रस्ट म्हणून त्यांची नोंद करणे, हे योग्यच होते. माझ्या मते, प्रस्तुत अपीलाच्या बाबतीत विचार करताना ट्रस्ट डीड व दोन ट्रस्टची स्वतंत्रपणे केलेली नोंदणी यांचा काही संबंध

नाही. प्रतिवादी नं. १ श्री. त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या राजीनाम्याच्या पत्राचा यथार्थ व बरोबर अर्थ लावणे (Interpretation) आणि उर्वरित ट्रस्टींनी ठराव करून स्वीकारलेल्या राजीनाम्याचा विचार करणे, हे माझ्या मते प्रस्तुत अपीलातील मुख्य मुद्दे आहेत.

ह्या राजीनाम्याच्या पत्राचा वास्तविक व कायदेशीर अर्थ लावावयाचा तर त्याची पार्श्वभूमी व कोणत्या परिस्थितीत हा राजीनामा दिला ती लक्षात घेतली पाहिजे. आणि शिवाय ती राजीनाम्याच्या पत्रातही निर्दिष्ट केली आहे. आता हे राजीनाम्याचे पत्र पाहिले असता त्यात त्या वेळच्या परिस्थितीचा पुढील-प्रमाणे उल्लेख आहे : ' वास्तविकपणे १ जानेवारी १९६८ लाच माझा राजीनामा ट्रस्टींनी स्वीकाराक्ष्यास पाहिजे होता. पण मला १ वर्ष थांबा असे सांगण्यात आले. ज्या वेळी ' चित्रमय जगत् ' बंद करण्याचे ठरले तेव्हा मला या निधीविषयी रस उरला नाही.' वृद्धापकाळामुळे ट्रस्टीच्या जबाबदारीतून मुक्त होण्याची इच्छा श्री. देवगिरीकर यांनी यापूर्वी व्यक्त केली होती, त्याच्याशी या वाक्याचा संदर्भ आहे या कारणाचा आणि दुसऱ्या अशाच कारणांचा उल्लेख ट्रस्टींच्या सभांच्या इतिवृत्तात आढळेल. ट्रस्टच्या प्रारंभापासून तो १२-९-६८ पर्यन्तच्या ट्रस्टींच्या बैठकींचे अहवाल कोर्टापुढे आहेत. ट्रस्टींच्या बैठकीत दोन ट्रस्टचे कोणते कामकाज झाले त्याचे वर्णन या अहवालात आलेले आहे. या ठिकाणी एक गोष्ट अवश्य सांगण्यासारखी आहे. ट्रस्ट डीडमध्ये दोन ट्रस्टचा यथार्थपणे निर्देश असला तरी या अहवालावरून असे दिसून येते की पहिल्या-पासून दोन्ही ट्रस्टचे कामकाज ट्रस्टींच्या एकाच बैठकीत व एकाच वेळी झालेले आढळून येईल. आणि ट्रस्टींच्या ह्या सभेला ' चित्रशाळा ट्रस्ट बोर्डाची सभा ' असे प्रत्येक वेळी म्हटलेले आहे. त्याचप्रमाणे या सभांच्या अहवालावर ज्या एका ट्रस्टीची सही आहे त्याखाली ' सेक्रेटरी, चित्रशाळा ट्रस्ट बोर्ड ' असा नामनिर्देश केला आहे. ट्रस्टींच्या जबाबदारीतून मुक्त होण्याची इच्छा श्री. देवगिरीकर यांनी प्रथम व्यक्त केली तिचा उल्लेख ता. ४–४–१९६७ रोजी झालेल्या ट्रस्टींच्या ८८ व्या सभेच्या इतिवृत्तात आहे. ट्रस्टींच्या या सभेत ५ नंबरचा ठराव पास करण्यात आला. या सभेला नेहमीच्या वहिवाटीप्रमाणे ' चित्रशाळा ट्रस्ट बोर्डाची सभा ' असे म्हणण्यात आले आहे व तिच्या अहवालावर ' सेक्रेटरी ट्रस्ट बोर्ड ' म्हणून एका ट्रस्टींची सही आहे. या सभेत इतर कामकाजाबरोबर

व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टसंबंधीचे एक प्रकरण (ठराव नं. १०) विचारात घेण्यात आले होते. ह्या ५ नंबरच्या ठरावात पुढील वाक्य आहे : ‘ वयोमाना-प्रमाणे यापुढे कामास येणे अवघड होत चालले आहे. तरी १९६७ अखेर ट्रस्ट बोर्डाने मला कामातून मुक्त करावे असे श्री. मामासाहेब यांनी सांगितले.’

या वाक्यात उल्लेखिलेला ‘मामासाहेब’ हा शब्दप्रयोग श्री. देवगिरीकर यांना उद्देशून आहे व ते ‘मामासाहेब देवगिरीकर’ या लोकप्रिय नावाने ओळखले जातात. आणि ट्रस्टींच्या सभांच्या अहवालातही याच टोपण नावाने त्यांचा वेळोवेळी उल्लेख केलेला आहे. ता. २८–११–६७ रोजी भरलेल्या ट्रस्टींच्या ९८ व्या बैठकीत पुढील ठराव मंजूर झाला : ‘ चित्रमय जगत्चा जानेवारी १९६८ चा अंक काढून पुढे हे मासिक बंद करावे असे ठरले.’’ त्यानंतर ११–१–६८ रोजी भरलेल्या ९९ व्या बैठकीच्या अहवालाचा मी येथे उल्लेख करतो. त्या सभेत पुढील ठराव पास झाला : ‘श्री. मामासाहेब यांनी तूर्त सेवानिवृत्त होऊ नये अशी त्यांना विनंती करण्यात आली.’ ही बैठक नेहमीच्या रिवाजाप्रमाणे ‘ चित्रशाळा ट्रस्ट बोर्डाची सभा’ या नावानेच भरली होती व बैठकीतला एक विषय ‘ जनरल ट्रस्ट’ संबंधीचा होता. तरी त्यावर नेहमीप्रमाणे ‘ सेक्रेटरी, चित्रशाळा ट्रस्ट बोर्ड’ अशी सही होती.

श्री. देवगिरीकरांच्या राजीनाम्याच्या पत्रातील पुढील विधान ‘ चित्रमय जगत्’ मासिक बंद करण्याला जी परिस्थिती कारणीभूत झाली तिला अनुलक्षून आहे. श्री. देवगिरीकरांनी स्वतःच्या नेतृत्वाखाली हे मासिक (इतकी वर्षे) चालविण्याचा कसा प्रयत्न केला व देवगिरीकरांच्या विश्वस्तपदाच्या अमदानीत चित्रशाळेची आर्थिक स्थिती बिघडली होती तरी त्यांनी या संकटांना कसे नेटाने तोंड दिले याचाही या पत्रात उल्लेख आहे. आणि पत्राच्या अखेरीस आपल्या सहकारी विश्वस्तांनी आपल्याला सहकार्य दिले नाही व ते सलोख्याने वागले नाहीत असा देवगिरीकरांनी त्यांच्यावर ठपका ठेवला आहे. — ‘ याही परिस्थितीत आम्ही टिकाव धरून वर येऊ शकलो असतो, पण विश्वस्तांत जो सलोखा व सहकार्य पाहिजे होते ते उपलब्ध न झाल्यामुळे नवे नवे प्रश्न निर्माण झाले. याही परिस्थितीत संस्था टिकविणे व वाढविणे अशक्य नाही. पण त्याकरिता विश्वस्त मंडळात एकमत पाहिजे. ते नसल्यामुळे आम्ही— मी व माझे सहविश्वस्त— दूर होण्याचे ठरविले.’

प्रतिवादींचा हेतू जर खरोखर चित्रशाळा प्रिंटिंग प्रेस ट्रस्टचाच फक्त राजीनामा देण्याचा होता तर त्यांच्या राजीनाम्याचे हे पत्र येथेच संपावयास पाहिजे होते. पत्राच्या सुरुवातीला त्यांनी जे पुढील शब्द वापरले आहेत त्यावरून सकृत् दर्शनी कोणाचाही तसाच ग्रह होईल :– 'मी या पत्राद्वारे चित्रशाळा प्रेसच्या विश्वस्त निधीचा राजीनामा देत आहे. त्यात सभासदत्व व अध्यक्षपद या दोन्हींचा अंतर्भाव होतो. १ ऑक्टोबरपासून माझा चित्रशाळा छापखान्याशी संबंध उरला नाही.'

हे राजीनाम्याचे पत्र जेथे संपावयास पाहिजे तेथे संपत नाही, उलट व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या दुःस्थितिसंबंधी त्यात अप्रस्तुत निवेदन केले आहे. आणि शेवटी जो 'ताजा कलम' जोडला आहे त्यात भावी विश्वस्तांना सावधगिरीने वागण्याचा इशारा दिला आहे, त्यांना ज्या अडचणी येतील त्यांबद्दल त्यांनी दक्ष असावे व काळजीपूर्वक वागावे म्हणजे या संकटांवर ते मात करू शकतील. शेवटी श्री. देवगिरीकर त्यांना असा सल्ला देतात की त्यांनी एकमेकांच्या सद्हेतूबद्दल संशय बाळगू नये. ते म्हणतातः– 'ता. क. नव्या विश्वस्तांनी जरा सावधगिरीने वागावे म्हणजे सर्व ठीक होईल. परस्परांनी परस्परांच्या हेतूबद्दल शंका घेऊ नये.'

ज्या अर्थी ह्या राजीनाम्याचा हेतू केवळ चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या विश्वस्त-पदापुरताच मर्यादित होता त्या अर्थी ह्या राजीनाम्याच्या पत्रात जनरल ट्रस्टच्या आर्थिक दुःस्थितीचा केलेला निर्देश पूर्णपणे असंबद्ध होता. हा 'ताजा कलम' वाचला असता असाच अपरिहार्य निष्कर्ष निघतो की, आपल्या सहविश्वस्तां-पासून दूर होताना श्री. देवगिरीकर त्यांचा अखेरचा निरोप घेत आहेत. पण हे अगदी असंबद्ध व विसंगत दिसते. कारण, श्री. देवगिरीकर जर दुसऱ्या ट्रस्टचे म्हणजे 'जनरल ट्रस्ट' चे ट्रस्टी म्हणून पुढे राहणार असले तर त्या ट्रस्टचे पूर्वीचे तेच ट्रस्टी त्यांचे सहविश्वस्त म्हणूनच राहणार आणि चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या कारभाराच्या बाबतीत सहकार्य व सलोखा यांचा अभाव त्यांना जो जाणवत होता ते सहकार्य व तो सलोखा 'जनरल ट्रस्ट' च्या कारभाराच्या बाबतीत ते कसा मिळवू शकणार हे समजू शकत नाही.

श्री. देवगिरीकरांचा राजीनामा मंजूर केल्याबाबत उर्वरित ट्रस्टींनी तारीख ५–१०–१९६८ रोजी त्यांना जे पत्र लिहिले त्या पत्रात देवगिरीकरांनी

ता. २७–९–१९६८ रोजी दिलेल्या राजीनाम्याचा मूळ उद्देश व त्याचा परिणाम यथार्थपणे प्रदर्शित झाला आहे. चालू अपीलाच्या बाबतीत जादा पुरावा म्हणून ते पत्र कोर्टापुढे ठेवण्यास मी संमती दिली. वृद्धापकाळामुळे ट्रस्टीच्या जबाबदारीतून आपल्याला मुक्त करावे अशी इच्छा देवगिरीकरांनी खरोखर व्यक्त केली असती तर जनरल ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून राहण्याची त्यांना इच्छा होती हे कसे समजावयाचे याचा मला उलगडा होत नाही. आणि त्याबरोबरच चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या कारभारात ज्या ट्रस्टींनी त्यांना सहकार्य दिले नाही त्यांच्याबरोबरच जनरल ट्रस्टमध्ये रहाण्यास ते आपण होऊन कसे कबूल झाले हे कोडे उलगडत नाही.

वरील विषयाचा विचार करताना, वादींनी ता. ५–१०–१९६८ रोजी असिस्टंट चॅरिटी कमिशनरांना पाठविलेल्या पत्रात जे विधान केले आहे त्याचा मी येथे गौरवपूर्वक उल्लेख करतो. हे पत्र राजीनाम्यासंबंधी असून ते चेंज रिपोर्टासोबत पाठविले होते. आणि त्यावरून मी असा निर्णय देतो की, प्रतिवादी नं. १ यांनी केवळ चित्रशाळा प्रेस ट्रस्टचाच नव्हे तर जनरल ट्रस्टचाही राजीनामा दिला आहे असे ठामपणे म्हटले पाहिजे. म्हणून माझ्या मते, असिस्टंट चॅरिटी कमिशनरनी श्री. देवगिरीकर यांच्या राजीनाम्यासंबंधी जो निर्णय दिला आहे तो मान्य करता नाही.

प्रतिवादी नं. २ श्री. वि. अ. पटवर्धन यांच्या राजीनाम्याचा विचार करता, त्यांनी लिहिलेले राजीनाम्यासंबंधीचे पत्र अगदी स्पष्ट आहे. आणि दोन्ही ट्रस्टचा त्यांनी दिलेला राजीनामा मंजूर करण्यात आला हे योग्य आणि न्याय्यच झाले. असिस्टंट चॅरिटी कमिशनरनी या ट्रस्टींचे नाव पब्लिक ट्रस्टच्या (नं. ई ७) कागदपत्रात प्रथम नमूद करून ठेवण्याचा हुकूम काढावयास हवा होता आणि मग त्यांना ट्रस्टींनी केलेल्या ठरावाच्या आधारावर या ट्रस्टमधून त्यांचे नाव कमी करण्याचा हुकूम द्यावयास पाहिजे होता. पूर्वी म्हटल्याप्रमाणे, प्रतिवादी नं. २ च्या वकिलांनी आपले म्हणणे मांडताना चॅरिटी कमिशनरनी व्यक्त केलेल्या मताचीच पुनरुक्ती केली व प्रतिवादींनी दोन्ही ट्रस्टचा दिलेला राजीनामा जो मंजूर करण्यात आला त्याबद्दल या वकीलमहाशयांनी प्रश्नही काढला नाही. चेंज रिपोर्टाच्या चौकशीच्या बाबतीत जे संयुक्त निवेदन करण्यात आले त्या

वेळी प्रतिवादी नं. १ बरोबर प्रतिवादी नं. २ यांची का सांगड घालण्यात आली याचाही मला उलगडा होत नाही.

माजी ट्रस्टी श्री. य. कृ. खाडिलकर व श्री. दा. पां. रानडे यांची नावे कमी करण्याच्या बाबतीत असि. चॅरिटी कमीशनरनी चेंज रिपोर्टातील विनंतीकडे दुर्लक्ष केलेले दिसते. या ट्रस्टींनी चेंज रिपोर्टाला विरोध केला नाही किंवा त्याच्या सुनावणीच्या वेळी ते हजर राहिले नाहीत. तेव्हा असिस्टंट चॅरिटी कमिशनरनी ह्या बाबतीत बदल करावयास संमती द्यावयास हवी होती.

शेवटी, श्री. ज. ग. देवकुळे यांची नवे ट्रस्टी म्हणून झालेल्या नेमणुकी-विषयी विचार करू. देवगिरीकर व पटवर्धन यांच्या राजीनाम्यानंतर चेंज रिपोर्टात देवकुळे यांचे जे नवीन नाव घालण्यात आले त्याबद्दल माझे असे म्हणणे आहे की, देवगिरीकर व पटवर्धन यांच्या राजीनाम्याचा मी जो अर्थ लावला आहे त्यावरून ता. २–१०–६८ रोजी उर्वरित ट्रस्टींची झालेली सभा पूर्णपणे योग्य आणि कायदेशीर होती व त्या सभेत झालेले कामकाज कायद्याला धरून होते. म्हणून चेंज रिपोर्टाचा हा भाग ॲसिस्टंट चॅरिटी कमि-शनरनी ग्राह्य धरावयास हवा होता.

म्हणून, या अपीलात विचारार्थ पुढे आलेल्या प्रश्नांच्या बाबतीत माझा निर्णय होकारार्थी आहे. असि. चॅरिटी कमिशनर यांनी दिलेला निर्णय व दिलेला हुकूम फेटाळण्यात आला पाहिजे आणि चेंज रिपोर्टात जे बदल माग-ण्यात आले आहेत त्यांना मान्यता दिली पाहिजे.

माझे निकालपत्र संपविण्यापूर्वी मला असे दर्शनास आणावयाचे आहे की, ट्रस्टींच्या सभांचे अहवाल पाहिले तर नवीन ट्रस्टी नेमण्याच्या बाबतीत ट्रस्टी नियमानुसार वागलेले नाहीत. पटवर्धन यांच्या नेमणुकीबाबत ठराव करण्यात आलेला नाही, असे मला दिसून आले आहे. त्याचप्रमाणे ज्या ट्रस्टींनी राजीनामे दिले त्यांसंबंधीही तोच प्रकार घडला आहे. श्री. य. कृ. खाडिलकर व श्री. दा. पां. रानडे यांची प्रकरणे म्हणजे ट्रस्टींच्या नियमबाह्य वर्तनाचीच उदाहरणे होत. बॉम्बे पब्लिक ट्रस्टस् ॲक्ट (१९५०) या कायद्याच्या २२ व्या कलमाप्रमाणे नव्या नेमणुका किंवा राजीनामे यांची वेळच्या वेळी खबर देण्यात येऊन नोंद करण्यात आली नाही.

हुकूम

हे अपील मान्य करण्यात येत आहे. असिस्टंट चॅरिटी कमिशनर, पुणे विभाग, यांचा निकाल रद्द ठरविला जात आहे. चेंज रिपोर्ट नं. ३३८ मध्ये मागणी करण्यात आलेले फेरबदल करण्यास परवानगी देण्यात येत आहे. खर्चासंबंधी कोणताही हुकूम नाही.

मुंबई,
२–४–१९७०.

एम्. एस्. आपटे
डेप्युटी चॅरिटी कमिशनर

डेप्युटी चॅरिटी कमिशनर (एम्. एस्. आपटे) यांनी दिलेल्या निकालावर देवगिरीकर व पटवर्धन यांनी पुण्याच्या डिस्ट्रिक्ट जज्जाकडे अपील केले. हे अपील एक्स्ट्रॉ जॉईंट जज्ज (ए. व्ही. पाटकर) यांच्यापुढे चालले व त्यांनी डेप्युटी चॅरिटी कमिशनरांचा निकाल रद्दबातल ठरवून असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांचा निर्णय मान्य केला (ता. २–९–७१).

न्यायाधीश पाटकर यांनी आपल्या निकालपत्रात चित्रशाळा प्रेस ट्रस्ट व जनरल ट्रस्ट या दोन निधींचा प्रारंभापासून इतिहास दिला असून या दोन्ही निधींचे हेतू व उद्देश कसे वेगवेगळे आहेत हे सविस्तर कथन केले आहे.

त्यांचे संपूर्ण निकालपत्र पुढे दिले आहे :—

किरकोळ अर्ज नं. १६९।१९७०

न्यायाधीश पाटकर यांचे निकालपत्र

डेप्युटी चॅरिटी कमिशनर (अपीलाचा अधिकार असलेले) महाराष्ट्र राज्य, यांनी ६१।१९६९ नंबरच्या अपीलाच्या बाबतीत ता. २–४–७० रोजी जो निर्णय दिला त्याच्याविरुद्ध त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर व विश्वनाथ अनंत पटवर्धन, मूळचे प्रतिवादी, यांनी बॉंबे पब्लिक ॲक्टाच्या ७२ व्या कलमानुसार हा अर्ज केलेला आहे. ते अपील मूळ अर्जदार वसंत गणेश देवकुळे यांनी केले होते व माझ्यापुढे असलेल्या चालू अर्जात ते आता प्रतिवादी आहेत. असिस्टंट चॅरिटी कमिशनर, पुणे विभाग, यांनी चेंज रिपोर्ट नं. ३३८।१९६८ याच्या चौकशीच्या बाबतीत ता. २६–६–६९ रोजी जो निर्णय दिला त्याच्या विरुद्ध व. ग. देवकुळे यांनी हे अपील केले होते.

(२) या खटल्यातील वस्तुस्थिती थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे:–

कै. वा. ग. जोशी (किंवा वासुकाका जोशी या नावाने अधिक प्रसिद्ध असलेले) हे चित्रशाळा छापखान्याचे मूळ संस्थापक होते व या छापखान्यातर्फेच सुप्रसिद्ध 'चित्रमय जगत्' मासिक निघत असे. वासुकाकांनी ता. १७-९-१९४३ रोजी एक मृत्युपत्र केले (निशाणी नं. १२) व या मृत्युपत्रान्वये त्यांनी चित्रशाळा छापखान्यासह आपल्या सर्व मालमत्तेची व्यवस्था केली. मृत्युपत्रातील १५ व्या कलमानुसार या इस्टेटीचे व्यवस्थापक व विश्वस्त म्हणून पुढील पाच जणांची नेमणूक केली : (१) हरि विठ्ठल तुळपुळे, वकील, २) शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेसचे त्या वेळचे मॅनेजर, (३) त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर, सध्याचे अर्जदार नं. १ व त्या वेळचे चित्रमय जगत्चे संपादक, (४) दामोदर त्र्यंबक जोशी, (५) वसंत गणेश देवकुळे म्हणजे सध्याचे प्रतिवादी.

मृत्युपत्राच्या १६ व्या कलमान्वये विश्वस्तांनी या मालमत्तेची कशी व्यवस्था करावयाची याबद्दल सूचना करण्यात आली होती व त्यांनी या सर्व मालमत्तेचा एक ट्रस्ट करावा असे वासुकाकांनी आपल्या मृत्युपत्रात लिहून ठेवले होते. मृत्युपत्रकर्ते वासुकाका जोशी ता. १२–१–१९४४ रोजी निधन पावले. त्यानंतर उर्वरित व्यवस्थापकांनी मयत शंकर नरहर जोशी यांच्या जागी य. कृ. खाडिलकर यांची विश्वस्त म्हणून नेमणूक केली. पुढे ता. ६–६–१९४९ च्या ट्रस्ट डीडप्रमाणे दोन ट्रस्ट निर्माण करण्यात आले. ट्रस्टडीडच्या १ व २ या कलमांनुसार एका ट्रस्टला चित्रशाळा प्रेस ट्रस्ट व २६ व २७ या कलमांनुसार दुसऱ्या ट्रस्टला व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट, अशी नावे देण्यात आली. पुणे विभागाचे असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांच्या कचेरीत हे दोन्ही ट्रस्ट नोंदण्यात आले. पहिला ट्रस्ट चित्रशाळा प्रेस ट्रस्ट याला ई ७ असा रजिस्टर नंबर देण्यात आला व दुसरा ट्रस्ट-व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट-याला ई ६ असा रजिस्टर नंबर मिळाला. अर्जदार नं. १ त्र्यं. र. देवगिरीकर हे ट्रस्टी होते व दोन्ही विश्वस्त निधींचे अध्यक्ष होते.

(३) सध्याचे प्रतिवादी व. ग. देवकुळे हे त्या वेळी ट्रस्टी होते व दोन्ही विश्वस्त निधींचे सेक्रेटरी होते. त्यांनी ता. ५–१०–१९६८ रोजी असिस्टंट चॅरिटी कमिशनर, पुणे विभाग, यांच्याकडे असा अर्ज केला की, अर्जात नमूद केलेल्या चौघा ट्रस्टींनी राजीनामे दिलेले असल्यामुळे त्यांची नावे काढून

टाकण्यात यावी व नवे ट्रस्टी म्हणून ज. ग. देवकुळे यांचे नाव दाखल करून घेण्यात यावे. बॉंबे पब्लिक ट्रस्ट ॲक्टाच्या २२ व्या कलमानुसार हा अर्ज दाखल करून घेण्यात आला. ज्या चौघा ट्रस्टींनी राजीनामे दिले असे म्हटले गेले त्यांत सध्याचे अर्जदार त्र्यं. र. देवगिरीकर व वि. अ. पटवर्धन हे अंतर्भूत आहेत. प्रतिवादी देवकुळे यांनी आपल्या अर्जासोबत देवगिरीकर व पटवर्धन यांच्या राजीनाम्याच्या नकला जोडल्या होत्या. त्याचप्रमाणे ट्रस्टींच्या सभेत सध्याच्या अर्जदारांचे राजीनामे ज्या ठरावान्वये मंजूर करण्यात आले त्या ठरावाची प्रतही त्यांनी सादर केली होती.

(४) चालू दाव्यातील अर्जदार देवगिरीकर व पटवर्धन यांनी वरील बदल करण्याच्या अर्जाला विरोध केला व आपण व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टचा (नं. ई ६) कधीही राजीनामा दिलेला नाही असा युक्तिवाद केला. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ते अजूनही त्या विश्वस्तनिधीचे विश्वस्त आहेत. अर्जदार नं. १ त्र्यं. र. देवगिरीकर यांचे असे म्हणणे आहे की त्यांनी फक्त पहिल्या ट्रस्टचा (नं. ई ७) म्हणजे चित्रशाळा प्रेस ट्रस्टचा राजीनामा दिलेला आहे व दुसऱ्या ट्रस्टचा कधीही राजीनामा दिलेला नाही. अशा स्थितीत सध्याच्या अर्जदारांनी चेंज रिपोर्टाला विरोध केला म्हणून असिस्टंट चॅरिटी कमिशनर, पुणे विभाग यांनी या प्रश्नाची चौकशी केली.

(५) प्रारंभी अर्जदार देवकुळे यांनी दोन ट्रस्टमध्ये फेरबदल करण्यासंबंधी फक्त एकच अर्ज दिला होता, तेव्हा त्यांना दोन वेगवेगळे चेंज रिपोर्ट देण्यास सांगण्यांत आले. त्याप्रमाणे त्यांनी दोन रिपोर्ट सादर केले. चित्रशाळा प्रेस ट्रस्ट या पहिल्या ट्रस्टच्या बाबतीत नं. ३३३।६८ हा चेंज रिपोर्ट देण्यात आला. अर्जदार नं. १ त्र्यं. र. देवगिरीकर यांचा हा चेंज रिपोर्ट स्वीकारण्यास आक्षेप नव्हता. म्हणून त्या बाबतीत चौकशी झाली नाही व हा चेंज रिपोर्ट मान्य करण्यात आला. व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट (नं. ई ६) या दुसऱ्या ट्रस्टच्या बाबतीत नं. ३३८।६८ हा जो चेंज रिपोर्ट करण्यात आला त्याबद्दल फक्त तक्रार होती. असिस्टंट चॅरिटी कमिशनरची चौकशी केल्यानंतर त्यांना असे दिसून आले की, त्र्यं. र. देवगिरीकर यांनी फक्त पहिल्याच ट्रस्टचा राजीनामा दिला आहे व दुसऱ्या ट्रस्टचा म्हणजे व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टचा दिलेला नाही. अर्जदार नं. २ वि. अ. पटवर्धन यांच्या राजीनाम्याच्या बाबतीत असिस्टंट चॅरिटी

कमिशनर यांना असे दिसून आले की ट्रस्टी म्हणून पटवर्धन यांचे नाव दाखलच झालेले नाही, तेव्हा त्यांचे नाव काढून टाकण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तेव्हा असिस्टंट चॅरिटी कमिशनरांना हे कळून आले की हा मुद्दा टिकणारा नाही. त्याचप्रमाणे त्यांना असे आढळून आले की ज्या सभेत नवे ट्रस्टी म्हणून ज. ग. देवकुळे यांची नेमणूक झाली ती सभा कायदेशीर नव्हती, कारण ज्या देवगिरीकरांनी राजीनामा दिलेला नव्हता ते देवगिरीकर या सभेला हजर नव्हते, म्हणून ज. ग. देवकुळे यांची नेमणूक कायदेशीर नव्हती. या सर्व निर्णयात्मक गोष्टी विचारात घेऊन असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांनी चेंज रिपोर्ट नं. ३३८।६८ अग्राह्य ठरविला.

(६) वर सांगितल्याप्रमाणे मूळ अर्जदार व. ग. देवकुळे यांनी असिस्टंट चॅरिटी कमिशनर, पुणे विभाग यांच्या वरील निर्णयावर चॅरिटी कमिशनर, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे अपील केले (अपील नं. ६१।६९) व ते डेप्युटी चॅरिटी कमिशनर (अपीलाचा अधिकार असलेले) यांच्यापुढे सुनावणीस निघाले. डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी हे अपील मंजूर केले व असा निकाल दिला की, त्र्यं. र. देवगिरीकर यांनी ट्रस्ट नं. इ ६ म्हणजे व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टचा राजीनामा दिला आहे. या निकालाबरोबरच डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी असा निर्णय दिला की, नवे ट्रस्टी म्हणून ज. ग. देवकुळे यांची झालेली नेमणूक योग्य आणि कायदेशीर आहे. वि. अ. पटवर्धन यांच्या राजीनाम्याच्या संबंधात असे प्रतिपादन केले की, आसिस्टंट चॅरिटी कमिशनर यांनी असा हुकूम द्यावयास हवा होता की, पटवर्धनांचे नाव ट्रस्टी म्हणून पब्लिक ट्रस्ट नं. इ ६ मध्ये नोंदण्यात यावे आणि कागदपत्रात अशी नोंद झाल्यावर निशाणी नं. १२ या ठरावाच्या आधारावर त्यांचे नाव ट्रस्टमधून काढून टाकण्यात यावे. ह्या कारणास्तव डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी चेंज रिपोर्ट नं. ३३८।६८ मान्य केला. डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांच्या ह्या निर्णयावर सध्याचे अर्जदार त्र्यं. र. देवगिरीकर व वि. अ. पटवर्धन यांनी बॉंबे पब्लिक ट्रस्ट ॲक्टाच्या ७२ व्या कलमान्वये हा अर्ज दाखल केला आहे.

(७) माझ्यापुढे जे म्हणणे मांडण्यात आले त्यावरून पुढील प्रश्न उद्‌भवतात

(१) अर्जदार नं. १ त्र्यं. र. देवगिरीकर यांनी ट्रस्ट नं. इ ६

म्हणजे व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टचा राजीनामा दिला आहे काय ?

(२) अर्जदार नं. २ वि. अ. पटवर्धन यांनीही वरील ट्रस्टचा राजीनामा दिला आहे काय ?

(३) नवीन ट्रस्टी म्हणून झालेली ज. ग. देवकुळे यांची नेमणूक योग्य व कायदेशीर आहे काय ?

(४) चेंज रिपोर्ट नं. ३३८।६८ हा मान्य करावा काय ?

(८) यावर माझा निर्णय पुढीलप्रमाणे आहे :

(१) नाही.

(२) हा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(३) नाही.

(४) नाही.

(९) माझ्या या निर्णयाची कारणे अशी आहेत :—

प्रतिवादी व. ग. देवकुळे यांचे वकील रा. वालावलकर यांनी असा पहिला मुद्दा उपस्थित केला आहे की, बॉंबे पब्लिक ट्रस्ट ॲक्टाच्या ७२ व्या कलमाचे क्षेत्र फार मर्यादित आहे आणि डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी अपिलाचा विचार करताना वस्तुस्थिती लक्षात घेऊन आपला निर्णय दिला आहे, हे ध्यानात ठेवले पाहिजे. या वादातील मुख्य मुद्दा हा आहे की, त्र्यं. र. देवगिरी-यांनी ट्रस्ट नं. ई ६ या ट्रस्टचा राजीनामा दिला आहे की नाही ? रा. वालावलकर यांच्या म्हणण्याप्रमाणे हा वस्तुस्थितीचा प्रश्न आहे व असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांनी वस्तुस्थितीच्या मुद्द्यावरच आपला निर्णय दिला आहे आणि तो सहजासहजी फेटाळला जाऊ नये. हा किरकोळ अर्ज रिव्हिजन अर्ज किंवा दुसरे अपील या स्वरूपाचा आहे. रा. वालावलकर यांच्या म्हणण्याप्रमाणे वस्तु-स्थितीच्या प्रश्नावरील निर्णय जर उघडउघड चुकीचा व विपर्यस्त नसेल तर या कोर्टाने तो फेटाळता कामा नये. रा. वालावलकर यांनी असा युक्तिवाद केला की, कायदा व वस्तुस्थिति या दृष्टीने हा संमिश्र प्रश्न आहे असे गृहीत धरले तरी या कोर्टाने डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांचा निकाल जर स्थूलमानाने चुकीचा नसेल तर तो फिरविता कामा नये. आता बॉंबे पब्लिक ट्रस्ट ॲक्टाच्या ७२ व्या

कलमात असे सांगितले आहे : ७० व्या कलमान्वये चॅरिटी कमिशनरनी दिलेल्या निर्णयामुळे जर कोणावर अन्याय झाला असेल तर त्याने त्या निर्णयाविरुद्ध कोर्टाकडे दाद मागावी. तेव्हा ७२ व्या कलमान्वये अर्जदाराला कोर्टापुढे नवीन पुरावा आणण्यास परवानगी नाही. डेप्युटी अगर असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांनी निकालाच्या दृष्टीने आवश्यक असलेला नवीन पुरावा घेण्याला नकार दिला असेल तर तो या कलमान्वये घेता येणार नाही. ७२ (२) या कलमानुसार पुढे आलेला पुरावा विचारात घेऊन कोर्टाला चॅरिटी कमिशनरचा निर्णय फिरविता येईल किंवा कायम करता येईल. डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी दिलेल्या निर्णयाच्या बाबतीत या कोर्टाला वस्तुस्थितीचा विचार करता येणार नाही, असे या ७२ व्या कलमात मला कोठेही आढळले नाही. शिवाय, प्रस्तुत प्रकरणी वस्तुस्थितीला पोषक असा मुद्दा निकालात आढळला नाही. ही गोष्टही दृष्टीआड करता येणार नाही. असिस्टंट चॅरिटी कमिशनरनी असा निर्णय दिला की त्र्यं. र. देवगिरीकर यांनी राजीनामा दिलेला नाही तर त्याच्या उलट डेप्युटी चॅरिटी कमिशनर म्हणतात की त्यांनी राजीनामा दिलेला आहे. त्र्यं. र. देवगिरीकर यांनी राजीनाम्याचे जे पत्र लिहिले त्या पत्राचा अर्थ लावणे हा माझ्या मते मुख्य प्रश्न आहे आणि हा केवळ वस्तुस्थितीचा प्रश्न नाही. म्हणून रा. वालावलकर यांनी जे विवाद्य मुद्दे मांडले आहेत त्यात विशेषसा अर्थ नाही. म्हणून माझ्या मताने या कोर्टाला वस्तुस्थितीच्या प्रश्नाचा किंवा वस्तुस्थिती व कायदा या संमिश्र प्रश्नाचा विचार करण्याचा अधिकार आहे.

(१०) मी वर म्हटल्याप्रमाणे या खटल्यातला मुख्य प्रश्न देवगिरीकर यांनी लिहिलेल्या राजीनाम्याच्या पत्राचा अर्थ कसा लावावयाचा हा आहे. देवगिरीकरांच्या राजीनाम्याच्या पत्रावरून असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांना असे दिसून आले की त्यांनी फक्त पहिल्या ट्रस्टच्या म्हणजे चित्रशाळा प्रेस ट्रस्टचा राजीनामा दिलेला आहे व दुसऱ्या ट्रस्टचा म्हणजे व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टचा दिलेला नाही. याच्या उलट डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांचे असे मत आहे की, हा राजीनामा दोन्ही ट्रस्टना उद्देशून आहे व त्यांनी या पत्राचा असा अर्थ लावला की, हा राजीनामा दोन्ही विश्वस्त मंडळांचा आहे.

(११) २७–९–१९६८ या तारखेचे हे पत्र (निशाणी नं. २) वाचले असता प्रथमदर्शनीच असे दिसून येते की, ते पत्र एकाच ट्रस्टसंबंधी म्हणजे

चित्रशाळा प्रेस ट्रस्ट (नं. ई ७) बद्दल आहे. रा. वालावलकर यांनी असा दावा केला आहे की, जरी दोन ट्रस्ट निर्माण केले असले तरी वस्तुतः एकच ट्रस्ट आहे आणि हे दोन ट्रस्ट म्हणजे मूळ एका ट्रस्टच्याच दोन शाखा आहेत. कै. वासुकाका जोशी यांच्या मृत्युपत्रातील (निशाणी नं. १३) काही मजकुरावरून हा निष्कर्ष काढला आहे. मृत्युपत्रकर्ते वासुकाका जोशी यांच्या इच्छेनुसार आणि त्यांनी केलेल्या मृत्युपत्राच्या पायावर हे दोन ट्रस्ट निर्माण करण्यात आले आहेत, यात वाद नाही. रा. वालावलकर यांनी असे दाखवून दिले आहे की, मृत्युपत्राच्या १५ व्या कलमाप्रमाणे वासुकाकांच्या खाजगी मालमत्तेची व चित्रशाळा प्रेसची ही व्यवस्था पाहण्यास त्यांनी ५ ट्रस्टींची नेमणूक केली आहे. यावरून असे दर्शविण्यात आले आहे की, दोन प्रकारच्या मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास एकच ट्रस्टी नेमण्यात आले आहेत. त्यानंतर रा. वालावलकर यांनी ट्रस्ट डीडमधील २४ व २५ या कलमांचा उल्लेख करून असे दाखविले आहे की, दोन ट्रस्ट हे खरे पाहिले असता एकाच ट्रस्टच्या दोन शाखा आहेत. कलम २४ मध्ये असे म्हटले आहे की, चित्रशाळा प्रेस असलेली इमारत ज्या वेळेला ट्रस्टींना नको असेल त्या वेळी ती इमारत रिकामी करून जनरल ट्रस्टकडे जाईल आणि त्याप्रमाणे तिची व्यवस्था करण्यात येईल. त्याचप्रमाणे कलम २५ मध्ये असे म्हटले आहे की, ट्रस्टींना चित्रशाळा प्रेसचा धंदा चालविणे अशक्य झाले तर चित्रशाळा प्रेसची सर्व मालमत्ता "जनरल ट्रस्ट" नावाच्या ट्रस्टकडे जाईल. म्हणून रा. वालावलकर यांनी असा दावा केला आहे की, खरोखर पाहता दोन वेगवेगळे ट्रस्ट नसून फक्त एकच ट्रस्ट आहे. मला हे म्हणणे मान्य करता येत नाही. मृत्युपत्रकर्ते वासुकाका जोशी यांच्या इच्छेप्रमाणे दोन ट्रस्ट निर्माण करण्यात आले आहेत यात शंका नाही. हे ट्रस्ट अगदी वेगवेगळे व स्वतंत्र आहेत हे ट्रस्ट डीडवरून स्पष्ट होईल. (ट्रस्ट डीड निशाणी नं. ३१). या दोन्ही ट्रस्टसाठी एकच ट्रस्टीही असू शकतील. तथापि आपण जर या दोन ट्रस्टचा उद्देश लक्षात घेतला तर त्यावरून असे स्पष्ट कळून येईल की हे दोन ट्रस्ट अगदी भिन्न भिन्न व स्वतंत्र आहेत. पहिला ट्रस्ट चित्रशाळा प्रेस ट्रस्ट हा व्यापारी दृष्टीने केला आहे. ट्रस्ट डीडची १ ते २५ कलमें या ट्रस्टसंबंधाची आहेत. ह्या चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या मालकीची यत्किंचितही स्थावर मालमत्ता नाही, हे त्यावरून दिसून येईल. ट्रस्ट डीडचे ब परिशिष्ट पाहिले म्हणजे चित्रशाळा प्रेस

ट्रस्टच्या मालकीची कोणती मालमत्ता आहे हे कळून येईल. चित्रशाळा प्रेस ट्रस्ट हा व्यापारी ट्रस्ट आहे व छपाईचा व प्रकाशनाचा धंदा चित्रशाळा प्रेसमार्फत करणे व चित्रशाळा प्रेस चालविणे हे या ट्रस्टचे काम असल्याबद्दल कोणाचेही दुमत नाही. त्याचप्रमाणे ह्या प्रेसमार्फत काही मासिके प्रसिद्ध केली जात असत. ही मासिके महाराष्ट्रात एके काळी मोठ्या भरभराटीत होती व लोकप्रिय झाली होती. यावरून या ट्रस्टचे उद्दिष्ट व्यापाराचे होते हे स्पष्ट दिसून येईल. दुसरा ट्रस्ट म्हणजे व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट. या ट्रस्टचा व्यापारधंद्याशी काही संबंध नव्हता. ट्रस्ट डीडच्या अ परिशिष्टात उल्लेखिलेल्या स्थावर मालमत्तेशी तो ट्रस्ट निगडित होता. ट्रस्ट डीडमधील २६ वे कलम व त्यानंतरची कलमे जनरल ट्रस्टसंबंधीची आहेत. या दोन ट्रस्टच्या मालमत्तेतून जो फायदा होईल त्याचा विनियोग शेतकी संशोधन, लायक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या आणि तशाच प्रकारच्या कार्यासाठी धर्मादाय म्हणून करावयाचा होता. यावरून, हे अगदी स्पष्ट होईल की, जनरल ट्रस्टचा उद्देश कोणत्याही प्रकारचा व्यापारधंदा करण्याचा नव्हता, तर हा ट्रस्ट पूर्णपणे धर्मादाय, दानधर्म व परोपकार यासाठी निर्माण झालेला होता. तेव्हा हे दोन ट्रस्ट अगदी वेगवेगळे व स्वतंत्र आहेत हे निर्विवादपणे सिद्ध होते.

(१२) त्यानंतर रा. वालावलकर यांनी असा एक मुद्दा मांडला की, ट्रस्ट-डीडच्या २२ व्या कलमात ट्रस्टींचा राजीनामा किंवा सेवानिवृत्ति यासंबंधी एकाच प्रकारची व्यवस्था केली आहे. हे म्हणणे बरोबर नाही असे मला स्पष्ट दिसते. २२ वे कलम चित्रशाळा प्रेस ट्रस्टलाच अनुलक्षून आहे. ट्रस्ट डीडच्या ३१ व्या कलमात जनरल ट्रस्टसंबंधी अशाच प्रकारची तरतूद केलेली आढळते. ३१ व्या कलमात असे म्हटले आहे की २२ वे कलम व आणखी काही कलमे जनरल ट्रस्टला जशीच्या तशी लागू आहेत. यावरून, जनरल ट्रस्टच्या ट्रस्टीला राजीनामा किंवा निवृत्ति याबाबत ३१ व्या कलमात तरतूद करून ठेवली आहे असे दिसून येईल. म्हणून माझा असा निष्कर्ष आहे की जनरल ट्रस्ट व चित्रशाळा प्रेस ट्रस्ट हे अगदी वेगवेगळे व स्वतंत्र आहेत.

(१३) दोन्ही ट्रस्टचे ट्रस्टी एकच असावेत अशी ट्रस्ट डीडमध्ये तरतूद नाही, हे कबूल केलेच पाहिजे. कदाचित असे असू शकेल की, योगायोगाने जे ट्रस्टी पहिल्यापासून होते तेच पुढे राहिले असतील. त्याचप्रमाणे एकाच वेळी व

एकाच ठिकाणी दोन्ही ट्रस्टच्या सभा भरत असल्यामुळे त्या सभांना चित्रशाळा प्रेस ट्रस्ट बोर्डच्या सभा म्हणण्याचा परिपाठ पडला असेल. तथापि दोन्ही ट्रस्टचे ट्रस्टी एकच असावेत व दोन्ही ट्रस्टच्या सभा एकत्रच भराव्यात असे ट्रस्ट डीडने संकल्पिलेले नाही.

(१४) या पार्श्वभूमीवर त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या राजीनाम्याच्या पत्राचा विचार करावयाचा आहे व त्यातील इत्यर्थ पाहावयाचा आहे. हे पत्र श्री.दामुअण्णा जोशी, सेक्रेटरी, चित्रशाळा प्रेस ट्रस्ट यांना उद्देशून लिहिले आहे, हे दिसून येते. ते पत्र सेक्रेटरी, जनरल ट्रस्ट या नात्याने त्यांना उद्देशून लिहिलेले नाही. त्या पत्रातील पहिलेच वाक्य इतके स्पष्ट व निःसंदिग्ध आहे की, त्यावरून त्र्यं. र. देवगिरीकर हे चित्रशाळा प्रेस ट्रस्टचा राजीनामा देत आहेत हे उघड होते. त्यांनी ह्या ट्रस्टच्या सभासदत्वाचा व अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. ह्या पत्रात त्यांच्या राजीनाम्याची सविस्तर कारणे दिली असून ते संपूर्ण पत्र चित्रशाळा प्रेस ट्रस्टला अनुलक्षून लिहिलेले आहे असे आपल्याला आढळून येते. डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांना या पत्रात असे दिसून आले की, देवगिरीकर यांनी सहकार्य व सलोखा न ठेवल्याबद्दल चार ट्रस्टींवर ठपका ठेवला आहे. या पत्रातील शेवटच्या दोन परिच्छेदांपर्यन्तचा मजकूर चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या ट्रस्टींशी संबंधित आहे, हे डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांचे मत आहे असे दिसते. डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांच्या म्हणण्याप्रमाणे हे राजीनाम्याचे पत्र जर केवळ चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या बाबतीत लिहिले गेले असेल तर ते येथेच संपावयास पाहिजे होते आणि शेवटचे दोन परिच्छेद लिहावयास नको होते. डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी आपल्या निकालपत्रात हे शेवटचे दोन परिच्छेद उद्धृत करून त्यावरून असा निष्कर्ष काढला आहे की हे पत्र दोन ट्रस्टना उद्देशून लिहिले आहे, असे दिसते. डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांचे हे मत मी मान्य करू शकत नाही. शेवटच्या अलीकडचा परिच्छेद व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या मालमत्तेला उद्देशून आहे. वासुकाका जोशी यांनी हे मृत्युपत्र करताना आपल्यापुढे एकच उद्देश ठेवला होता आणि तो म्हणजे या इस्टेटीचा विनियोग धर्मादायासाठी व्हावा; आणि तो उद्देश साध्य करण्यासाठी व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टने साडेपाच लाख रुपयांच्या इमारती उभारल्या असे देवगिरीकर आपल्या पत्रात म्हणतात. त्या बाबतीत असे सांगण्यांत आले की, इमारतीला

लागणारी रक्कम भाडेकऱ्यांकडून कर्ज व ठेव यांच्या रूपाने घेण्यात आली व १२ ते १५ वर्षांत तिची परतफेड करण्यात यावयाची आहे. या कर्जापैकी ४० टक्के रक्कम करांच्या रुपाने द्यावी लागते. डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी या विधानाला अनुलक्षून असे म्हटले आहे की, हे विधान व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या आर्थिक टंचाईचे द्योतक आहे. यावरून त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, जनरल ट्रस्ट पैशाच्या बाबतीत डबघाईस आला आहे. डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांच्याशी मी सहमत होऊ शकत नाही. देवगिरीकर यांनी या परिच्छेदात जनरल ट्रस्टच्या आर्थिक नुकसानीचा उल्लेख केला आहे, असे मुळीच म्हणता येणार नाही. जनरल ट्रस्टच्या मालकीची कोणती मालमत्ता आहे याचा त्यांनी फक्त निर्देश केला आहे.

(१५) याशिवाय, या पत्राला त्यांनी एक ताजा कलम जोडला आहे. त्यात ते म्हणतात, ' नव्या विश्वस्तांनी सावधगिरीने वागावे म्हणजे सर्व ठीक होईल. परस्परांनी परस्परांच्या सद्हेतूबद्दल शंका घेऊ नये. ' हा ताजा कलम ' जनरल ट्रस्टच्या राजीनाम्याचा कसा द्योतक होऊ शकतो हे मला समजत नाही. ज्या अर्थी दोन्ही ट्रस्टचे ट्रस्टी एकच आहेत त्या अर्थी, जेव्हा देवगिरीकरांनी सावधगिरीने वागण्याचा व परस्पराविषयी अविश्वास न बाळगण्याचा इषारा दिला तेव्हा ते दोन्ही ट्रस्टचा राजीनामा देत आहेत, असा डेप्युटी चॅरिटी कमिशनरनी अर्थ घेतला. दोन्ही विश्वस्त मंडळांचे विश्वस्त एकच असावेत अशी शर्त ट्रस्ट डीडमध्ये नाही, हे मी यापूर्वीच दाखवून दिले आहे. म्हणून डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी या पत्राचा जो अर्थ लावला आहे तो मान्य करता येत नाही. माझ्या मते हे पत्र अगदी सरळ व स्पष्ट आहे आणि ते फक्त चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या राजीनाम्यासंबंधीचेच आहे. देवगिरीकरांना जर जनरल ट्रस्टचा खरोखर राजीनामा द्यावयाचा असता तर आपल्या राजीनाम्याच्या पत्रात त्यांना तसा स्पष्टपणे निर्देश करण्यास कोणी प्रतिबंध केला नव्हता. म्हणून माझे असे स्पष्ट मत आहे की देवगिरीकरांचे हे राजीनाम्याचे पत्र केवळ चित्रशाळा प्रेस ट्रस्टसंबंधीच आहे, जनरल ट्रस्टशी त्याचा काही संबंध नाही.

(१६) त्यानंतर डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी पूर्वीचे काही ठराव व दाखले विचारात घेऊन असे दाखवून दिले आहे की, दोन्ही ट्रस्टचा एकदम राजीनामा देण्याचा तेव्हाचा रिवाज होता. डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांच्या या

म्हणण्याला मी पुष्टी देऊ शकत नाही. आपल्याला पूर्वीच्या दाखल्याशी काही कर्तव्य नाही. कदाचित पूर्वीचे राजीनामे दोन्ही ट्रस्टच्या बाबतीत असू शकतील व कदाचित त्या राजीनाम्याच्या पत्रात एकाच ट्रस्टचा राजीनामा दिल्याचा निर्देशही असू शकेल. तथापि त्या वेळी तंटा उत्पन्न झाला नाही आणि कदाचित राजीनामा देणाऱ्यांच्या मनात दोन्ही ट्रस्टचा राजीनामा देण्याचेही असेल. त्याचा अर्थ असा नव्हे की, राजीनामा देणाऱ्या ट्रस्टीने दोन्ही ट्रस्टचा राजीनामा दिला पाहिजे. रा. वालावलकर यांनी सुद्धा हे कबूल केले आहे की हा एक प्रकारचा कच्चा किंवा कमकुवत पुरावा आहे.

(१७) शेवटी रा. वालावलकर यांनी असा मुद्दा मांडला की, ट्रस्ट व्यवहाराच्या बाबतीत हे कोर्ट न्यायदानाचे कोर्ट (Court of Equity) आहे. तेव्हा ट्रस्टचे हित पाहणे व ट्रस्ट योग्य रीतीने चालविणे या गोष्टींना प्राधान्य दिले पाहिजे. वालावलकर यांच्या म्हणण्याप्रमाणे ट्रस्टींचा परस्परांवर अविश्वास आहे आणि त्याचा परिणाम ट्रस्टच्या व्यवस्थापनावर होणे शक्य आहे. म्हणून देवगिरीकरांचा राजीनामा हा दोन्ही ट्रस्टचा राजीनामा समजला पाहिजे. असे. रा. वालावलकरांचे म्हणणे आहे. मी हा मुद्दा मान्य करू शकत नाही. मी यापूर्वीच असे दाखवून दिले आहे की दोन ट्रस्टचे उद्देश अगदी वेगवेगळे व स्वतंत्र आहेत. चित्रशाळा प्रेस ट्रस्ट हा व्यापारी व्यवसाय आहे व जनरल ट्रस्ट धर्मादायाच्या हेतूने निर्माण करण्यात आला आहे. या दोन ट्रस्टचे ट्रस्टी वेगवेगळे असले तरी ट्रस्टच्या व्यवस्थापनाच्या बाबतीत त्याचा काही प्रतिकूल परिणाम होईल असे मला वाटत नाही. म्हणून रा. वालावलकरांचा हा मुद्दा स्वीकारता येत नाही.

(१८) वरील विवेचनावरून हे स्पष्टपणे दिसून येईल की, देवगिरीकरांनी फक्त चित्रशाळा प्रेस ट्रस्टचा राजीनामा दिलला आहे, जनरल ट्रस्टचा दिलेला नाही. म्हणून डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी जो निर्णय दिला आहे तो यथार्थ नाही म्हणून तो अग्राह्य ठरविला पाहिजे.

(१९) आता, वि. अ. पटवर्धन यांच्या राजीनाम्याचा विचार करू. पटवर्धनांचे नाव पब्लिक ट्रस्ट नं. ई ६ या ट्रस्टच्या कागदपत्रात ट्रस्टी म्हणून केव्हाही नोंदण्यात आलेले नसल्यामुळे त्यांचे नाव काढून टाकण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांनी जे म्हटले आहे ते यथा-

योग्यच आहे. असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांनी पब्लिक ट्रस्टच्या कागदपत्रात ट्रस्टी म्हणून पटवर्धन यांच्या नावाची नोंद इतर ट्रस्टींच्या बरहुकूम करण्याचा हुकूम द्यावयास हवा होता, हे डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांचे विधान बरोबर नाही. ही न्यायकोर्टाची चौकशी असल्यामुळे पब्लिक ट्रस्ट नं. ई ७ च्या कागदपत्रातील नोंद बदलून घेण्याचा असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांना अधिकार नाही. म्हणून असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांनी जो निर्णय दिलेला आहे तो यथायोग्य आहे. तेव्हा वि. अ. पटवर्धन यांच्या राजीनाम्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(२०) त्यानंतरचा प्रश्न म्हणजे ज. ग. देवकुळे यांच्यासंबंधीचा. ता. २७-९-६८ रोजी भरलेली सभा देवगिरीकर गैरहजर असल्यामुळे कायदेशीर व रीतसर नव्हती, हे असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांचे म्हणणे यथायोग्य आहे. देवगिरीकरांनी जनरल ट्रस्टचा राजीनामा दिला आहे की नाही या प्रश्नावर प्रस्तुत निर्णय अवलंबून आहे, असे रा. वालावलकरही कबूल करतात. म्हणून, नव्या ट्रस्टीची नेमणूक ही रीतसर व कायदेशीर नाही हे स्पष्ट आहे.

हुकूम

हा अर्ज मान्य करण्यात येत आहे. डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी नं. ६१।१९६९ या अपिलाच्या बाततीत ता. २-४-७० रोजी दिलेला निर्णय या हुकूमान्वये अग्राह्य ठरविण्यात येत आहे आणि असिस्टंट चॅरिटी कमिशनर, पुणे विभाग, यांनी चेंज रिपोर्ट नं. ३३८।६८ या बाबतीत ता. २६-६-१९६९ रोजी दिलेल्या हुकमावर शिक्कामोर्तब करण्यात येत आहे. म्हणून चेंज रिपोर्ट नं. ३३८।६८ अमान्य ठरविला जात आहे. या किरकोळ अर्जाच्या खर्चाबाबत मी असा हुकूम देतो की, अर्जदारांनी आपला खर्च प्रतिवादी व. ग. देवकुळे यांच्याकडून वसूल करून घ्यावा व देवकुळे यांनी स्वतःचा खर्च स्वतःच सोसावा.

ए. व्ही. पाटकर

२-९-१९७१.

एक्स्ट्रॉ जॉइंट जज्ज, पुणे.

वरील निकालावर व. ग. देवकुळे यांनी नोव्हेंबर १९७१ मध्ये हायकोर्टात अपील दाखल केले. पण ते जुलै १९७४ पर्यंत सुनावणीस निघालेले नाही. ह्या अपीलाची नक्कल सोबत जोडली आहे.

मुंबई येथील न्यायाधिकारी हायकोर्टात

अपिलेट साईड

फर्स्ट अपील नं. १७७ (१९७१ चे), जि. पुणे.

वसंत गणेश देवकुळे, वय सुमारे ५८, धंदा नोकरी, ५६२ सदाशिव, पुणे ३०	वादी (मूळ अर्जदार)

विरुद्ध

१. त्र्यं. र. देवगिरीकर, वय सुमारे ७५, धंदा समाजकार्य, १२ शिलाविहार, पुणे ४ २. वि. अ. पटवर्धन, वय सुमारे ६५, धंदा समाजकार्य, पुणे व्यायामशाळा, गुलटेकडी, पुणे.	प्रतिवादी (मूळ जाब देणार)

डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी अपील नं. ६१ (१९६९) संबंधी दिलेल्या निकालावर व हुकमावर केलेल्या नं. १६९ (१९७०) या किरकोळ अर्जाच्या बाबतीत मे. एक्स्ट्रॉ जॉइंट जज्ज, पुणे, यांनी ता. २–९–१९७१ रोजी जो निर्णय दिला व हुकूम काढला त्यामुळे अन्याय वाटल्यावरून सदरहू अर्जदार हा नामदार हायकोर्टाला पुढील मुद्द्यावर हे विनंतीपूर्ण अपील करीत आहे :–

१. विद्वान न्यायाधीशांनी प्रथम अर्ज मंजूर करण्याची चूक केली आणि पुढे विश्वस्तांची नावे बदलण्यासाठी वादीनी जो अर्ज केला होता तो नामंजूर करण्याचाही प्रयत्न केला.

२. प्रतिवादी नं. १ यांनी चित्रशाळा प्रेस ट्रस्ट या ट्रस्टचा राजीनामा दिला हे गृहीत धरण्यात चूक झाली.

३. ट्रस्टच्या प्रारंभापासून व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट व व्ही. जी. जोशी चित्रशाळा प्रेस ट्रस्ट या दोन्ही ट्रस्टसाठी विश्वस्तांचा एकच संच काम करीत होता, या गोष्टीचे महत्व विद्वान न्यायाधीशांनी लक्षात घेतले नाही.

४. जेव्हा पूर्वीच्या विश्वस्तांनी आपल्या विश्वस्तपदाचे राजीनामे दिले तेव्हा त्यांचे राजीनामे दोन्ही विश्वस्तनिधींचे होते, असे समजण्यात आले होते, याची विद्वान न्यायाधीशांनी दखल घेतली नाही. पूर्वीची वहिवाट लक्षात घेऊन

प्रतिवादी नं. १ यांचा राजीनामा दोन्ही विश्वस्तनिधींबाबत होता, असे विद्वान न्यायाधीशांनी मानावयास हवे होते.

५. विश्वस्तांचा एकच संच दोन्ही विश्वस्तनिधींची व्यवस्था पाहील आणि जर विश्वस्तांपैकी एखादी जागा रिकामी झाली तर ती जागा दोन्ही विश्वस्त-निधींमध्ये रिकामी आहे असे समजण्यात येईल, हे मृत्युपत्रातील कलम विद्वान न्यायाधीशांनी विचारात न घेण्याची चूक केली आहे.

६. बॉबे पब्लिक ट्रस्ट ॲक्टाच्या ७२ व्या कलमाखालील अधिकाराचा उपयोग करण्यात विद्वान न्यायाधीशांनी चूक केली आहे, त्याचप्रमाणे प्रतिवादी नं. १ यांनी दिलेला राजीनामा फक्त चित्रशाळा प्रेस ट्रस्टबाबत आहे हे गृहीत धरून त्याचा पुरस्कार करण्यात त्यांनी प्रमाद केला आहे.

७. प्रतिवादी नं. १ यांच्या राजीनाम्याच्या पत्रावरून असे स्पष्टपणे शाबीत होते की, हा राजीनामा दोन्ही विश्वस्तनिधींना उद्देशून दिलेला आहे.

८. व्यवस्था पहाण्याच्या दृष्टीने दोन्ही विश्वस्तनिधि वेगळे आहेत असे समजण्यात आले नव्हते व विश्वस्तांच्या एकाच बैठकीत दोन्ही विश्वस्तनिधीं-बाबतचे ठराव करण्यात येत होते, हे दोन्ही विश्वस्तनिधींचे दप्तर पाहिले असता कळून येईल.

९. चित्रशाळा प्रेस ट्रस्ट हा व्यापारी विश्वस्तनिधि आहे, त्याचप्रमाणे त्या ट्रस्टचा जनरल ट्रस्टशी संबंध नाही व हे दोन्ही ट्रस्ट एकमेकांपासून अलग अलग आहेत, असे धरणे चुकीचे होते.

१०. दोन्ही विश्वस्तनिधींवर विश्वस्तांचा एकच संच काम करीत असला आणि विश्वस्तांमध्ये जर सहकार्याचा अभाव असला तर दोन्ही विश्वस्तनिधींचे काम सुरळीत चालणार नाही, हे दिसून आले असते. या दृष्टीने, विद्वान न्यायाधीशांनी डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांचा निर्णय कायम करावयास पाहिजे होता.

११. राजीनाम्याच्या पत्रातील मजकुरावरून हे स्पष्ट दिसून येईल की, प्रतिवादी नं. १ हे प्रकृतीच्या कारणामुळे चित्रशाळा प्रेस ट्रस्टवर विश्वस्त म्हणून काम करण्यास तयार नव्हते. हेच त्यांचे खरे कारण असेल, तर ते सर्वसामान्यपणे दुसऱ्या विश्वस्तनिधीलाही लागू होईल. म्हणून डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी हा राजीनामा दोन्ही विश्वस्तनिधींचा आहे, असे समजणे यथायोग्यच होते.

१२. जर राजीनाम्याचे पत्र एकाच विश्वस्तनिधीच्या बाबतीत होते तर त्या राजीनाम्याच्या पत्राला ताजा कलम जोडण्याची जरूरी नव्हती. पत्राला ताजा कलम जोडल्यामुळे प्रतिवादी नं. १ यांच्या मनात दोन्ही विश्वस्तनिधींचा राजीनामा द्यावयाचा होता, असे निर्विवादपणे सिद्ध होते.

१३. दोन विश्वस्तविधींचे उद्देश अगदी वेगळे व स्वतंत्र आहेत असे समजणे चूक होते. म्हणून त्या विश्वस्तनिधींचे कामकाज चालविण्याच्या बाबतीत व्यावहारिक अडचणी येण्याचा संभव आहे.

१४. जरी प्रतिवादी नं. २ हे विश्वस्त म्हणून काम करीत असले तरी त्यांचे नाव पब्लिक ट्रस्टच्या दप्तरात समाविष्ट झाले नव्हते. म्हणून डेप्युटी चॅरिटी कमिशनरनी आपण होऊन चौकशी करण्याचा आदेश दिला असता तर प्रतिवादी नं. २ यांचे नाव विश्वस्तमंडळाच्या दप्तरी दाखल झाले असते.

१५. प्रतिवादी नं. २ यांच्या राजीनाम्याच्या पत्रावरून असे स्पष्ट दिसून येते की, प्रतिवादी नं. २ यांना दोन स्वतंत्र विश्वस्तनिधींचे अस्तित्व माहीत नव्हते. म्हणून त्यांनी दुसऱ्या ट्रस्टवर म्हणजे जनरल ट्रस्टवर रहाण्यास विनंतीपूर्वक नकार दिला.

१६. प्रतिवादी नं. २ यांच्या बाबतीत डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी दिलेला निर्णय रद्द करण्यात विद्वान न्यायाधीशांनी चूक केली.

१७. विद्वान न्यायाधीशांनी दिलेला निकाल व हुकूम चुकीचा, अन्याय्य व दाखल केलेल्या पुराव्याच्या विरुद्ध आहे.

१८. विद्वान न्यायाधीशांनी अर्जाचा निकाल त्यांच्या निकालपत्राने व हुकमाने ता. २-९-७१ रोजी दिला. म्हणून वादींनी सदर निकालाची सही शिक्क्याची नक्कल मिळण्याबाबत ता. ३-९-७१ रोजी अर्ज केला. सदरच्या सहीशिक्क्याच्या नकला ता. ८-९-७१ रोजी तयार झाल्या. या अधिकृत नकला मिळण्यास लागलेल्या अवधीचा विचार करता हे अपील मुदतीत दाखल झाले आहे.

मुंबई
नोव्हेंबर १९७१

वादीचे वकील **व्ही. एन्. गणपुले**
व्ही. बी. रेगे

जज्ज पाटकर यांच्या निकालावर
देवकुळे यांचा हायकोर्टाकडे स्टे देण्याबद्दलचा अर्ज

न्यायाधीश पाटकर यांच्या निकालपत्रातील अंमलबजावणी स्थगित करण्यात यावी, नाही तर ट्रस्ट मिळकतीला फार मोठा धोका पोचण्याचा संभव आहे, अशा आशयाचा अर्ज ता. १७–७–१९७२ रोजी देवकुळे यांनी हायकोर्टाकडे केला. त्या अर्जात त्यांनी असे म्हटले होते की, प्रतिवादी ट्रस्टच्या हिताविरुद्ध वर्तन करीत आहेत व त्यांना त्यापासून परावृत्त केले नाही तर ट्रस्ट मालमत्तेचे कधीही भरून न येणारे नुकसान होण्याचा संभव आहे. तसेच डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांच्या निर्णयानुसार प्रतिवादींनी राजीनामे दिले असल्यामुळे ते ट्रस्टी म्हणून अस्तित्वातच नाहीत. म्हणून हायकोर्टाने ' स्टे ' द्यावा.

या अर्जावर हायकोर्टाच्या रजिस्ट्रारनी तात्पुरता स्टे दिला.

रजिस्ट्रारने दिलेल्या स्थगिति हुकुमावर देवगिरीकर व पटवर्धन यांनी तारीख ३–८–१९७२ रोजी हायकोर्टात अपील केले.

वादीच्या स्टे अर्जाला उत्तर म्हणून प्रतिवादींनी शपथेवर दिलेल्या लेखी जबानीसह पुढीलप्रमाणे निवेदन केले :

१. प्रतिवादी हे ट्रस्टच्या हितसंबंधाविरुद्ध वर्तन करीत आहेत हे वादीचे विधान संपूर्णपणे खोटे व निराधार आहे. प्रतिवादी हे जुने व प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते आहेत. या दोहोपैकी क्रमांक एकचे प्रतिवादी ट्रस्ट अस्तित्वात आल्यापासून सुरवातीपासूनचे ट्रस्टी आहेत. त्याचप्रमाणे ते कै. वासुकाका जोशी यांच्या मृत्युपत्राचे एक्झीक्यूटर आहेत. शिवाय ते ट्रस्टचे अध्यक्ष आहेत.

२. अर्जदाराने केलेले आरोप इतके मोघम व निवाधार आहेत की त्याला प्रतिवादींच्या विरुद्ध गैरकृत्याचे एकही उदाहरण दाखविता आले नाही. अर्जदाराला अपील दाखल झाल्या वेळी स्टे मिळू शकला नाही, ही गोष्ट त्याने केलेले आरोप किती खोटे व निराधार आहेत हे सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

३. शिवाय, हा स्टेसंबंधीचा अर्ज, अर्जदाराच्या ज्या वकिलाने अपील केले व हायकोर्टापुढे वादीच्या वतीने भाषण केले त्याने दाखल केला नाही, तो दुसऱ्याच नव्या वकिलाने केला आहे. हायकोर्टाच्या न्यायाधीशांनी हा स्टेसंबंधीचा अर्ज विचारात घेतला नाही. म्हणून अर्जदाराने तो रजिस्ट्रारकडून मिळविला असे

दिसते. अर्जातील मजकूरावरून अर्जदाराने रजिस्ट्रारकडे का स्टे मागितला याचा खुलासा होत नाही. कारण त्यापूर्वीच प्रतिवादींनी हायकोर्टात अपील केले आहे.

४. प्रतिवादी नं. १ यांनी व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टचा राजीनामा दिलेला नाही.

५. रजिस्ट्रारने दिलेला हा स्टे चुकीचा व संदिग्ध आहे. म्हणून किरकोळ अर्ज नं. १६९ (१९७०) या अन्वये काढलेला हुकूम तहकूब करण्यात यावा. पण प्रत्यक्षपणे हायकोर्टाने कसलाही हुकूम काढलेला नाही. न्यायमूर्तींनी असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांनी चेंज रिपोर्ट नं. ३३८ (१९६८) याबाबत दिलेल्या निर्णयालाच फक्त मान्यता दिलेली आहे. यावरून हायकोर्ट रजिस्ट्रारपुढे सर्व मुद्दे नीटपणे मांडण्यात आलेले नाहीत असे दिसते.

६. या 'स्टे' हुकुमामुळे पब्लिक ट्रस्टचे सर्व कामकाज बंद झाले आहे व हा हुकूम ट्रस्टच्या उद्दिष्टांना हरताळ फाशीत आहे.

म्हणून प्रतिवादींची अशी विनंती आहे की, स्टेसंबंधीचा हा अर्ज फेटाळून लावण्यात यावा आणि दिलेला स्टे रद्द करण्यात यावा. (ता. ३ ऑगस्ट १९७२)

तेव्हा हायकोर्टाने ता. १८–१०–७२ रोजी हा स्टे उठविला.

पण तत्पूर्वी ता. १६–१०–७२ रोजी देवकुळे यांनी हा स्टे उठवू नये, चालू ठेवावा, अशा आशयाचा अर्ज ॲडव्होकेट ए. व्ही. शहा यांच्यामार्फत हायकोर्टात केला. हा अर्ज हायकोर्टाने ता. २६–१०–७२ रोजी नामंजूर केला.

या अर्जात अर्जदार व. ग. देवकुळे यांनी पुढील विधाने केली होती :—

१. अर्जदाराने १७७ नंबरचे अपील केले आहे आणि त्या अपीलात विनंती केल्याप्रमाणे रजिस्ट्रारनी स्टे देण्याची कृपा केली. तथापि ता. १०–१०–७२ रोजी जेव्हा रजिस्ट्रारपुढे ते सुनावणीस आले तेव्हा त्यांनी हायकोर्टाकडून जरूर ते हुकूम मिळविण्यात यावेत म्हणून स्टेची मुदत ता. १८–१०–७२ पर्यंत मर्यादित केली.

२. हे अपील सार्वजनिक महत्त्वाचे आहे, कारण त्यात ट्रस्ट मिळकतीचा संबंध आहे. प्रतिवादींनी ट्रस्टचा राजीनामा दिलेला असूनही ते स्ट्रटी म्हणून मिरवत आहेत. विशेषतः श्री. त्र्यं. र. देवगिरीकर हे दुसऱ्या ट्रस्टचा राजीनामा दिलेला नाही अशा भूमिकेवरून ट्रस्ट मालमत्तेच्या हितसंबंधाच्या विरोधी वर्तन

करीत आहेत. दुसरा ट्रस्ट हा मूळ ट्रस्टचाच आविभाज्य भाग आहे.

वासुकाका जोशी यांच्या मृत्युपत्रान्वये जे दोन ट्रस्ट करण्यात आले आहेत त्यांपैकी मुख्य चित्रशाळा प्रेस ट्रस्ट असून जनरल ट्रस्ट हा त्याचा पोटविभाग आहे. वासुकाकांच्या इच्छापत्राप्रमाणे हे दोन ट्रस्ट करण्यात आले आहेत. दोन्ही ट्रस्टसाठी एकच ट्रस्टी नेमण्यात यावेत, असे इच्छापत्रात दिग्दर्शित केले आहे. म्हणून गेली अनेक वर्षे हेच विश्वस्त काम करीत आहेत. प्रत्येक ट्रस्टसाठी वेगवेगळ्या विश्वस्तांचा संच नाही. चित्रशाळा ट्रस्ट बोर्ड या नावाने विश्वस्तांच्या सभा भरत आहेत व ठराव केले जात आहेत.

(४) श्री. देवगिरीकरांनी दोन्ही ट्रस्टचा राजीनामा दिलेला असूनही ते आता दुसऱ्या ट्रस्टचा राजीनामा परत घेण्याच्या विचारात आहेत.

(५) डेप्युटी चॅरिटी कमिशनरनी आपल्या निकालपत्रात असे स्वच्छ म्हटले आहे की, श्री. देवगिरीकरांचे राजीनाम्याचे पत्र दोन्ही ट्रस्टना उद्देशून लिहिलेले आहे. म्हणून त्यांना कोणत्याही एका ट्रस्टचा ट्रस्टी म्हणून राहण्यास मनाई करण्यात यावी.

(६) प्रतिवादीच्या अर्जाचा निर्णय देताना डिस्ट्रिक्ट जजांनी दुर्दैवानें डेप्युटी चॅरिटी कमिशनरचा हा निर्णय फिरविला आहे. म्हणून हे अपील करण्यात येत आहे.

(७) रजिस्ट्रारसमोर " स्टे " संबंधीच्या अर्जाचे समर्थन करणे म्हणजे एक प्रकारे अपील चालविणे आहे व रजिस्ट्रारला हे अपील चालविण्याचा आधिकार नाही असा युक्तिवाद करण्यात आला पण रजिस्ट्रारनी १८ ऑक्टोबरपर्यंत स्टे देण्यास मान्यता दिली आणि अर्जदाराने हायकोर्टाकडून योग्य हुकूम मिळवावा असे सांगितले.

(८) ह्या अपीलाची सुनावणी होऊन त्याचा निर्णय लागेपर्यंत रजिस्ट्रारनी दिलेला स्टे वाढवून मिळावा किंवा नवीन स्टे द्यावा, म्हणून अर्जदाराकडून हा अर्ज करण्यात येत आहे.

(९) प्रतिवादी ट्रस्टच्या हिताच्या विरुद्ध वर्तन करीत आहेत व पैशाची खैरात करीत आहेत आणि धर्मादायाच्या नावाखाली ते आपल्या पित्त्यांना (Chosen Pets) व मर्जीतल्या लोकांना हवे तितके पैसे देण्याचा दाट संभव आहे. त्यांनी ट्रस्टचा पैसा असा हवा तसा उधळला म्हणजे ट्रस्टच संपुष्टात

येण्याची शक्यता आहे. म्हणून कोर्टाने स्टे वाढवून दिला नाही किंवा नवीन दिला नाही तर कधीही भरून न येणारे नुकसान होण्याचा दाट संभव आहे. म्हणून ट्रस्ट मिळकतीच्या हितसंबंधाच्या दृष्टीने स्टे हा अत्यंत आवश्यक आहे.

या बाबतीत अपील केलेच आहे, पण ते हायकोर्टापुढे सुनावणीत येण्यास विलंब लागण्याची शक्यता असल्यामुळे मध्यंतरीच्या काळासाठी स्टेची जरूरी आहे. हे अपीलही शक्य तो लवकर घेतले जावे अशी प्रार्थना आहे."

हायकोर्टाने हा स्टेसंबंधीचा अर्ज ता. २६–१०–७२ रोजी फेटाळला.

जनरल ट्रस्टच्या स्थावर मालमत्तेचा प्रश्न

त्र्यं. र. देवगिरीकर व वि. अ. पटवर्धन यांनी एका ट्रस्टचे राजीनामे दिले की दोन्ही ट्रस्टचे दिले यासंबंधी असिस्टंट चॅरिटी कमिशनर (एम्. जी. मदन) व एक्स्ट्रा जॉइंट सब्ज (ए. व्ही. पाटकर) यांनी दिलेले निकाल निर्णायक स्वरूपाचे आहेत, त्याप्रमाणे चित्रशाळा भवन व चित्रशाळेच्या मागील बाजूची नवी इमारत यांच्यासंबंधी देवकुळे यांनी ज्या तक्रारी केल्या होत्या त्याला जॉइंट चॅरिटी कमिशनर (सी. व्ही. पटेल) यांनी चोख उत्तर देऊन व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या स्थावर मालमत्तेसंबंधीचा वाद निकालात काढला आहे. पटेल यांनी दिलेला निकाल महत्त्वाचा असल्यामुळे तो पुढे दिला आहे.

जॉइंट चॅरिटी कमिशनर सी. व्ही. पटेल यांनी दिलेला निकाल

(२–१–१९७२)

वादी : वसंत गणेश देवकुळे

प्रतिवादी : दा. त्र्यं. जोशी

बॉंबे पब्लिक ट्रस्टस् ॲक्टच्या ७०– अ कलमाखाली केलेला रिव्हिजन अर्ज

विषय : व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट

निकालपत्र :

हा रिव्हिजन अर्ज आहे व असि. चॅरिटी कमिशनर, पुणे, यांनी चेंज रिपोर्ट नं. २५७ (१९६९) बाबत दिलेल्या निर्णयाविरुद्ध व हुकुमाविरुद्ध केलेला आहे.

वरील १९६९ सालचा चेंज रिपोर्ट नं. २५७ हा डी. टी. जोशी यांनी केलेला आहे. चित्रशाळा भवन व चित्रशाळा प्रेसच्या मागील बाजूची नूतनीकरण केलेली इमारत ही स्थावर मालमत्ता "व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट" यांच्या मालकीची आहे. हे चॅरिटी कमिशनरच्या कागदोपत्री नमूद करण्यासाठी हा चेंज रिपोर्ट जोशी यांनी केला. हा ट्रस्ट नं. ई ६ या नावाने राजिस्टर करण्यात आलेला आहे. या चेंज रिपोर्टात असे नमूद करण्यात आले आहे : घर नं. ३५४ अ नारायण पेठ (जुना घर नं. ९३७ सदाशिव पेठ) ही जागा जनरल ट्रस्ट रजिस्टर केला तेव्हा जनरल ट्रस्टच्या मालकीची होती. त्या वेळी ही जागा मोकळी व बखळवजा होती. १९६२ साली या जागेवर ट्रस्टींनी इमारत बांधण्यास सुरवात केली. ही इमारत १९६८ साली पूर्ण झाली व तिला "चित्रशाळा भवन" असे नाव देण्यात आले. विश्वस्त दा. त्र्यं. जोशी यांनी असे नमूद केले आहे की, चित्रशाळा भवन ही लक्ष्मीरोडवरील खूप मोठी व तिमजली इमारत आहे. त्याचप्रमाणे ट्रस्टींनी चित्रशाळा प्रेसची मागील बाजू (५६२ सदाशिव– पूर्वीचा १०२६ सदाशिव) जी रिकामी होती त्या जागेवर १९६७ साली बांधकाम सुरू केले. ही नूतनीकरण केलेली इमारत १९६८–१९६९ साली पूर्ण झाली. म्हणून दा. त्र्यं. जोशी यांनी आपल्या अर्जात अशी मागणी केली आहे की, चित्रशाळा भवन व ५६२ सदाशिव या इमारतीच्या मागील बाजूची नूतनीकरण केलेली नवी इमारत या दोन्ही इमारती जनरल ट्रस्टच्या मालकीच्या आहेत, असे नमूद केले जावे.

असि. चॅरिटी कमिशनर यांना असे दिसून आले आहे की, ३५४–अ, नारायण पेठ ही मिळकत जनरल ट्रस्टच्या मालकीची असून पब्लिक ट्रस्ट रजिस्टरमध्ये तिची तशी नोंदही झालेली आहे. त्याचप्रमाणे ५६२ सदाशिव-मधील नवी इमारत १ लक्ष रुपये खर्च करून बांधण्यात आलेली आहे. ही इमारतही जनरल ट्रस्टचीच आहे. या दोन्ही स्थावर मिळकतींची मालकी ठरविण्याबाबत जो चेंज रिपोर्ट करण्यात आलेला होता तो असिस्टंट चॅरिटी कमिशनरनी मान्य करून त्याप्रमाणे हुकूमही काढला आहे. चेंज रिपोर्टमध्ये नमूद केलेल्या दोन्ही मिळकती "व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट"च्या मालकीच्या आहेत, असा असि. चॅरिटी कमिशनरनी शेवटी स्पष्ट निर्णय दिला.

त्यावर वादी व. ग. देवकुळे यांनी हा रिव्हिजन अर्ज केला आहे.

अर्जदार देवकुळे हे जनरल ट्रस्टप्रमाणे चित्रशाळा प्रेस ट्रस्टचेही एक विश्वस्त आहेत, यात वाद नाही. त्याचप्रमाणे वरील दोन्ही ट्रस्ट ट्रस्ट कायद्यान्वये रजिस्टर केले असून प्रतिवादी जोशीही दोन्ही ट्रस्टचे विश्वस्त आहेत, हे निर्विवाद आहे. वर उल्लेखिलेल्या दोन्ही इमारती दोन्ही ट्रस्टच्या मालकीच्या आहेत. असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदाराचा आणखी असा दावा आहे की, चेंज रिपोर्टबद्दल त्याला नोटीस देण्यात न आल्यामुळे त्याला आपला विरोध नमूद करण्याची संधी मिळाली नाही. त्याचे म्हणणे असे आहे की, ह्या मिळकती केवळ एकाच ट्रस्टच्या मालकीच्या आहेत असे समजल्यास दोन्ही ट्रस्टच्या व्यवस्थेत घोटाळे उत्पन्न होतील.


या दोन सह–विश्वस्तांमधील मुख्य वादाचा मुद्दा या दोन इमारती होत. प्रतिवादी जोशी यांच्या म्हणण्याप्रमाणे ह्या दोन्ही मिळकती व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट या एकाच ट्रस्टच्या मालकीच्या आहेत, तर अर्जदाराचे म्हणणे असे आहे की, या मिळकती व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट व चित्रशाळा प्रेस ट्रस्ट या दोन्ही ट्रस्टच्या संयुक्त मालकीच्या आहेत. अर्जदाराची अशी तक्रार आहे की, तो जरी एक विश्वस्त आहे तरी त्याला चेंज रिपोर्टची नोटीस देण्यात आलेली नाही. अर्जदाराच्या विद्वान वकिलानी असे निवेदन केले आहे की, अर्जदाराला जर नोटीस दिली असती तर त्याने ह्या मिळकती दोन्ही ट्रस्टच्या आहेत असे पुराव्यानिशी दाखवून दिले असते. त्या वकिलांचे असे आग्रहपूर्वक म्हणणे आहे की, असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांनी काढलेला हुकूम नैसर्गिक न्यायतत्त्वाचा भंग करणारा आहे व अर्जदाराला आपले म्हणणे मांडण्यास संधी मिळालेली नाही. चेंज रिपोर्टची नोटीस अर्जदाराला देण्यात आली नसल्यामुळे मी सर्वसामान्यपणे अर्जदाराची ही विनंती मान्य केली असती. पण सध्याच्या दाव्यात जी वस्तुस्थिति मांडली आहे ती विचारात घेऊन अर्जदारांनी मालमत्तेच्या मालकीसंबंधी जे म्हणणे मांडले आहे त्यात मला काही तथ्य दिसत नाही.

३५४–अ नारायण या जागेवर ही नवी इमारत बांधली आहे ही महत्त्वाची गोष्ट आहे. त्याचप्रमाणे या जागेवर उभारलेली इमारत ही व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या मालकीची आहे, अशी नोंद पब्लिक ट्रस्ट रजिस्टरमध्ये यापूर्वीच झालेली आहे. त्याचप्रमाणे ५६२ सदाशिव या जागेवर उभारलेल्या

इमारतीचे नूतनीकरण केले आहे आणि तीसुद्धा व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या मालकीची म्हणून पब्लिक ट्रस्ट रजिस्टरमध्ये नोंदलेली आहे. असिस्टंट चॅरिटी कमिशनरनी पूर्ण चौकशी करून जो कायदेशीर निर्णय दिला त्यावरूच या दोन्ही इमारतींची पब्लिक ट्रस्ट रजिस्टरमध्ये नोंद करण्यात आली आहे. यावरून काही प्रश्न उद्भवतात. पब्लिक ट्रस्टच्या १९ व्या कलमानुसार ट्रस्टची मिळकत कोणती याची चौकशी केली आहे काय? असिस्टंट चॅरिटी कमिशनर किंवा डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी १९ व्या कलमाप्रमाणे चौकशी करून कोणती मिळकत कोणाची आहे हे ठरावयाचे असते. या खटल्यात असि. चॅरिटी कमिशनर यांनी चौकशी करून या दोन्ही मिळकती व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या मालकीच्या आहेत असा निर्णय दिला आहे. आणि त्या निर्णयानुसार पब्लिक ट्रटच्या रजिस्टरमध्ये तशी नोंद केली आहे. या नोंदी-विरुद्ध अपील किंवा रिव्हिजन अर्ज करण्यात आलेला नाही, हे अवश्य लक्षात ठेवण्यासारखे आहे. म्हणून रजिस्टरमध्ये केलेली नोंद निर्णायक व निर्विवाद आहे हे स्वाभाविक आहे. म्हणून, जोपर्यंत रजिस्टरमध्ये झालेली ही नोंद कायम आहे, तोपर्यंत त्याविरुद्ध कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. ३५४—अ, नारायण या ठिकाणची मूळ जमीन ज्या ट्रस्टची आहे त्या ट्रस्टने त्या जमिनीवर बांधलेली इमारत त्याच ट्रस्टच्या मालकीची असावी हे अगदी स्वाभाविक आहे. त्याचप्रमाणे ५६२ सदाशिव या मिळकतीबद्दल हेच म्हणता येईल. नूतनीकरण केलेली इमारत जनरल ट्रस्टच्याच मालकीची असणार हे उघड आहे. अर्जदाराचे विद्वान वकील यांचे असे म्हणणे आहे की, पब्लिक ट्रस्ट रजिस्टरमध्ये ज्या मिळकतीची नोंद आहे तिचा संबंध मूळ ट्रस्ट डीडशी असल्यामुळे त्याचा स्वतंत्रपणे विचार करू नये. मला हे म्हणणे मान्य नाही. ट्रस्ट रजिस्टरमध्ये जी नोंद करण्यात आली आहे ती अखेरची व निर्णायक आहे. म्हणून ही मिळकत दोन ट्रस्टच्या मालकीची आहे हे अर्जदाराचे म्हणणे समर्थनीय नाही.

म्हणून या रिव्हिजन अर्जात मला काही अर्थ दिसत नाही. सबब तो मी नामंजूर करतो. आणि तो फेटाळण्याच्या लायकीचा असल्यामुळे फेटाळतो. आणि त्याप्रमाणे हुकूम देतो.

(ता. २–१–७२) या रिव्हिजन अर्जावर अपील झाले नाही.



चित्रशाळेची मूळ इमारत



चित्रशाळा — भवन

वासुकाका जोशी विश्वस्तनिधीच्या मालकीची लक्ष्मीरोडवरील इमारत

जनरल ट्रस्ट व जनता सहकारी बँक

देवकुळे यांनी जनरल ट्रस्टच्या बाबतीत ज्या अनेक प्रकारच्या गोष्टी केल्या त्यांत जनता सहकारी बँकेकडून त्यांनी पैशाचे सर्व व्यवहार स्थगित ठेवण्यात जे यश मिळविले ते त्रासदायक ठरले. जनता बँकेला चॅरिटी कमिशनर व हायकोर्ट यांच्याकडे अपील केल्याचे सांगून जनरल ट्रस्टचे खाते ऑपरेट करण्यास जनरल ट्रस्टला बंदी करविली. देवकुळे व जनता बँक यांचे निकट संबंध असल्यामुळे देवकुळे यांनी सतत तीन वर्षे ज्या हरकती घेतल्या त्या बँकेने मानल्या व जनरल ट्रस्टची जितकी कुचंबणा करता येईल तितकी केली. जनरल ट्रस्टचे सुमारे १ लाख रुपये जनता बँकेत होते. त्यावर ट्रस्टचा सर्व व्यवहार अवलंबून होता. पण जनता बँकेने ताणून धरल्यामुळे जनरल ट्रस्टने शेवटी बँकेस नोटीस दिली. जनरल ट्रस्टचे पैसे अडकवून ठेवण्याचा बँकेस अधिकार नाही व बँकेने पैसे दिले नाहीत तर बँकेवर कायदेशीर इलाज केला जाईल असे कळविले. कोर्टाचे निकाल दाखवूनही बँकेने पैसे देण्याचे नाकारले होते त्याचे कारण देवकुळे बँकेला अपील केल्याचे व स्टे आणल्याचे सांगत. हायकोर्टाने स्टे नामंजूर केला तरी बँकेने जनरल ट्रस्टचे खाते ऑपरेट करण्यास परवानगी दिली नाही. देयकुळे यांच्या सल्ल्यावरून ज्या जनता बँकेने जनरल ट्रस्टचे पैसे अडकवून ठेरण्याचा मार्ग अनुसरला तीच जनता बँक चित्रशाळा प्रेसचे मॅनेजर व ट्रस्टी व. ग. देवकुळे यांना कर्जाच्या बाबतीत उपयोगी पडली नाही. चित्रशाळा कर्जफेड करीत नाही म्हणून जनता बँकेने अखेर लिलावाची तयारी केली होती.

०

प्रकरण सहावे

नवीन व्यवस्थापकांची कारकीर्द

देवगिरीकरांच्या राजीनाम्यानंतर व. ग. देवकुळे यांनी मॅनेजर दा. त्र्यं. जोशी यांना वयाच्या सबबीवर बेकायदा बडतर्फ केले व १९६८ अखेर चित्रशाळेची सर्व सूत्रे हाती घेतली. चित्रशाळेचे ते मॅनेजर झाले. पण त्यांच्या कारकीर्दीत चित्रशाळेचा उत्कर्ष होण्याऐवजी दिवसेदिवस तिचा अपकर्षच होत गेला. पूर्वी चित्रशाळा कामगारांचे कधी संप होत नसत. पण देवकुळे व्यवस्थापक झाल्यापासून कामगारांचे वेळोवेळी संप होऊ लागले. कारण कामगारांना वेळेवर पगार मिळेनासे झाले. अशा संपाच्या परिस्थितीत देवकुळे थातुरमातुर करून कामगारांची तात्पुरती गरज कशीबशी भागवीत. देवकुळे यांच्या कारकीर्दीत बाहेरची कामे कमी झाली होती. चित्रशाळेची पुस्तकेही निघत नव्हती. व्यवस्थापकांचे सर्व लक्ष कोर्टकचेऱ्यांकडे असे. एखादा कामगार जर नियमाप्रमाणे निवृत्त झाला तर त्याचा शेवटचा पगार व निवृत्तिवेतन देण्यास व्यवस्थापक देवकुळे खळखळ करीत, इतकेच नव्हे तर त्याला कोर्टात जा असे सांगत.

कामगारांच्या तक्रारींची देवकुळे यांनी कधीच दखल घेतली नाही. कामगारांनी लेबर ऑफीसरकडे तक्रार केल्यावर लेबर ऑफिसर दोघांनाही आपल्या ऑफीसात बोलावीत, पण देवकुळे कधीच हजर राहात नसत. मग लेबर ऑफिसर कंटाळून अखेर कामगारांना लेबर कोर्टात जा, असे सांगत असत. पण यामुळे कामगारांना निष्कारण भुर्दण्ड पडे. कोर्ट खर्च, वकील फी असा अनावश्यक खर्च त्यांना करावा लागे. या सर्व खर्चास देवकुळेच कारणीभूत होते. त्यांच्याकडे कोणी काही कायदेशीरपणाची मागणी केली की, ' कोर्टात जा ' असे त्यांचे ठराविक उत्तर असे, असे कामगारांच्या तक्रारींवरून दिसून येते.

ठेवीदारांच्या बाबतीतही देवकुळे यांची वृत्ती अशीच होती. चित्रशाळा प्रेसमध्ये अनेकांनी ठेवी ठेवल्या होत्या, पण त्यांचे व्याजही नियमितपणे देण्यात येत नव्हते. काही ठेवीदार आपल्या ठेवी परत मागत असता त्यांना नकार देण्यात येत असे. काही ठेवीदार मयत झाल्यामुळे त्यांच्या ठेवींची व्यवस्था ट्रस्टी कंपन्या पाहात होत्या. त्यांनाही देवकुळे यांजकडून अशीच उत्तरे दिली

जात होती. वासुकाकांच्या एका नातीने चित्रशाळेत नऊ हजार रुपये ठेव म्हणून ठेवलेले होते. तिने ती ठेव चित्रशाळेचे मॅनेजर व वासुकाकांचे नातू असलेले व. ग. देवकुळे यांच्याकडे परत मागितली असता त्यांनी नकार दिला. तेव्हा त्यांच्यावर फिर्याद करावी लागली. तिचा निकाल देवकुळे यांच्याविरुद्ध लागला व चित्रशाळेवर जप्ती आणून रक्कम वसूल करण्यात यावी असा कोर्टाने हुकूम दिला. कोर्टाचा हा निकाल १९७३ च्या जुलै महिन्यातला आहे.

देवकुळे यांनी आपले सहकारी व सहविश्वस्त यांच्यावर कशा प्रकारे व किती फिर्यादी केल्या त्याचे वर्णन मागे आलेच आहे. चित्रशाळेचे व्यवस्थापक दा. त्र्यं. जोशी यांजवर देवकुळे यांनी पैशाच्या अफरातफरीचा दावा लावला होता. पण कोर्टाने देवकुळे यांच्याविरुद्ध निकाल देऊन खोटी फिर्याद केल्याबद्दल तुम्हांला दंड का करू नये अशी नोटीस काढली. यावर देवकुळे यांनी सेशन्स कोर्टात अपील केले, पण तेथेही खालच्या कोर्टाचा निकाल कायम झाला व दा. त्र्यं. जोशी निर्दोषी ठरले. असिस्टंट चॅरिटी कमिशनर (एम्. जी. मदन) यांनी देवकुळे यांजकडून ट्रस्टच्या नुकसानीबद्दल ९०० रु. वसूल का करू नयेत अशी नोटीस काढली (ता. ६–१०–१९७०). देवगिरीकरांना त्यांच्या पुस्तकांची रॉयल्टी देण्यास देवकुळे यांनी नकार दिला तेव्हा देवगिरीकरांना नाइलाजास्तव कोर्टाकडे धाव घ्यावी लागली. देवगिरीकरांची रॉयल्टी मान्य असल्याबद्दल देवकुळे यांच्या सहीचे अस्सल पत्र देवगिरीकरांनी कोर्टात दाखल केले. पण देवकुळे यांनी या पत्रावरील सही माझी नाही, असे कोर्टाला धडधडीत-पणे खोटे सांगितले. या खटल्याचा निकाल ता. १३–३–७३ रोजी देवगिरीकर यांच्यासारखा होऊन त्यांनी मागितलेली रक्कम रु. १,५०० देवकुळे यांनी द्यावी असे कोर्टाने फर्माविले. दा. त्र्यं. जोशी यांना व्यवस्थापकपदावरून कमी केल्यामुळे त्यांनी देवकुळे यांजविरुद्ध जी फिर्याद दाखल केली होती तिचाही निकाल या वर्षातच ता. ३१–७–७३ रोजी लागला. व जोशी यांना नुकसानभरपाई म्हणून ६,३०० रु. द्यावे व त्यांना परत कामावर घ्यावे असा कोर्टाने हुकूम दिला. याशिवाय देवकुळे यांच्या विरुद्ध कामगारांचे व गिऱ्हाईकांचे दावे चालूच होते.

वासुकाकांच्या मागे पुत्रसंतती नसल्यामुळे त्यांची सर्व जिंदगी (म्हणजे चित्रशाळा प्रेस, शेत जमिनी, घरे) वारसाचा हक्क दाखवून मिळविण्याचा देवकुळे

यांचा डाव होता, पण तो कसा फसला हे मागे सांगितलेच आहे. देवकुळे यांनी चित्रशाळेच्या द्वारे आपले हित कसे साधले याची उदाहरणे कामगारांनी चॅरिटी कमिशनरला केलेल्या तक्रार–अर्जात नमूद केली आहेत. पहिली गोष्ट म्हणजे त्यांनी आपले बंधु ज. ग. देवकुळे यांना चित्रशाळा प्रेस ट्रस्टवर ट्रस्टी म्हणून घेतले आणि चित्रशाळेचे मॅनेजर दा. त्र्यं. जोशी यांना मॅनेजरपदावरून बडतर्फ केले. म्हणजे चित्रशाळेवर देवकुळे यांचे अधिराज्य सुरू झाले. त्यांनी चित्रशाळेत चीफ अकौंटटची नवी जागा निर्माण करून त्या जागेवर आपल्या चिरंजीवांची नेमणूक केली. जाहिरात देऊन अर्ज मागविले नाहीत.

अशा प्रकारे देवकुळे यांचा कारभार चालू होता. त्यांच्या अशा कारभारामुळे त्यांना व्यवस्थापकपदावरून दूर करावे, त्याचप्रमाणे ट्रस्टी म्हणूनही त्यांना काढून टाकावे, अशा आशयाचे अर्ज त्यांचे सहकारी विश्वस्त व प्रेसचे कामगार यांनी वेळोवेळी चॅरिटी कमिशनरकडे केले होते. चॅरिटी कमिशनरनी या तक्रार-अर्जांचे काय केले ते कळले नाही. व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टचे दोन विश्वस्त दा. त्र्यं. जोशी व वि. अ. पटवर्धन यांनी २–१–१९७० व १६–२–१९७१ रोजी मे. चॅरिटी कमिशनर यांच्याकडे देवकुळे यांच्या गैरकारभाराबाबत व चित्रशाळेच्या नुकसानीबाबत एक निवेदन पाठविले होते. त्यात त्यांनी देवकुळे यांना दूर करावे व त्यांच्या जागी ॲड्मिनिस्ट्रेटरची नेमणूक करावी अशा आशयाची मॅनेजमेंट स्कीम पाठविली होती. (कामगारांनी केलेले तक्रारअर्ज व ट्रस्टींनी सुचविलेली मॅनेजमेंट स्कीम पुढे परिशिष्टात दिली आहे.)

परिशिष्ट : १

चित्रशाळा कामगारांच्या तक्रारी

(चित्रशाळेचे व्यवस्थापक व. ग. देवकुळे यांच्याविरुद्ध काही कामगारांनी चॅरिटी कमिशनरकडे तक्रार अर्ज करून देवकुळे यांना काढून टाकण्यात यावे अशी मागणी केली होती. कामगारांनी आपल्या तक्रार-अर्जात देवकुळे यांच्या गैरकृत्यांची पुढीलप्रमाणे यादी दिली होती :)

१. ट्रस्टींना कोर्टाने प्रोबेट देऊ नये, आम्हीच वारस आहो, असा दावा देवकुळे यांनी केला होता.

२. १९५६ साली सांगली कोर्टात चित्रशाळेसंबंधीच्या खटल्यात देवकुळे यांनी चित्रशाळेविरुद्ध साक्ष दिली.

३. १९६१–१९६२ साली व. ग. देवकुळे यांचे बंधू अ. ग. देवकुळे यांनी प्रकाशन विभागाविरुद्ध तक्रारअर्ज करून पोलिसांकडून संस्थेची चौकशी करविली. त्यांना अर्थातच व. ग. देवकुळे यांचे अंतःस्थ सहाय्य असले पाहिजे. चित्रशाळा संस्था ताब्यात घेण्याची देवकुळे बंधूंची इच्छा २७–९–१९६८ नंतर पूर्ण झाली. त्यांची इच्छा सफल झाल्याचा मजकूर "आपली शेती" मासिकाच्या ज्येष्ठ शके १८९२ या अंकात १४ व्या पानावर आला आहे.

४. दोन्ही ट्रस्ट एकच आहेत व देवगिरीकरांनी दिलेला राजीनामा दोन्ही ट्रस्टचा आहे असे ठरवून देवकुळे यांनी भाडेवसुली केली. भाडेकऱ्यांना नोटिसा दिल्या. कॉर्पोरेशन टॅक्स भरणे अशक्य केल्यामुळे कॉर्पोरेशनने तो परस्पर वसूल केला. या जादा रकमेचा संस्थेलाच भुर्दण्ड पडला.

५. जनरल ट्रस्टच्या मालकीच्या इमारतीमधील भाडेकऱ्यांकडून भाडे वसूल केले.

६. स्वतःच्या मुलाला ४०० रु. वर चीफ अकौंटंट नेमले व लगेच त्याचा प्रॉव्हिडंट फंड सुरू केला. आणि आपलाही पगार वाढवून घेतला.

७. मॅनेजर दा. त्र्यं. जोशी यांना वयाच्या सबबीवर बडतर्फ केले व त्यांच्यावर अफरातफरीच्या फिर्यादी केल्या.

८. कोर्टाच्या कामी फिर्यादी, अपिले, वकील, कोर्ट फी इत्यादि बाबतीत भरमसाट खर्च केला.

९. दोन वर्षे ऑडिट नाही, तोटा किती झाला याचा हिशेब नाही. प्रवासभत्ता किती झाला, कोर्टखर्च किती झाला याचा ताळमेळ नाही.

१०. एक मशीन चंदेल प्रकाशन यांस विकले असता ते त्यांना दिले नाही. पुन्हा दुसऱ्यांदा तेच मशीन दुसऱ्या गिऱ्हाइकाला परस्पर विकले, या फसवणुकीबद्दल चंदेल यांनी फिर्याद केली.

११. कामगारांच्या तक्रारी लेबर ऑफीसरकडे गेल्यावर लेबर ऑफीसर व्यवस्थापक म्हणून देवकुळे यांना तडजोडीसाठी बोलावतात, पण ते

हजरच राहात नाहीत. तेव्हा लेबर ऑफीसर कंटाळून कामगारांना सांगतात की, औद्योगिक कोर्टात जा. यामुळे कामगारांना निष्कारण भुर्दण्ड पडतो.

१२. व. ग देवकुळे हे पुण्याच्या नवविधान फलसंरक्षण सहकारी संस्थेचे चेअरमन होते. त्यांच्याविरुद्ध संस्थेच्या कार्यकारी मंडळाने तारीख २०–९–६९ रोजी ठराव केला व त्यांच्याकडून येणे असलेली रु. १८,२७७ ही रक्कम वसूल करण्याची सहकारी खात्याने व्यवस्था करावी अशी मागणी केली.

१३. महाराष्ट्र सरकारने काही पुस्तके चित्रशाळेला छापण्यास दिली होती. त्या पुस्तकाच्या कागदाच्या बाबतीत काही भानगड झाली असावी असा संशय आहे.

१४. ‘शालापत्रका’च्या दिवाळी अंकात एक सरकारी जाहीरात आली होती. ती छापून फक्त २५ अंकांतच चिकटविली होती व तिचे संपूर्ण बिल मिळविले. या गैरव्यवहाराची सरकार तर्फे चौकशी झाली असे समजले, पण पुढे काय झाले ते कळले नाही.

अशा प्रकारे व. ग. देवकुळे, त्यांचे बंधू व चिरंजीव यांनी चित्रशाळा बळकावली आहे व देवकुळे मन मानेल तसा कारभार करीत आहेत. तरी चित्र-शाळेच्या व कामगारांच्या हितासाठी व. ग. देवकुळे यांना व्यवस्थापकपदावरून ताबडतोब दूर करावे अशी आमची मागणी आहे.

परिशिष्ट : २

व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या तक्रारी

१. या ट्रस्टचे व्ही. जी. देवकुळे ट्रस्टी असूनही सभेला हजर राहात नाहीत व हजर राहिले तर प्रत्येक गोष्टीत अडथळे आणतात.

२. जनरल ट्रस्टची मोठी रक्कम चित्रशाळा प्रेसकडून येणे आहे. ती दिलेली नाही. (सुमारे ३ लाख)

३. प्रेसकडून वार्षिक भाडे रु. १,५०० जनरल ट्रस्टकडे यावे लागते. ते गेली तीन वर्षे आलेले नाही. चित्रशाळा ग्रंथभांडाराचेही वार्षिक भाडे रु. १,२०० दोन वर्षांचे येणे आहे.

४. चित्रशाळा प्रेस ट्रस्टचे हिशेब २–३ वर्षे ऑडिट करून घेतले नाहीत.
५. चित्रशाळेच्या मालकीचे मुंबईचे दुकान बापट आणि कंपनीकडे दिले होते. त्यासाठी रु. २,००० डिपॉझिट ठेवले होते. ही रक्कम वसूल झाली की नाही याची चौकशी करावी.

परिशिष्ट : ३

चॅरिटी कमिशनरकडे दा. त्र्यं. जोशी यांचा तक्रार अर्ज

(२६-६-७०)

१. देवकुळे व्यवस्थापक झाल्यापासून छापखान्यास सालोसाल नुकसानी येत आहे.
२. कामगारांशी त्यांचे जे वर्तन आहे ते अत्यंत असभ्य व चीड आणणारे आहे. व्यवस्थापक या नात्याला शोभणारे नाही. कामगारांचे त्यांच्याविरुद्ध जे अर्ज, तक्रारी व फिर्यादी चालू आहेत, यावरून देवकुळे यांच्या वागणुकीची कल्पना येईल.
३. कामगारांवर त्यांचा विश्वास नाही, त्याप्रमाणे कामगारांचा त्यांच्या शब्दावर नाही.
४. गिऱ्हाईकांशी ते अत्यंत उद्धटपणे वागतात. त्यामुळे बाहेरची कामे येण्याचे बंद झाले आहे. गजाननविजय, गांधी वाङ्मय, गांधी स्मारक-निधीचे ग्रंथ इत्यादि कामे त्यांच्या वर्तनामुळे चित्रशाळेतून गेली. ही कामे सुमारे १ लाखाची होती.
५. त्यांच्यामुळे चित्रशाळा छापखान्याचे नुकसान होत आहे, म्हणून त्यांना कमी करावे.

परिशिष्ट : ४

देवकुळे यांची पत्रके

व्ही. जी. जोशी ट्रस्टचे विश्वस्त (चित्रशाळा प्रेस व चॅरिटेबल) व. ग. देवकुळे यांच्या कोर्टकचेऱ्या चालू असतानाही ते व्ही. जी. जोशी चॅरिटेबल (जनरल) ट्रस्ट व व्ही. जी. जोशी चित्रशाळा प्रेस, ट्रस्ट यासंबंधी ' वस्तुस्थितीचे निवेदन ' करणारी पत्रके छापून काढीत होते व चित्रशाळा भवनचे भाडेकरी व इतर

संबंधित यांना वाटीत होते. जनरल ट्रस्टचे अध्यक्ष श्री. देवगिरीकर यांच्याबद्दल गैरसमज उत्पन्न करणे, त्यांची बदनामी करणे व स्वतःची बाजू मांडणे हा या निवेदनांचा मुख्य हेतू होता, असे ही निवेदने पहाता दिसून येईल.

याशिवाय, चित्रशाळा प्रेस ट्रस्टचे एक विश्वस्त ज. ग. देवकुळे यांनी 'आमचे अप्पा' या आपल्या वडिलांच्या चरित्रात व पुण्याच्या 'सोबत' साप्ताहिकाच्या दिवाळी अंकात (१९७३) श्री. देवगिरीकरांची वैयक्तिक बदनामी करणारा मजकूर लिहिला होता. त्याचाही या ठिकाणी उल्लेख करणे अवश्य आहे.

प्रकरण सातवे

चित्रशाळेचा अस्त

देवगिरीकरांनी व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टचा राजीनामा दिला आहे की नाही व चित्रशाळा भवन ही इमारत कोणत्या ट्रस्टच्या मालकीची आहे हे ठरवून घेण्यासाठी देवकुळे यांनी किती खटपटी व कोर्टकचेऱ्या केल्या त्याचा वृत्तान्त मागे आलाच आहे. चॅरिटी कमिशनरपासून हायकोर्टापर्यंत देवकुळे यांचे दावे कसकसे गेले व त्यांचे निकाल कसे लागले हे सांगण्याचे कारण नाही. न्यायकोर्टाचे निवाडेच ते सांगतील. पण या कोर्टकचेऱ्या न करता देवकुळे यांनी सामोपचाराने ही प्रकरणे मिटविली असती तर किती चांगले झाले असते.

देवकुळे यांनी जनता सहकारी बँकेकडून वेळोवेळी जे कर्ज काढले होते ते दिवसेदिवस वाढतच चालले. कामगारांकडून कापून घेतलेला प्रॉव्हिडंट फंड सरकारकडे भरण्यात टाळाटाळ होऊ लागली. कामगारांची बोनसची व पगारवाढीची मागणी फेटाळण्यात आली. त्यामुळे चित्रशाळेतील काम थंडावण्याची वेळ आली. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी किंवा त्यातून काही तोड काढण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. प्रथम जनता बँकेच्या पाठिंब्याने के. डी. जोशी नावाचे इसम पुढे आले व त्यांना चित्रशाळा छापखान्याची जागा दरमहा पाचशे रुपये भाड्याने देण्याचा देवकुळे यांनी विचार चालविला. पण ही जागा चित्रशाळा प्रेसच्या मालकीची नसून व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या मालकीची असल्यामुळे ती परस्पर दुसऱ्याला देण्याचा त्यांना हक्क पोचत नाही, असे जेव्हा जोशी यांना सांगण्यात आले तेव्हा होऊ घातलेला हा करार मुळातच फेटाळला गेला. तेव्हा देवकुळे यांनी ॲड्व्होकेट अमरसिंग ज्योतीराव जाधव यांना चित्रशाळा चालविण्यास दिली व ता. १–३–१९७३ पासून चित्रशाळा प्रेसचे ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह मॅनेजर म्हणून ते काम पाहू लागले. चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या तीन ट्रस्टींपैकी व. ग. देवकुळे व ज. ग. देवकुळे यांनी ता. १५–५–१९७३ रोजी जाधव यांच्याबरोबर जागेसंबंधी करार केला. तिसरे ट्रस्टी दा. त्र्यं. जोशी यांनी या करारावर सही करण्याचे नाकारले आणि असिस्टंट चॅरिटी कमिशनर, पुणे विभाग, यांच्याकडे आपला विरोध नोंदवला. तिघांपैकी दोघा ट्रस्टींनी

जाधव यांच्याबरोबर जो करार केला तो मुळातच कायदेशीर नव्हता व तो कायद्याच्या दृष्टीने अस्तित्वातच आला नव्हता. तरी देखील या कराराच्या आधारे ॲड. जाधव चित्रशाळा प्रेसचे संचालक झाले.

या कराराच्या पोटी जाधव यांनी चित्रशाळेला काय साहाय्य करण्याचे कबूल केले व चित्रशाळेची आर्थिक बाजू सावरण्यासाठी किती रक्कम देऊ केली ते समजले नाही. मात्र त्यांनी दरमहा ५०० रु. भाड्यात ५६२ सदाशिव ही संपूर्ण मिळकत मिळविण्याचा प्रयत्न केला. या कराराच्या आधारे चित्रशाळा प्रेसची माशिनरी, पुस्तके वगैरेवरही त्यांनी हक्क सांगण्यास सुरवात केली. तसेच ५६२ सदाशिव या जागेत गाळे पाडून ते भाड्याने देण्याचाही अधिकार त्यांनी मिळविला होता. जाधव यांनी प्रेससाठी जो काही पैसा पुढे केला तो ठेव म्हणून दिला व तो सुद्धा स्वतः न देता परस्पर दुसऱ्याकडून देवविला असे सांगण्यात येते. त्यांनी कामगारांचे पगार दिले नाहीत की बँकेचे देणेही फेडले नाही ! पण आपल्या कारकीर्दीत त्यांनी चित्रशाळेचे पुस्तकाचे दुकान बंद करून चित्रशाळा भवनातली दुकानाची जागा देवकुळे यांच्या पत्रावरून जनरल ट्रस्टकडून मिळविली. या जाधवांना चित्रशाळा ट्रस्ट बोर्डवर घेण्यात यावे, असा ठराव दोघा देवकुळे बंधूंनी केला होता, पण तिसरे ट्रस्टी दा. त्र्यं. जोशी यांनी विरोध केल्यामुळे तो अमलात आला नाही. मार्च १९७३ ते जून १९७३ या चार महिन्यांत या जाधवमहाशयांनी चित्रशाळेसाठी काय केले त्याचा तपशील उपलब्ध नाही. ता. १९–६–७३ रोजी वर्तमानपत्रांतून जेव्हा चित्रशाळा छापखान्यातील यंत्रसामुग्रीच्या लिलावाच्या जाहीराती येऊं लागल्या तेव्हा हे जाधव कोठे होते? हा लिलाव टाळण्यासाठी त्यांनी कोणते प्रयत्न केले ? चित्रशाळेच्या दोघा ट्रस्टींनी म्हणजे देवकुळे बंधूंनी त्यांच्याशी संबंध जोडून काय साधले ? हे प्रश्न त्या वेळी अनेकांच्या मनात आले असतील. देवकुळे यांनी लिलाव थांबविण्याच्या कामी मुंबई, पुणे, सांगली इत्यादी ठिकाणी प्रयत्न केले होते असे समजते.

चित्रशाळेचे जनता सहकारी बँकेचे देणे एक लाखाच्या वर गेले तेव्हा हे येणे वसूल करण्यासाठी चित्रशाळा प्रेसच्या माशिनरीचा जाहीर लिलाव पुकारला जाण्याची वेळ आली. वर्तमानपत्रांतून लिलावाच्या जाहीराती येऊ लागल्या व ६ जुलै १९७३ हा लिलावाचा दिवसही जाहीर झाला. तेव्हा मात्र सर्वत्र खळबळ उडाली. या ऐतिहासिक संस्थेच्या मालमत्तेचा जाहीर लिलाव होणे हे

कोणालाच प्रशस्त वाटत नव्हते. कोणत्याही उपायाने हा लिलाव टाळला पाहिजे, अशीच भावना सर्वत्र निर्माण झाली होती. पण कोणीही मार्ग काढू शकत नव्हते. चित्रशाळा प्रेसच्या कामगारांनी वर्तमानपत्रांतून जाहीर विनंती केली की, कुणी तरी धनिकाने पुढे येऊन ही प्रसिद्ध संस्था वाचवावी. चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या विश्वस्तांनी चित्रशाळा प्रेस जनरल ट्रस्टच्या विश्वस्तांकडे दिल्याशिवाय ते विश्वस्त कायदेशीर रीत्या काही करू शकत नव्हते. देवकुळे बंधूंनी ज्यांच्याशी नवीन संबंध जोडला होता ते ॲड्व्होकेट जाधवही हा लिलाव थांबविण्याच्या कामी देवकुळे यांना उपयोगी पडले नाहीत, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

अशा परिस्थितीत महाजन ॲंड असोसिएट्स् पुढे आले व त्यांनी प्रथम चित्रशाळा प्रेस ट्रस्ट व नंतर जनरल ट्रस्ट या दोघा ट्रस्टच्या विश्वस्तांबरोबर वाटाघाटी करून करार केला आणि यायोगे चित्रशाळेचा होणारा लिलाव टळला.

महाजन आणि मंडळीने चित्रशाळा प्रेस ट्रस्ट व व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट या दोन्ही ट्रस्टच्या ट्रस्टींबरोबर प्राथमिक स्वरूपाची बोलणी करून चित्र-शाळेचा आठ लाख रुपये कर्जाचा बोजा उचलला व त्याच्या मोबदल्यात चित्र-शाळेची सर्व मालमत्ता मालकी हक्काने व प्रेसची संपूर्ण जागा लीजने घेण्याचे ठरविले. दोन्ही ट्रस्टींबरोबर चोवीस तासात अनेक वाटाघाटी होऊन अखेरचा करार व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या विश्वस्तांबरोबर ता. ६-७-१९७३ रोजी करण्यात आला. कारण चित्रशाळेसंबंधी सर्व प्रकारची अंतिम सत्ता या ट्रस्टकडेच कायदेशीरपणे होती.

कराराची सविस्तर पार्श्वभूमी

मे. महाजन ॲंड असोसिएट्स् यांच्याशी विश्वस्तांनी का करार केला व त्यांच्याकडे चित्रशाळा का सुपूर्द करावी लागली त्याची पार्श्वभूमी लक्षात घेतली म्हणजे या हस्तांतराची कार्यकारणपरंपरा कळून येईल. चित्रशाळेच्या अखेरच्या पर्वात चित्रशाळेची सर्व अधिसत्ता व. ग. देवकुळे यांच्या हाती होती व त्यांनी आपल्या कारकीर्दीत काय केले व आपली कारकीर्द कशी गाजविली याची हकीगत मागील प्रकरणांत आलीच आहे. १९६२ पर्यंत चित्रशाळा प्रेस तोट्यात चालला नव्हता, पण पुढे अनेक कारणांमुळे चित्रशाळेची परिस्थिति बिघडत गेली. त्यांपैकी पुढील कारणे विशेष प्रतिकूल ठरली : (१) पानशेत

धरण फुटल्यामुळे आलेली आपत्ती व झालेले नुकसान, (२) सरकारी धोरणामुळे कामगारांच्या पगारात झालेली वाढ, (३) प्रॉव्हिडंट फंड, सक्तीचा बोनस वगैरेमुळे वाढलेला बोजा, (४) जुनी झालेली मशीनरी व धंद्यातील चढाओढ. (५) अंतर्गत कारभारात एकजुटीने कार्य करण्याचा अभाव, (६) विश्वस्त व. ग. देवकुळे यांच्या बंधूंनी प्रकाशन विभागाचे व्यवस्थापक दा. पां. रानडे यांच्याविरुद्ध पोलिसकडे केलेली तक्रार. या कारणांमुळे चित्रशाळेची आर्थिक परिस्थिति दिवसेंदिवस खालावत चालली. त्या वेळी एक विश्वस्त व. ग. देवकुळे हे चित्रशाळेचे व्यवस्थापक होते व ते चित्रशाळेची संपूर्ण व्यवस्था पहात होते.

म्हणून देवकुळे यांचा चित्रशाळेशी असलेला संबंध तोडला गेला तर चित्रशाळा सुधारेल असे काही विश्वस्तांना वाटले व त्यांनी देवकुळे यांच्यापुढे एक सूचना मांडली. १९५० सालचे देवकुळे यांचे ते सुप्रसिद्ध " प्रकरण " विश्वस्त विसरले नव्हते व त्या प्रकरणाचा पूर्वेतिहास व त्याची फलश्रुतीही त्यांच्या डोळ्यांपुढे होती. म्हणून विश्वस्तांनी देवकुळे यांना अशी सूचना केली की, देवकुळे यांनी चित्रशाळेचा संबंध सोडावा व त्याबद्दल विश्वस्तांनी त्यांना तहहयात निवृत्तिवेतन द्यावे. पण देवकुळे यांनी ही सूचना मान्य केली नाही व ते कोर्टात जाण्याची भाषा बोलू लागले. या कटकटींना कंटाळून व " चित्रमय जगत् "—सारखे राष्ट्रीय वृत्तीचे मासिक बंद करण्याचा प्रसंग आल्यामुळे देवगिरीकर यांनी राजीनामा देण्याचे ठरविले. त्याच सुमारास देवकुळे यांनी ट्रस्टींच्या सभेत अशी घोषणा केली की आपणांस ट्रस्टींनी सर्वाधिकार दिले तर आपण संस्थेला कर्जमुक्त करू व तिची भरभराट घडवून आणू. देवकुळे यांनी तसे लेखी निवेदनही दिले. देवकुळे जर स्वतःच्या पराक्रमाने चित्रशाळेचा कायापालट घडवून आणणार असतील तर त्यांना आपली अडचण होऊ नये म्हणून देवगिरीकर यांच्याबरोबर पटवर्धन यांनीही चित्रशाळा ट्रस्टचा राजीनामा दिला.

अशा प्रकारे हे दोघे विश्वस्त निवृत्त झाल्यावर व. ग. देवकुळे, दा. त्र्यं. जोशी व ज. ग. देवकुळे असे तिघे चित्रशाळा प्रेस ट्रस्टचे ट्रस्टी झाले. ज. ग. देवकुळे हे मुंबईला स्वतःचा छापखाना चालवीत होते. तेव्हा त्यांच्या मार्गदर्शनाचा फायदा मिळेल व अधिक काम मिळू शकेल असे जुन्या व नव्या ट्रस्टींना वाटत होते. पण प्रत्यक्ष अनुभव वेगळाच आला. फायदा राहिला बाजूलाच, उलट नव्या व्यवस्थेत अधिकच तोटा येऊ लागला. दरम्यान दा. त्र्यं.

जोशी यांना चित्रशाळा ट्रस्टच्या सेक्रेटरीपदावरून काढण्यात आले व त्यांच्या जागी व. ग. देवकुळे सेक्रेटरी झाले आणि ज. ग. देवकुळे यांची अध्यक्षस्थानी स्थापना करण्यात आली. अशा प्रकारे चित्रशाळा प्रेस ट्रस्टमध्ये देवकुळे बंधूंचे वर्चस्व स्थापन झाले व दा. त्र्यं. जोशी यांच्यावर एक अल्पसंख्य म्हणून राहण्याची पाळी आली.

देवगिरीकर यांनी पुढाकार घेऊन १९६३–६४ मध्ये लक्ष्मीरोडवर भानुविलासशेजारी असलेल्या बखळीवर ५ लक्ष रुपये खर्च करून एक तीन मजली इमारत उभी केली. ह्या इमारतीची मूळ जागा किंवा बखळ व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या मालकीची होती. ह्या इमारतीसाठी बाहेरून कर्ज न काढता बांधकामासाठी भाडेकऱ्यांकडून आगाऊ रकमा घेतल्या व त्या रकमांची परतफेड भाड्यातून करण्याचे लेखी करार केले. नव्या इमारतीचे उत्पन्न देवकुळे यांना दिसू लागले. तेव्हा ते म्हणू लागले की दोन्ही ट्रस्ट एकच आहेत, तेव्हा चित्रशाळेत होणारा तोटा या नव्या इमारतीच्या भाड्यातून भरून काढता येईल. शिवाय जनरल ट्रस्टने आपल्या नफ्यातून वेळोवेळी चित्रशाळा प्रेसला ३ लक्ष रुपये दिले होते. हे पैसे चित्रशाळेकडून परत करण्याचे कारण नाही, कारण दोन्ही ट्रस्ट एकच आहेत असा युक्तिवाद देवकुळे करू लागले. चित्रशाळा प्रेस ज्या इमारतीत होता ती इमारत जनरल ट्रस्टच्या मालकीची असल्यामुळे चित्रशाळेला या जागेसाठी दरमहा १२५ रु. जनरल ट्रस्टला भाडे द्यावे लागत होते. देवकुळे हेही भाडे देईनासे झाले. अशा परिस्थितीत हे दोन्ही ट्रस्ट एकच आहेत का निराळे आहेत याचा सोक्षमोक्ष करून घ्यावा म्हणून प्रथम ट्रस्ट ॲक्ट कलम ७२ प्रमाणे डिस्ट्रिक्ट कोर्टात अर्ज केला. पण या कोर्टाने हा अर्ज आमच्या कक्षेत येत नाही म्हणून निकाली काढला. तेव्हा पब्लिक ट्रस्ट ॲक्टान्वये तो चॅरिटी कमिशनर यांच्यापुढे उपस्थित करण्यात आला. असिस्टंट चॅरिटी कमिशनर, पुणे विभाग, यांनी दोन ट्रस्ट निराळे आहेत असा निकाल दिला.

त्याचप्रमाणे देवगिरीकर यांनी एका ट्रस्टचा राजीनामा दिला की दोन्ही ट्रस्टचा दिला, या मुद्द्यावर देवकुळे यांनी कोर्टकचेऱ्या केल्या, पण अखेर देवगिरीकर यांनी फक्त चित्रशाळा प्रेस ट्रस्टचाच राजीनामा दिला आहे, असा डिस्ट्रिक्ट कोर्टाने निःसंदिग्ध निर्णय दिला, ही हकीगत तिसऱ्या प्रकरणात सविस्तर

येऊन गेली आहे. त्याचप्रमाणे 'चित्रशाळा भवन' ही इमारत जनरल ट्रस्टच्याच मालकीची आहे, चित्रशाळा प्रेसचा तिच्याशी काही संबंध नाही, असा निर्णय झालेला आहे. या निर्णयावर अपील झालेले नाही.

व. ग. देवकुळे यांची ही कोर्टबाजी चालू असता चित्रशाळेची परिस्थिति खालावतच चालली होती. सरकारी देणी, व्यापारी देणी, खाजगी व्यक्तींची कर्जे व ठेवी, बँकेचे कर्ज, कामगारांचा पगार इत्यादिकांचा बोजा वाढत चाललेला होता. चित्रशाळा प्रकाशनाचे व्यवस्थापक दा. पां. रानडे, हे अ. ग. देवकुळे यांच्या कृतीमुळे चित्रशाळेतून निघून गेल्यामुळे त्यांनी चित्रशाळेसाठी मिळविलेली पाठ्यपुस्तके त्यांच्याबरोबरच बाहेर गेली.

चित्रशाळा प्रेसला जनता सहकारी बँकेचे सुमारे एक लक्ष रुपये कर्ज होते. शिवाय इतरही आणखी अनेक देणी होती. कामगारांचा प्रॉव्हिडंट फंड, विक्रीकर वगैरे सुमारे ५० हजार रुपयांचे सरकारी देणे थकले होते. कामगारांचे पगार, वेतनातील फरक, बोनस वगैरेंची रक्कम अंदाजे १ लक्ष ८७ हजार रुपये झाली होती. चवथे कलम ठेवीदारांचे होते. ठेवीदारांच्या रकमा सुमारे १ लक्ष ३० हजारांच्या होत्या. वरील कर्जदारांखेरीज चित्रशाळेला ज्यांनी कागद वगैरे मुद्रण-साहित्य पुरविले त्यांची बिले द्यावयाची होती. या रकमा बऱ्याच होत्या. आणि शेवटी व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टने चित्रशाळेला वेळोवेळी जे ३ लाख रुपये दिले होते त्यांची परतफेड करावयाची होती. अशा प्रकारे चित्रशाळा प्रेस ट्रस्टवर सुमारे आठ लक्षांचा बोजा होता. या देण्याबरोबर येणे असे फारसे नव्हते.

जनता सहकारी बँकेकडे व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टचे सुमारे १ लाख रुपये ठेवीच्या स्वरूपात होते. चित्रशाळा भवन इमारतीसाठी भाडेकऱ्यांकडून ज्या ठेवी घेण्यात आल्या होत्या त्या बँकेत जमा करण्यात आल्या होत्या. कंत्राटदारांचे पैसे देण्यासाठी रकमा हव्या होत्या, पण बँकेकडून पैसे मिळण्याच्या कामी देवकुळे यांनी अडथळे आणले. त्यांचे म्हणणे दोन्ही ट्रस्ट एकच असल्यामुळे जनता बँकेने व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टला पैसे देऊ नयेत. जनता सहकारी बँकेची मंडळी देवकुळे यांच्या बाबतीत पक्षपाती असल्यामुळे की काय, जनरल ट्रस्टचा आर्थिक व्यवहार बंद पडला व ट्रस्टचे १ लाख रुपये बँकेत अडकून पडले. कंत्राटदारांना देण्यासाठी जनरल ट्रस्टने सुमारे ४० हजार रुपये काढण्याचे ठरविले तेव्हा बँकेने नकार दिला. देवकुळे यांनी हायकोर्टाकडून स्टे ऑर्डर

मिळविली होती. ती जनरल ट्रस्टने लगेच रद्दही करवून घेतली होती. तथापि जनता सहकारी बँकेने अडवणुकीचे धोरण स्वीकारून जनरल ट्रस्टच्या ट्रस्टींकडून वैयक्तिक हमीपत्र (इंडेम्निटी बॉंड) मागितले. अर्थात् ट्रस्टींनी त्याला नकार दिला. पुढे कालांतराने हायकोर्टाचे न्यायनिवाडे पाहिल्यावर जनता बँकेने जनरल ट्रस्टची काही रक्कम दिली, ही गोष्ट वेगळी. पण जनता बँकेच्या या अडणुकी-मुळे जनरल ट्रस्टला व्याजापोटी १० हजार रुपये भुर्दंड पडला.

जनता सहकारी बँकेने डिस्ट्रिक्ट जजांचा निकाल पाहून व जनरल ट्रस्टचे ट्रस्टी हमीपत्र देत नाहीत हे लक्षात घेऊन चित्रशाळा प्रेसकडून येणे असलेले १ लक्ष रुपये फेडण्याचा तगादा चित्रशाळा प्रेस ट्रस्टींच्या मागे लावला. दरम्यानच्या काळात चित्रशाळा प्रेस आपण चालविण्यास द्यावा असा प्रयत्न जनता बँकेच्या संबंधितांनी चालविला होता, पण तो सफळ होऊ शकला नाही. तेव्हा बँकेने अधिकच उचल खाल्ली व जास्त जोराचा तगादा सुरू केला. चित्रशाळा प्रेस ट्रस्टी बँकेचे देणे देण्यास असमर्थ होते. तेव्हा बँकेने अखेरचा मार्ग म्हणून स्पेशल ऑफीसरकडून लवाद निवाडा करून घेतला व लिलावाची परवानगी मिळविली. त्यानंतरची हकीगत मागे आलेलीच आहे.

उपसंहार

महाजन मंडळीबरोबर केलेल्या करारान्वये चित्रशाळा प्रेसच नव्हे तर चित्र-शाळेची जागासुद्धा महाजन यांच्याकडे भाडेपट्टयाने गेली. राष्ट्रीय संस्था म्हणून चित्रशाळेचे अस्तित्व संपुष्टात आले, हे निर्विवादपणे कबूल केले पाहिजे. इ. स. १८७८ साली कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी स्थापन केलेली व कै. वासुकाका जोशी यांनी नावारूपास आणलेली चित्रशाळा ता. ३१ डिसेंबर १९७३ रोजी अंतर्धान पावली. केवळ छापखाना म्हणून चित्रशाळा काही काळ चालेल किंवा चालणारही नाही; पण जी चित्रशाळा संस्था एके काळी मान्यवर व ऐति-हासिक संस्था समजली जात होती त्या ध्येयनिष्ठ राष्ट्रीय संस्थेचे सहकारी गृहरचना संस्थेत रूपांतर व्हावे, हे चित्रशाळेच्या हजारो हितचिंतकांना रुचले नसेल व एका शतकाचे आयुष्य लाभलेल्या या मातबर संस्थेला आपले जीवित अशा प्रकारे संपवावे लागले याबद्दल त्यांना हळहळ वाटल्याशिवाय राहणार नाही. मात्र अखेर असेच म्हणावे लागते,

'तस्मादपरिहार्ये ऽ र्थे न त्वं शोचितुमर्हसि।'

देशाची व समाजाची स्थिति सतत बदलत असते. कालमानानुसार तिच्यात स्थित्यंतरे घडून येत असतात. आज स्वातंत्र्यानंतच्या काळात पूर्वीची स्वातंत्र्य-प्राप्तीची ध्येये राहिली नाहीत व समाजाचा दृष्टिकोणच बदलला. राष्ट्राचे, प्रांताचे, समाजाचे, त्याचप्रमाणे व्यक्तीचेही जीवनमान पालटले, समाजात क्रांती झाली. जनतेची अभिरुची बदलली व नव्या समस्या निर्माण झाल्या. अशा परिस्थितीत विश्वस्तांनी काळाची पावले ओळखून स्थित्यंतराला मान्यता दिली. त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट ही की, विश्वस्तांना चित्रशाळा चालविणे अशक्य झाल्यावर तिच्या जागेच्या मोबदल्यात त्यांनी फार मोठे उत्पन्नाचे साधन तयार करून ठेवले. विश्वस्तांनी धंदेवाईक दृष्टीने या प्रश्नाकडे पाहिले असे कोणी म्हणणार नाही. कारण त्यांची कधीच फायद्याची दृष्टी नव्हती. पण या व्यवहारामुळे व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टला दरसाल १ लक्ष रुपये धर्मादायासाठी उपलब्ध होऊ शकले, ही घटना महत्त्वाची आहे. महाराष्ट्रात जे अनेक विश्वस्तनिधि आहेत त्यांत व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट हा मोठ्यांपैकी एक विश्वस्तनिधि आहे. या निधीच्या द्वारे धर्मादायासाठी, शैक्षणिक कार्यासाठी व सार्वजनिक कामासाठी अविच्छिन्न १ लाख रुपयांचे उत्पन्न करून ठेवल्याबद्दल महाराष्ट्रीय जनतेने विश्वस्तांबद्दल कृतज्ञताबुद्धी व्यक्त करणे अत्यंत उचित होईल. चित्रशाळा छापखाना बंद झाल्यामुळे जे राष्ट्रीय कार्य खंडित झाले तेच कार्य व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट धर्मादाय निधीच्या द्वारे विश्वस्तांनी पुढे चालविल्यास या विश्वस्त–निधीचे खरे चीज होईल व तो निधी जनतेच्या गौरवास पात्र होईल, असे म्हणावयास हरकत नाही.

प्रकरण आठवे

अखेरचे पर्व

मे. महाजन अँड असोसिएट्स् यांच्याबरोबर व्ही. जी. जोशी जनरल स्ट्रटच्या विश्वस्तांनी ता. ६–७–७३ रोजी जो करार केला त्याला बाँबे पब्लिक ट्रस्ट ॲक्टाच्या ३६ व्या कलमाप्रमाणे चॅरिटी कमिशनरची मान्यता लागते. त्या शिवाय तो कायदेशीर ठरत नाही. म्हणून जनरल ट्रस्टच्या विश्वस्तांनी ही मान्यता मिळविण्यासाठी चॅरिटी कमिशनरकडे ता. १६–८–१९७३ रोजी जो अर्ज केला तो महत्त्वाचा असल्यामुळे त्यातील मुख्य भाग पुढे दिला आहे :

जनरल ट्रस्टने केलेला अर्ज

'कै. वासुकाका जोशी यांनी १९४३ साली आपले मृत्युपत्र केले व ते अंमलात आणण्यासाठी विश्वस्तांची नेमणूक केली. या विश्वस्तांनी १९४९ मध्ये दोन स्वतंत्र ट्रस्ट निर्माण करून ते रजिस्टर केले. पहिला ट्रस्ट नं. इ ६ व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट या नावाचा असून दुसरा ट्रस्ट नं. इ ७ चित्रशाळा प्रेस ट्रस्ट हा आहे. ट्रस्ट डीडमधील पहिली २५ कलमे चित्रशाळा प्रेस ट्रस्टसंबंधीची असून २६ वे व त्याच्यापुढील कलमे व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टला अनुलक्षून आहेत. २४ व्या कलमात असे म्हटले आहे की, चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या ट्रस्टींना चित्रशाळा प्रेस चालविणे अशक्य झाले तर त्यांनी चित्रशाळा प्रेसची जागा इमारतीसह जनरल ट्रस्टच्या स्वाधीन करावी. २५ व्या कलमात चित्रशाळा प्रेसच्या जंगम मालमत्तेचा उल्लेख असून तिचा विनियोग कसा करावा याबद्दल तशीच सूचना दिली आहे.

ट्रस्ट डीडच्या २४ व्या कलमानुसार चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या ट्रस्टींची बैठक ता. ६–७–७३ रोजी होऊन त्यांनी पुढीलप्रमाणे ठराव केला :

"प्रेस ट्रस्टच्या ट्रस्टींना चित्रशाळा प्रेस चालविणे व प्रकाशनाचा धंदा करणे अशक्य झाल्यामुळे आम्ही चित्रशाळा प्रेस, चित्रशाळा प्रेसची

जागा व चित्रशाळेची सर्व जंगम मालमत्ता व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्ट यांच्या स्वाधीन करीत आहोत."

चित्रशाळा प्रेस ट्रस्टची सर्व मशिनरी जनता सहकारी बँकेकडे गहाण असल्यामुळे बँकेने आपले येणे वसूल करण्यासाठी प्रेसचा लिलाव जाहीर केला होता. बँकेचे देणे सुमारे सव्वा लक्ष रुपये होते व लिलावाची तारीख ६-७-७३ ही जाहीर झाली होती. जनता सहकारी बँकेशिवाय चित्रशाळा प्रेस ट्रस्टला आणखी अनेक देणी होती. कामगारांचा प्रॉव्हिडंट फंड, विक्रीकर वगैरे सुमारे ५० हजार रुपयांचे सरकारचे देणे थकले होते. कामगारांचे पगार, बोनस वगैरेंची रक्कम सुमारे १ लक्ष ८७ हजार रुपये झाली होती. चवथे कलम ठेवीदारांचे होते. ठेवीदारांच्या रकमा सुमारे १ लक्ष ३० हजार होत्या. वरील कर्जदारांखेरीज चित्रशाळेला ज्यांनी माल पुरविला त्यांची बिले द्यावयाची होती. आणि शेवटी व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टने चित्रशाळेच्या साहाय्यासाठी जे वेळोवेळी ३ लक्ष रुपये दिले होते त्यांची परतफेड करावयाची होती. अशा प्रकारे चित्रशाळा प्रेस ट्रस्टवर सुमारे आठ लक्ष कर्जाचा बोजा होता. या देण्यांबरोबर येणे असे फारसे नव्हते.

अशा परिस्थितीत चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या ट्रस्टींनी चित्रशाळा छापखाना व प्रकाशन बंद करण्याचे ठरविले व प्रेसची सर्व मालमत्ता मे. महाजन अँड असोसिएट्स्‌ना देण्याचे ठरविले. या महाजन मंडळीने त्याच्या बदली चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या सुमारे ५ लक्ष रुपयांच्या कर्जाची जबाबदारी घेतली आणि प्रेस ट्रस्ट व महाजन मंडळी या उभयतांत तसा करारही झाला. पण ट्रस्ट डीडच्या २५ व्या कलमानुसार चित्रशाळा प्रेस बंद झाल्यास प्रेसची सर्व मालमत्ता व्ही. जी. जोशी ट्रस्टकडे सुपूर्द करण्यात आली पाहिजे. प्रस्तुत प्रकरणात चित्रशाळा प्रेसची मालमत्ता व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या ताब्यात आली असे गृहीत धरून (Notional transfer) तिच्या देण्याघेण्यासंबंधीचा चित्रशाळा प्रेस ट्रस्टशी झालेला करार व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टशीच कायदेशीर रीत्या व्हावयास पाहिजे होता. मालमत्तेचे प्रत्यक्ष हस्तांतरच केले पाहिजे असे नाही. कारण चित्रशाळा प्रेस ट्रस्टने या व्यवहारासंबंधी हस्तांतराचा निःसंदिग्ध ठराव केला होता. या ठरावान्वये व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या ८ लक्ष रुपये कर्जाचा बोजा घेण्यास महाजन मंडळींनी संमति दिली.

महाजन मंडळींनी प्रथम चित्रशाळा प्रेस ट्रस्टीबरोबर वरील करार केल्या-नंतर व चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या सर्व ट्रस्टींनी तसा रीतसर ठराव केल्यानंतर मे. महाजन ॲन्ड असोसिएट्स् व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या ट्रस्टींकडे गेले व त्यांनी प्रेसची जागा, मालमत्ता वगैरेसंबंधी बोलणी केली व त्यांच्याबरोबर रीतसर कायदेशीर करार केला.

बॉंबे पब्लिक ट्रस्ट ॲक्टाच्या ३६ व्या कलमाप्रमाणे ह्या व्यवहाराला आपली मान्यता लागते; म्हणून आपण या कराराला पुढील कारणास्तव मान्यता द्यावी अशी आम्ही या अर्जाच्या द्वारे आपणास विनंती करीत आहो.

१. चित्रशाळा प्रेस ट्रस्ट जनरल ट्रस्टला दरमहा रु. १२५–०० किंवा वर्षाला रु. १,५००–०० भाडे देत असे. मे. महाजन यांनी, त्यांच्याशी केलेल्या ह्या करारान्वये वर्षाला रु. ४२,०००–०० मुदे-भाडे देण्याचे कबूल केले आहे. हे भाडे चित्रशाळेच्या जागेच्या अनु-रोधाने ठरविण्यात आले आहे. चित्रशाळा प्रेसची एकूण जागा अंदाजे १५,००० चौरस फूट आहे व सध्या या जागेची किंमत दर चौरस फूटाला रु. ४०–०० धरली आहे. म्हणजे या जागेची एकूण किंमत ६ लक्ष रुपये होते. या रकमेवर शेकडा ७ टक्के व्याज सालीना आकार-ल्यास रु. ४२,०००–०० होतात.

२. मे. महाजन यांनी वासुकाका जोशी यांच्या स्मरणार्थ सुमारे ४०० चौरस फूट क्षेत्रफळाचे सभागृह व २०० चौरस फूटांचे एक दुकान जनरल ट्रस्टला वार्षिक रु. १–०० नाममात्र भाड्याने देण्यास संमत्ति दिली आहे.

३. चित्रशाळा प्रेसची आर्थिक दैन्यावस्था व शोचनीय परिस्थिती लक्षात घेऊन आम्ही मे. महाजन यांच्याबरोबर करार केला व त्यांना सुमारे १५००० चौरस फूट जागा सध्याच्या इमारतीसह भाडेपट्ट्याने द्यावी असा ठराव केला. या गोष्टीचा आम्ही व्यावहारिक दृष्ट्या जसा विचार केला, त्याप्रमाणे भावनात्मक दृष्ट्याही केला. कदाचित् दुसऱ्या एखाद्या मंडळीकडून जास्त भाडेही मिळाले असते; पण त्यांनी प्रेसच्या कर्जाची जबाबदारी उचलली नसती. महाजन मंडळी वासुकाका जोशी यांच्या स्मारकाचे तत्त्व मानण्यास तयार आहेत व त्याप्रमाणे त्यांच्या

संमतीनेच करारात एक कलम घातले आहे. या व्यवहाराला संमति देताना आणखी एक मुद्दा आमच्यापुढे होता. चित्रशाळा प्रेस ट्रस्ट जनरल ट्रस्टचे सुमारे ३ लक्ष रु. देणे लागत होता. ही रक्कम पुस्तकांच्या विक्रीतून फेडली जावी अशी तरतूद करारात करण्यात आली आहे. चित्रशाळा प्रेस ट्रस्टकडून येणे असलेल्या रकमेबद्दल चित्रशाळा प्रकाशनाच्या सर्व प्रती महाजन मंडळीने जनरल ट्रस्टला देण्याचे मान्य केले आहे व त्याप्रमाणे करारात तसा निर्देशही केला आहे. चित्रशाळा प्रेस ट्रस्टला जनरल ट्रस्टचे देणे फेडता आले नसते तर जनरल ट्रस्टचे जे नुकसान झाले असते त्यापासून आम्ही जनरल ट्रस्टला वाचविले आहे.

आम्ही जी चौकशी केली त्यावरूनच मे. महाजन अँड असोसिएटस् ही कंपनी पूर्ण विश्वासार्ह व शहाजोग कंपनी आहे असे आम्हांला समजले आहे. तेव्हा या करारात धोका नाही अशी आम्ही पूर्ण खात्री करून घेतली आहे. शिवाय या करारात आम्ही एक दंडाचे कलम घातले आहे. महाजन मंडळींनी सहा महिने भाडे दिले नाही तर त्यांना दिलेली जागा सोडून द्यावी लागेल. ते दंडार्ह ठरतील. महाजन मंडळींना जागा देण्याच्या बाबतीत चौघा ट्रस्टींनी एकमताने निर्णय घेतला आहे. आम्ही आमच्या परीने ट्रस्टची कामगिरी अत्यंत प्रामाणिकपणे बजावली आहे.

तेव्हा आपण आमच्या या कराराला शक्यतो लवकर मान्यता द्यावी अशी विनंती आहे. कळावे, ता. १६–८–१९७३."

या अर्जानंतर चॅरिटी कमिशनर यांनी सरकारी मोजणीदार नेमून त्याच्याकडून चित्रशाळेच्या क्षेत्रफळाची मोजणी करवून घेतली. प्रारंभी व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टने स्वतःच्या हिशेबानुसार चित्रशाळेच्या जागेचे भुईभाडे वर्षाला रु. ४२,०००–०० ठरविले होते;पण किंमत ठरविणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याने ते रु. ६०,०००-०० केले. मे. महाजन अँड असोशिएटस् यांच्याबरोबर ९९ वर्षांचे लीजडीड करून ते मान्यतेसाठी मा. चॅरिटी कमिशनर, मुंबई, यांच्याकडे पाठविण्यात आले.

महाजन मंडळीबरोबर केलेल्या ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्याला मे. चॅरिटी कमिशनर, मुंबई यांनी २०–१२–१९७३ रोजी मान्यता देऊन त्यावर शिक्का-

मोर्तब केले. (ऑफिस ऑर्डर नं. जे ४।१९२–७३।३५५१७ ता २०–१२–१९७३.

महाजन आणि मंडळी यांच्याशी केलेला करार

हे लीजडीड व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टचे ट्रस्टी (१) त्र्यं. र. देवगिरीकर, (२) वि. अ. पटवर्धन, (३) व. ग. देवकुळे व (४) दा. त्र्यं. जोशी यांना महाजन अँड असोसिएटस् या संस्थेचे प्रमोटर– डायरेक्टर्स (१) डॉ. वि. प. महाजन, धंदा बिझिनेस, (२) प्र. पु. जोशी, धंदा-बिझिनेस, (३) सु. दि. वैद्य, आर्किटेक्ट व (४) बी. वाय्. पवार, आर्किटेक्ट यांनी रु. १६,००६–०० च्या स्टँपावर करून दिले व ते मा. सब्रजिस्ट्रारसाहेब, तालुका हवेली नं. १ येथे ३१–१२–१९७३ रोजी नोंदविण्यात आले. (नोंदणी क्रमांक ३१८१).

या लीजडीडमधील प्रमुख शर्ती पुढे दिल्या आहेत. तत्पूर्वी त्यात प्रास्ताविक भाग म्हणून कराराची जी पार्श्वभूमी दिली आहे, ती थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे :

चित्रशाळा प्रेसला अपरिहार्य परिस्थितीमुळे प्रेस व प्रकाशन या धंद्यात प्रचंड नुकसान आले आणि ८ लाख रुपयांपर्यंत त्यांच्या कर्जाची मर्यादा गेली. त्यांच्या सावकारांपैकी जनता सहकारी बँकेने चित्रशाळा प्रेसच्या मशिनरीचा जाहीर लिलाव ता. ६–७–१९७३ रोजी करण्याची योजना ठरविली. आणि चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या ट्रस्टींना हा लिलाव थांबविणे जेव्हा अशक्य झाले तेव्हा ते महाजन मंडळीकडे गेले व त्यांच्याशी वाटाघाटी करून त्यांनी चित्रशाळा प्रेस ट्रस्टचे सर्व देणे (सुमारे ८ लक्ष रुपये) स्वतःकडे घेतले व त्याच्या बदली चित्रशाळा प्रेस ट्रस्टींनी त्यांना चित्रशाळा प्रेसची सर्व मशिनरी, सर्व जंगम मालमत्ता, पुस्तके, फर्निचर व प्रेसची जागा द्यावयाचे ठरविले व त्यांच्या ताब्यात देण्यास संमति दिली.

पण चित्रशाळा प्रेसची जागा व इमारत (५६२ सदाशिव पेठ, पुणे ३०) व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या मालकीची आहे. ता. ६–६–१९४९ रोजी केलेल्या ट्रस्टडीडमध्ये असे एक कलम आहे की, चित्रशाळा प्रेस ट्रस्टला चित्रशाळा प्रेस चालविणे अशक्य झाले तर प्रेस ट्रस्टने ती जागा इमारतीसह जनरल ट्रस्टच्या स्वाधीन करावी. म्हणजे ती जागा, जागेतील धंद्यासुद्धा जनरल ट्रस्टच्या

मालकीची होईल. म्हणून ट्रस्ट–डीडच्या या कलमाप्रमाणे चित्रशाळा प्रेस ट्रस्टने ६–७–१९७३ रोजी भरलेल्या बैठकीत ठराव करून ती जागा इमारतींसुद्धा व तिच्यातील सर्व मालमत्तेसह जनरल ट्रस्टच्या ताब्यात दिली व त्यांना अशी शिफारस केली की, ५६२ सदाशिव ही जागा वर दिलेल्या शर्तींनुसार महाजन मंडळींना देण्यात यावी व त्याप्रमाणे जनरल ट्रस्ट व महाजन मंडळी यांच्यामध्ये परस्पर संमत करार करण्यात यावा.

चित्रशाळा प्रेस ट्रस्टच्या या शिफारसीनुसार जनरल ट्रस्टच्या ट्रस्टींनी महाजन मंडळीशी करार केला. त्या करारातील प्रमुख शर्ती पुढीलप्रमाणे आहेत :—

१. ५६२ सदाशिव या मिळकतीतील तीन दुकाने वगळून म्हणजे लक्ष्मीरोडला लागून असलेल्या बाजूकडून ३२″×८७″ एवढी जागा सोडून उरलेली प्रेसची सर्व जागा पूर्वपश्चिम ८७′ व दक्षिणोत्तर १८४′ म्हणजे सुमारे १६००० चौरस फूट महाजन मंडळींना ९९ वर्षांच्या कराराने दरमहा रु. ५,०००–०० भाड्याने दिली आहे.

२. या जागेसह चित्रशाळा प्रेसची सर्व मशिनरी, फर्निचर व तदंगभूत सर्व मालमत्ता महाजन मंडळींना मिळावयाची असून त्याच्या मोबदल्यात महाजन मंडळींनी चित्रशाळा प्रेसची आठ लाखांची देणी देण्याचे मान्य केले आहे. त्याचप्रमाणे दा. त्र्यं. जोशी यांच्या बाबतीतील सिव्हिल कोर्टाच्या हुकूमनाम्याची भरपाई करण्यास संमति दिली आहे. त्याशिवाय जनरल ट्रस्टचे ३ लाख रुपयांचे देणे पुस्तकांच्या स्टॉकच्या मोबदल्यांत महाजन मंडळींनी देण्याचे कबूल केले आहे.

३. महाजन मंडळींनी ९९ वर्षांच्या लीजने घेतलेल्या या जागेतील अस्तित्वात असलेल्या इमारती पाडणे व त्या ठिकाणी त्यांना हव्या असतील तशा एक किंवा अनेक इमारती बांधून त्यांतील दुकाने-फ्लॅटस्-ऑफिसच्या जागा मालकी हक्काने विकण्याचा, तसेच ही जागा दुसऱ्या कोणासही पोटभाड्याने देण्याचा महाजन मंडळींना अधिकार आहे.

४. महाजन मंडळींना या इमारतीतील जागा कोणालाही भाड्याने देण्याचा

हक्क आहे. मात्र या इमारतीत दारू, अंमली द्रव्ये, मटन व स्फोटक पदार्थ या गोष्टी विकता येणार नाहीत.

५. ९९ वर्षांची लीजची मुदत संपल्यानंतर पुढच्या ९९ वर्षांसाठी चालू शर्तीवरच करार केला जाईल. मात्र त्या वेळी चालू भाड्यात १० टक्के वाढ दिली जाईल.

६. कै. वासुकाका जोशी यांच्या स्मरणार्थ ६०० चौरस फूट जागा महाजन मंडळींनी व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टला द्यावयाची आहे. त्यापैकी २०० चौरस फूट तळमजल्यात दुकानासाठी व ४०० चौरस फूट वरच्या मजल्यावर 'वासुकाका जोशी स्मारक सभागृहा'साठी देण्यात येणार आहे. या दोन्हींचे नाममात्र भाडे दरसाल रु. १–०० ठरले आहे.

७. मालमत्तेसंबंधीचे सर्व म्युनिसिपल व सरकारी कर महाजन मंडळींनी द्यावयाचे आहेत. सध्या म्युनिसिपल कर वार्षिक रु. १,२३०–०० आहे.

८. चालू इमारती पाडल्यावर त्याचा सर्व मालमसाला जनरल ट्रस्टला द्यावयाचा आहे.

९. महाजन मंडळींनी ६ जुलै १९७३ पासून ९९ वर्षांच्या कराराने ही जागा घेतली आहे व त्यासाठी वार्षिक ६० हजार रुपये देण्याचे मान्य केले आहे. ही रक्कम दर तीन महिन्यांनी रु. १५,०००–०० या हप्त्याने चार हप्त्यांत आगाऊ द्यावयाची आहे.

१०. महाजन मंडळींना दिलेली ही सर्व मालमत्ता पूर्ण निर्वेध आहे; या जागेवर इतर कोणाचाही कायदेशीर हक्क अगर हितसंबंध नाही, ही जमीन फ्रीहोल्ड मिळकत असून ती नॉन–ॲग्रिकल्चरल आहे, अशी व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टने खात्री दिली आहे.

११. महाजन मंडळींना हा भाडेपट्टा मे. महाजन ॲंड असोसिएट्सचे प्रमोटर-डायरेक्टर्स म्हणून देण्यात आला आहे. ही कंपनी प्रायव्हेट लिमिटेड आहे व ती रीतसर रजिस्टर करण्यात येणार आहे.

चौघांची भूमिका*

अशा प्रकारे महाजन मंडळींबरोबर जो करार करण्यात आला, त्याला चित्रशाळेची तत्कालीन परिस्थितीच कारणीभूत झाली होती हे निर्विवाद सत्य आहे. त्या परिस्थितीत चित्रशाळा प्रेस ट्रस्ट व जनरल ट्रस्ट यांना दुसरा पर्यायच उरला नव्हता. त्यांनी अपरिहार्य म्हणून महाजन मंडळींबरोबर करार केला. या कराराला चित्रशाळा प्रेस ट्रस्ट, जनरल ट्रस्ट, चॅरिटी कमिशनर व चित्रशाळेचे व्यवस्थापक व. ग. देवकुळे या चौघांनी आपली मान्यता का दिली, त्यासंबंधी त्यांची भूमिका काय होती याचाही विचार केला पाहिजे. महाजन मंडळींनी केवळ धंदा म्हणून हा व्यवहार केला असेल हे स्वाभाविक आहे. मध्यवर्ती वस्तीतली ही जागा मिळविण्यासाठी त्यांनी जरूर ते प्रयत्न केले नसतील असे कोणी म्हणणार नाही. त्यात त्यांची चित्रशाळा ही संस्था वाचविण्याची दृष्टी असेल असे म्हणता येणार नाही. पण चित्रशाळेला या वेळी सहाय्य करावे अशी त्यांची भावना असू शकेल. महाजन अँड असोसिएटस्‌मध्ये डॉ. महाजन वगळता बाकीची जी मंडळी आहेत ती कॉंट्रॅक्टर, आर्किटेक्ट अशी व्यावसायिक मंडळी आहेत. म्हणून महाजन मंडळी धंद्याच्या दृष्टीनेच ही जागा घेण्यास प्रवृत्त झाली असावी हे उघड आहे. व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टने मात्र चित्रशाळा वाचविण्याचा निकराचा प्रयत्न केला; पण ती वाचत नाही असे दिसून आल्यावर वासुकाकांच्या मृत्युपत्रातील धर्मादायाची दृष्टी पुढे ठेवून विश्वस्तांनी महाजन मंडळींबरोबर ९९ वर्षांचा करार केला. महाजन कराराशी संबंधित असलेल्या चार पक्षांची भूमिका काय होती व काय असू शकेल याचा निःपक्षपाती दृष्टीने विचार केला तर ती पुढीलप्रमाणे होती असे म्हणता येईल :—

(१) जनरल ट्रस्टची भूमिका

या करारान्वये जनरल ट्रस्टला पुढील आठ गोष्टी साधता आल्या. करार केल्यामुळे—(१) प्रेसचा लिलाव टळत होता, (२) सर्वांची कर्जे फिटणार

---

* व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टचे विश्वस्त यांच्याकडून मिळालेल्या अधिकृत माहितीच्या आधारे ही भूमिका मांडली आहे.— लेखक.

होती, (३) व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टला आपले बुडणारे ३ लक्ष रुपये वसूल करता येत होते, (४) वासुकाकांच्या इच्छापत्राप्रमाणे धर्मादायासाठी सुमारे ५० हजार रुपये उपलब्ध होणार होते, (५) दोन ट्रस्ट नसून एक ट्रस्ट आहे, हे देवकुळे यांचे जे म्हणणे होते, ते चित्रशाळा ट्रस्टने दुसरा ट्रस्ट मान्य केल्यामुळे निकालात निघणार होते. (६) देवकुळे यांनी चित्रशाळा भवनाच्या भाडेकरूंना ज्या नोटीसा दिल्या होत्या त्या निकालात निघणार होत्या. (७) नवीन होणाऱ्या इमारतीत वासुकाका स्मारक सभागृहासाठी व दुकानासाठी ६०० चौरस फूट जागा नाममात्र भाड्याने मिळणार होती. (८) जर चित्रशाळेला आपले कर्ज फेडण्याची व्यवस्था करता आली नसती तर अशी शक्यता होती की ते कर्ज जनरल ट्रस्टला देण्यास भाग पडले असते; आणि त्या कर्जापायी 'चित्रशाळा भवन' विकण्याची पाळी आली असती आणि जनरल ट्रस्ट संपुष्टात आला असता.

(२) चित्रशाळा प्रेस ट्रस्टची भूमिका

चित्रशाळा प्रेस ट्रस्टचे ट्रस्टी महाजन मंडळींना छापखाना देण्यास का तयार झाले याची कारणे पुढीलप्रमाणे असावीत :—(१) महाजन मंडळींनी चित्रशाळेचा ८ लाख रुपये कर्जाचा बोजा उचलला, (२) चित्रशाळा छापखाना चालविणे अगर न चालविणे हे महाजन मंडळीवर सोपविल्यामुळे पुढे होणाऱ्या कर्जाची शक्यता टळली, (३) चित्रशाळा प्रेस ट्रस्ट अतित्वात राहिला, (४) चित्रशाळेवर चंदेल प्रकाशन, दा. त्र्यं. जोशी, भा. अ. फडके, मुद्रण साहित्य भांडार, प्रॉव्हिडंट फंड व सेल्स-टॅक्स, सौ. सरलाबाई पिसोळकर व इतर किरकोळ व्यापारी यांच्या हुकूमनाम्याचे जे तगादे होते ते संपुष्टात आले. कारण महाजन मंडळींनी या हुकूमनाम्यांची भरपाई करण्याची जबाबदारी आपल्यावर घेतली.

(३) चित्रशाळेच्या व्यवस्थापकांची भूमिका

चित्रशाळेचे व्यवस्थापक व. ग. देवकुळे या व्यवहाराला का कबूल झाले असावे ? त्याची दोन कारणे सांगता येतील : (१) चित्रशाळेच्या कारभाराचे घोंगडे महाजन मंडळींच्या गळ्यात अडकवून त्यांना मुक्त होता येत होते, व (२) मागील कर्जाबद्दलची छाननी होण्याचे टळत होते.

(४) चॅरिटी कमिशनर यांची भूमिका

महाजन मंडळींबरोबर केलेल्या या व्यवहाराला चॅरिटी कमिशनर यांनी मंजुरी का दिली ? कारण चित्रशाळेसारख्या राष्ट्रीय कार्य करणाऱ्या संस्थेच्या छापखान्याचा लिलाव होणे त्यांना योग्य वाटले नसावे. ॲ. अमरसिंग जाधव यांचे असे म्हणणे होते की, ही जागा भाडेपट्ट्याने देण्यापूर्वी टेंडर्स मागविण्याची जाहिरात द्यावयास हवी होती, आणि त्यासाठी ते कोर्टात गेले आहेत. अशा प्रकारची जाहिरात देण्याची तरतूद ट्रस्ट ॲक्टमध्ये आहे की नाही याची कल्पना नाही, पण लिलाव तास दोन तासावर आलेला होता हे विचारात घेऊन ही अट बाजूला सारली असावी.

चित्रशाळा ट्रस्टने चित्रशाळा प्रेसची जागा जोपर्यंत जनरल ट्रस्टच्या स्वाधीन केली नव्हती, तोपर्यंत जाहिरात देणे शक्य नव्हते. या हस्तांतराच्या व्यवहाराला उणेपुरे चोवीस तासही लागले नाहीत. अशा परिस्थितीत चॅरिटी कमिशनर यांनी करार झाल्यानंतर कायद्याच्या दृष्टीने त्याचा विचार करून सरकारमान्य अधिकारी नेमला व त्याच्याकडून सरकारी किंमत ठरवून घेतली. मूळ करारात वार्षिक भाडे रु. ४२,०००–०० होते ते रु. ६०,०००–०० केले, व म्युनिसिपल व सरकारी कर भरण्याची जबाबदारी महाजन मंडळींवर टाकली.

अशा प्रकारे जनरल ट्रस्ट, चित्रशाळा प्रेस ट्रस्ट, महाजन अँड असोसिएट्स् व चॅरिटी कमिशनर यांपैकी कोणाच्याही दृष्टीने हा व्यवहार करण्यात चूक झालेली नाही. याच्या भावी परिणामांबद्दल आत्तांच बोलणे धार्ष्ट्याचे होईल. पण कै. वासुकाकांच्या अंतिम इच्छेप्रमाणे या ट्रस्टमधून धर्मादाय करता येईल. जनरल ट्रस्टकडे ही धर्मादायाची जी रक्कम येत जाईल, तिचा विनियोग वासुकाकांच्या इच्छापत्रानुसार करण्यात येईल. ही रक्कम सुमारे लाख रुपयांपर्यंत जाईल. या रक्कमेतून जनरल स्ट्रटला अनेक गोष्टी करता येतील. शेतकी संशोधनासाठी शिष्यवृत्त्या, चित्रकला शिक्षणाला मदत, राष्ट्रीय वाङ्मयाचे प्रकाशन, गरजूंना साहाय्य वगैरे अनेक गोष्टी करता येतील. व वासुकाकांचे स्मारक उभारता येईल. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर व कै. वासुकाका जोशी यांची राष्ट्रकार्याची व राष्ट्रजागृतीची परंपरा जनरल ट्रस्टचे विश्वस्त निष्ठापूर्वक चालू ठेवतील अशी आशा आहे.

परिशिष्ट : १

असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांच्याकडून खुलाशाची मागणी

पुणे विभागाचे असिस्टंट चॅरिटी कमिशनर (व्ही. बी. बुचके) यांनी " व्ही. जी. जोशी चित्रशाळा प्रेस ट्रस्ट नं. ई–७ " या ट्रस्टचे एक विश्वस्त डी. टी. जोशी यांच्याकडे १९७३ च्या सप्टेंबरमध्ये ता. ३१–१२–१९६० ते ता. ३१–१२–१९७१ या मुदतीतील ऑडिट केलेले हिशेबाचे तक्ते मागितले होते. ते पाहून असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांनी पब्लिक ट्रस्ट ॲक्टाच्या ३८ व्या कलमानुसार तां. २७–९–१९७३ रोजी खुलासा करण्यासंबंधी पुढील नोटीस पाठविली.

श्री. डी. टी. जोशी,
८७४, सदाशिव, पुणें
विषय:– व्ही. जी. जोशी चित्रशाळा प्रेस ट्रस्ट
या ट्रस्टच्या कारभाराबाबत.

ता. ३१–१२–१९६० ते ता. ३१–१२–१९७१ या काळांतील ऑडिट केलेले हिशेबाचे तक्ते जे तुम्ही पाठविले त्यावरून असे दिसून येते की, १९६० व १९६२ ही दोन वर्षे वगळल्यास हा ट्रस्ट नुकसानीतच चालत आहे आणि या मुदतीच्या अखेरीस एकूण नुकसानीची रक्कम रु. ५,१८,३१४–६९ होत आहे. ही रक्कम म्हणजे ट्रस्टींच्या बेपर्वा हलगर्जीपणामुळे प्रेसला झालेले अतिरिक्त नुकसानच म्हटले पाहिजे.

म्हणून तुम्हांला या पत्रद्वारे असे सुनावण्यात येत आहे की, तुम्ही पुढील गोष्टींचा ताबडतोब खुलासा करावा. ही रक्कम म्हणजे झालेले नुकसान नव्हे काय व हे नुकसान तुमच्याकडून भरून का घेऊ नये याचे स्पष्टीकरण करावे.

आठ दिवसांच्या आत जर तुमचा सविस्तर खुलासा आला नाही तर तुम्हांला स्वत:ची अशी काही बाजू नाही व तुमच्याजवळ सांगण्याजोगे काही नाही असे समजण्यांत येईल व त्याप्रमाणे पुढील हुकूम काढला जाईल.

व्ही. बी. बुचके,
असिस्टंट चॅरिटी कमिशनर,
पूना रीजन, पुणें.

ता. २७–९–१९७३

माजी सेक्रेटरी, चित्रशाळा प्रेस ट्रस्ट (डी. टी. जोशी) यांचा खुलासा

असिस्टंट चॅरिटी कमिशनर यांच्याकडून आलेल्या ता. २७-९-१९७३ च्या पत्राला डी. टी. जोशी, ८७४ सदाशिव, पुणे ३० यांनी ता. ८–१०–१९७३ रोजी पुढील खुलासा पाठविला :

विषय:– **चित्रशाळा प्रेस ट्रस्ट (नं. ई ७) बाबत चौकशी.**

आपल्या पत्रावरून पुढीलप्रमाणे खुलासा करीत आहो :–

१. चित्रशाळा प्रेस ट्रस्ट बोर्ड १९४४ मध्ये अस्तित्वात येऊन प्रेस– प्रकाशन– मासिके हे तिन्ही चालविण्याची जबाबदारी चित्रशाळा प्रेस ट्रस्टने घेतली. १९४४ पासून १९४८ पर्यंत एक्झिक्यूटर्स या नात्याने प्रेस ट्रस्टचा कारभार सुरू होता. सन १९४९ मध्ये ट्रस्ट डीड रजिस्टर झाले व चित्रशाळा ट्रस्टचे काम व्यवस्थेशीर सुरू झाले.

२. चित्रशाळा प्रेस ट्रस्टचे चित्रशाळा प्रेस व चित्रशाळा प्रकाशन हे दोन्ही विभाग १९४९ ते १९६० या सालापर्यंत कधीच तोट्यात नव्हते. (१९५३ साली प्रेस विभागाला एकदाच तोटा सोसावा लागला.)

३. १९६१ सालामध्ये पानशेत धरण फुटल्याने चित्रशाळेवर दैवी आपत्ती आली. ह्या आपत्तीमुळे चित्रशाळा प्रेसचे सुमारे ४० ते ५० हजार रुपयांपर्यंत नुकसान झाले. पुरामुळे जे नुकसान झाले व जो तोटा आला ते नुकसान व तो तोटा कधीच भरून काढता आला नाही. हे नुकसान पुढील प्रकारे झाले :

(अ) पुराचे पाणी प्रेसमध्ये शिरून कागद भिजला. टाईप वाहून गेला. इलेक्ट्रिक मोटारी निकामी झाल्या.

(आ) मशीन खात्यात पुराचे पाणी शिरून सर्व प्रिंटिंग मशीन्स नादुरुस्त झाली. ती सर्व दुरुस्त होण्यास सुमारे २ ते २॥ महिने लागले. यामुळे कामगाराचे दोन महिन्यांचे पगार कामा-शिवायच त्यांना द्यावे लागले. मशीन्स नादुरुस्त झाल्यामुळे प्रिंटिंगच्या ऑर्डर्स घेता आल्या नाहीत व दरमहा सुमारे १५ ते २० हजार रुपयांचे काम बुडाले.

४. इंडस्ट्रियल कोर्टाच्या अवॉर्डप्रमाणे कामगारांचे पगार वाढवून द्यावे लागले.

५. प्रेसला नफा होवो अगर तोटा होवो, कामगारांला ४ टक्के बोनस दिलाच पाहिजे, या हुकूमामुळे प्रेसचा तोटा वाढतच गेला.

६. १९६२ सालापासून चित्रशाळा प्रकाशनाची टेक्स्ट बुके सरकारी धोरणामुळे बंद झाली. त्यामुळे प्रकाशन विभागास मिळणारा फायदा कमी कमी होत चालला व प्रेसचे हुकमी काम कमी झाले. अशी परिस्थिती असतांना सुद्धां सरकारी कायद्याप्रमाणे कामगार कमी करता आले नाहीत व जरूर नसलेले कामगारही पोसावे लागले, व त्याचा परिणाम प्रेसचा तोटा वाढत जाण्याकडे झाला.

७. चित्रशाळा प्रेस ट्रस्ट पुढीलप्रमाणे मासिके चालवीत होता.

१. चित्रमय जगत्
२. शालापत्रक
३. ध्रुव
४. चित्रमय कृषीवल

ही मासिके कै. वासुकाका जोशी यांनी आपल्या मृत्युपत्रांत दिग्दर्शित केल्यामुळे विशिष्ट ध्येय-धोरणानेच चालवावी लागत होती. प्रेस ट्रस्टला त्यामुळे तोटाच सोसावा लागला.

"पोलिटिकल एज्युकेशन" जनतेला देण्याचे ध्येय पुढे ठेवून व नफ्याची दृष्टी न ठेवता ही मासिके चालविण्याने ट्रस्टने सामाजिक कार्यच केले, असे मासिकांच्या बाबतींत समजण्यात आले पाहिजे व त्या दृष्टीने त्याचा विचार झाला पाहिजे. मासिकांच्या बाबतीत झालेला तोटा हा ट्रस्ट ॲक्टिव्हिटीजवरच झालेला खर्च आहे, असे समजून त्याचा विचार व्हावा.

८. "केतकी पंचांगा" बद्दल मृत्युपत्रांत असा स्पष्ट आदेश आहे की, हे पंचांग ट्रस्टने नफानुकसानीकडे न पहाता चालू ठेवावे. म्हणून ते तोट्यात असले तरी दर वर्षी प्रसिद्ध करण्यांत येते.

९. चित्रशाळा प्रेस ट्रस्टचे एक विश्वस्त श्री. व. ग. देवकुळे यांचे ट्रस्ट बोर्डाशी वागण्याचे धोरण पहिल्यापासूनच विरोधी होते. त्यांनी कधीही समंजसपणाचे मिळतेजुळते धोरण ठेवले नाही. त्यामुळे हा ट्रस्ट

नुकसानीत आला. देवकुळे यांच्याविरुद्ध चॅरिटी कमिशनरकडे अनेक वेळा तक्रार अर्ज करूनही त्याचा उपयोग झाला नाही.

व. ग. देवकुळे यांचे बंधु अ. ग. देवकुळे यांनी त्या वेळचे प्रकाशन विभागाचे मॅनेजर डी. पी. रानडे व प्रेसचे मॅनेजर डी. टी. जोशी यांच्याविरुद्ध खोटे आरोप लादून पोलिसांत तक्रार केली. हे प्रकरण दोन वर्षे चालून एक पैचीही अफरातफर झाली नाही असे ठरले. मात्र याचा परिणाम असा झाला की, प्रकाशन खात्याचे मॅनेजर डी. पी. रानडे यांचा प्रकाशन विभाग चालविण्याचा व तो वाढविण्याचा उत्साह पार मावळला. त्यामुळे चित्रशाळा प्रकाशनाची पुस्तके काढण्याचे काम थांबले. त्याचा परिणाम प्रकाशनांकडून मिळणारा फायदाही कमी झाला. त्याच वेळी महागाई वाढून कागदाच्या किंमती वाढल्या. १९६३ साली डी. पी. रानडे चित्रशाळा सोडून गेले. रानडे गेल्यामुळे त्यांनी आणलेली नवीन प्रकाशने ते आपल्या बरोबर घेऊन गेले. त्यामुळे चित्रशाळा प्रकाशन विभाग डबघाईस आला.

१०. १९६० ते १९७१ सालापर्यन्त (१९६० व १९६२ ही दोन वर्षे सोडून) चित्रशाळा प्रेसला सतत तोटा येत गेला हे जरी खरे असेल तरी मुळात प्रेस ट्रस्टवर पुराची जी दैवी आपत्ती आली ती तोट्यास कारणीभूत आहे हे विसरून चालणार नाही. हा तोट्याचा कालखंड सोडला तर १९५२ ते १९६२ हा कालखंड चित्रशाळा प्रेस ट्रस्टला फायद्याचाच झाला. यांत वरील दोन्ही विभागांत (१९५३ साल वगळून) सतत फायदाच झालेला आहे. हे सोबत जोडलेल्या हिशेबाच्या तक्त्यांवरून दिसून येईल.

१९५२ ते १९६२ या दहा वर्षांतील नफ्याचे आकडे नफा-तोटा पत्रकावरून पाहता पुढीलप्रमाणे दृष्टीस पडतील :

प्रेसचा एकूण नफा	: रु. ३५,१८५–००
प्रकाशनाचा एकूण नफा	: रु. १,९०,६७५–००

११. कै. वासुकाका जोशी १९४४ साली वारले व चित्रशाळा प्रेस ट्रस्ट १९४९ मध्ये रजिस्टर झाला. त्या वेळी प्रकाशनांची दर्शनी किंमत पुढीलप्रमाणे होती :

१९४८ बुक-स्टॉक रु. १,२३,८७१
१९७१ ,, रु. ३,३८,६३०

याचा अर्थ चित्रशाळा प्रेस ट्रस्टने सुमारे ५ लक्ष रुपयांचा स्टॉक फेस व्हॅल्यूने २५ वर्षांत वाढवून प्रेस ट्रस्टच्या जिंदगीत भरच घातली. (कॉस्ट प्राईसच्या अडीच पट फेस व्हॅल्यू असते.)

१२. चित्रशाळा प्रेस ट्रस्ट झाला त्या वेळी प्रेसची प्रिंटिंग मशिनरी जवळ जवळ जुनी झाली होती. आम्ही ट्रस्ट चालविण्यास घेतल्यानंतर पुढीलप्रमाणे नवीन मशिनरी विकत घेतली :

(१) अमेरिकन मिले मशीन (डेमी साईज)	....	रु. २५,०००
(२) डायमंड कटिंग मशीन	....	रु. १०,०००
(३) वॉर्निशिंग मशीन	....	रु. १०,०००
(४) जपानी प्रिंटिंग मशीन (डबल क्राऊन)	....	रु. १०,०००
(५) ट्रेडल (प्रिंटिंग – ऑटोमॅटिक)	....	रु. ७,०००
(६) प्रोसेस (झिंक कटर इ. इ.)	....	रु. ५,०००
(७) फाउंड्री (प्लेटिंग प्लँट इ. इ.)	....	रु. ५,०००
(८) ऑफसेट मशीन	....	रु. २०,०००

याशिवाय ५००० रु. किंमतीचा नवीन इंग्रजी टाईप विकत घेतला.

१९४४ साली प्रेसमध्ये २७ हजार रुपयांचा टाईप स्टॉक होता तो १९७१ मध्ये ४७ हजार रुपयांचा झाला.

या सर्व गोष्टींचा विचार करतां सुमारे ५ ते ५॥ लाखांचा फायदा ट्रस्टला झाला. दैवी आपत्ती आली नसती तर संस्था कधीच तोट्यात गेली नसती. या आपत्तीत आम्ही सरकारकडून कर्ज घेतले नाही, अगर सरकारने आम्हांला नुकसानभरपाई दिली नाही. या काळातही ट्रस्टी जागरूक होते व कारभारात कोठेही गैर प्रकार झाले नाहीत. परंतु परिस्थितीपुढे ट्रस्टींचा काही इलाज चालू शकला नाही.

१३. आणखी नवीन भांडवल घालण्यास व नवीन यंत्रसामग्रीची कारखान्यास जोड देण्यास आम्हाला शक्य झाले नाही. कारण यंत्रांच्या किंमती भरमसाट वाढलेल्या होत्या. तसे आम्ही केले असते तर संस्था अधिक कर्जात बुडाली असती. ती गोष्ट आम्ही होऊ दिली

नाही. शेवटी चित्रशाळा प्रेस ट्रस्टचा एकून ५ लक्ष रुपये तोटा दिसत असला तरी ट्रस्टींनी जी भर ट्रस्टच्या मिळकतींत घातली ती विचारांत घेता व आजच्या मालमत्तेची एकूण किंमत लक्षात घेता प्रेसला तोटा झाला असे म्हणता येणार नाही. १९४४ ते १९६८ पर्यंत श्री. डी. टी. जोशी हे मॅनेजर म्हणून प्रेसची व्यवस्था पहात होते. १९६९ नंतर व. ग. देवकुळे प्रेसचे मॅनेजर झाले. याचा अर्थ ट्रस्टच्या १९६९ पासूनच्या तोट्याला व. ग. देवकुळे हेच जबाबदार आहेत व तेच त्याचा खुलासा करतील.

दा. त्र्यं. जोशी

(**सोबत :** चित्रशाळेचा नफातोटा दर्शविणारी पत्रके जोडली आहेत.)

पत्रक पहिले

चित्रशाळेचा नफातोटा

साल	चित्रशाळा प्रेस रु. पै.	प्रकाशन रु. पै.
१९५२	+१,४७२–००	+११,४४१–००
१९५३	–९,४५६–००	+१०,९८९–००
१९५४	+१,३७४–००	+७,०६२–००
१९५५	+८,७३७–००	+८८,८८७–००
१९५६	+४,५०२–००	+१५,१९६–००
१९५७	+१,६५४–००	+१८,२९६–००
१९५८	+६,१११–००	+१८,०५९–००
१९५९	+७,०९२–००	+३०,१२०–००
१९६०	+३,१४३–००	+३०,६२६–००

या नऊ वर्षीत १९५३ साली प्रेस व प्रकाशन मिळून तोटाच झाला. मासिके कधीच फायद्यात चालली नाहीत. दर वर्षी त्यांना तोटाच येत राहिला. या

टीप :—नफा व तोटा दाखविण्यासाठी अनुक्रमे + व – ही चिन्हे वापरली आहेत.

नऊ वर्षांत चित्रशाळा प्रेसला एकूण रु. ३५,१८५–०० व प्रकाशनाला रु. १,९०,६७५–०० फायदा झाला. या दोघांच्या बेरजेतून मासिकांचा एकूण तोटा रु. १,१५,७०६–०० वजा केल्यास एकूण नफा रु. १,१०,१५५–०० झाला आहे असे दिसून येईल.

पत्रक दुसरे

चित्रशाळेचा नफातोटा

साल	चित्रशाळा प्रेस	प्रकाशन
	रु. पै.	रु. पै.
१९६१	– ४६,४४८–००	+२३,८००–००
१९६२	+ ४,९०५–००	+३०,०४२–००
१९६३	– ५०,९५८–००	–२४,६८०–००
१९६४	– ४२,९३४–००	(प्रेस व प्रकाशन एकत्र)
१९६५	– २८,६२२–९०	,,
१९६६	– २६,२०१–००	,,
१९६७	– ३४,७२१–००	,,
१९६८	– ४३,३३२–००	,,
१९६९	– ९,१९५–००	,,
१९७०	– २९,६०४–००	,,
१९७१	– ८३,३२७–००	,,

या अकरा वर्षांत १९६२ साल वजा केले तर चित्रशाळा प्रेस व प्रकाशन या दोन्ही संस्था तोट्यातच चालल्या. १९६४ साली या दोहोंचे एकीकरण करण्यात आले. मासिके प्रथमपासूनच तोट्यात चालली होती. म्हणून १९५० साली ध्रुव व 'आपली शेती' आणि १९६८ मध्ये चित्रमय जगत् ही मासिके बंद करण्यात आली. १९६० ते १९७१ या अकरा वर्षांत मासिकापोटी रु. १,४२,५०५–०० तोटा झाला. या अकरा वर्षांत चित्रशाळा प्रेस, प्रकाशन व मासिके या बाबतीत ५ लाख १८ हजार ३१४ रुपये तोटा झाला. गेली काही वर्षे चित्रशाळा प्रेस नुकसानीतच चालत होता, हे यावरून दिसून येईल.

पुरवणी खुलासा

टीप :– चित्रशाळा प्रेस ट्रस्टचे माजी सेक्रेटरी दा. त्र्यं. जोशी यांनी चॅरिटी कमिशनर यांना पाठविलेल्या खुलासेवार उत्तरात काही गोष्टींचा निर्देश करावयाचा राहिला आहे. म्हणून तो येथे पुरवणी म्हणून जोडण्यात येत आहे. — लेखक

१९४८ सालापासून चित्रशाळेचा प्रकाशन विभाग वेगळा करण्यात आला व त्याचे स्वतंत्र हिशेब ठेवण्यास सुरुवात केली. तोपर्यंत प्रेस व प्रकाशन यांचे एकत्रच हिशेब असत. " वासुकाका जोशी व त्यांचा काल " या पुस्तकापासून प्रकाशन विभाग स्वतंत्र करण्यात आला.

१९५२ ते १९७१ या वीस वर्षांतील आकड्यांची सूक्ष्म पहाणी केली तर असे कळून येईल की, चित्रशाळा प्रेसला प्रकाशन विभागाची जोड नसती तर मासिकांच्या द्वारा होणारा तोटा भरून काढणे अशक्यच झाले असते. प्रकाशन विभागाने मासिकांची तूट तर भरून काढलीच शिवाय प्रेसलाही सालोसाल आपल्या नफ्याचा वाटा दिला. चित्रशाळा प्रेसला स्वतंत्रपणे नफा असा थोडाच झाला. वास्तविक प्रेस व प्रकाशन ही दोन्ही खाती संयुक्त दाखवायला हवी होती व त्यांचा नफातोटा एकत्रच दर्शवावयाला हवा होता. ती वेगवेगळी दाखविल्यामुळे मासिकामुळेच जास्त तोटा झाला असा भास होतो. खरे पाहिले तर चित्रशाळा प्रेस व मासिके यांचा संबंध अविभाज्य आहे. ती वेगळी काढता येणार नाहीत. मासिकांमुळे चित्रशाळा प्रेसला काम मिळाले हे नाकारता येणार नाही. कंपोझिंग, छपाई, ब्लॉक मेकिंग, ड्रॉइंग, बायंडिंग इत्यादी विविध खात्यांतील कामगारांना मासिकांमुळे कामे मिळत गेली. मासिकांच्या संपादकांना अल्पवेतन असल्यामुळे त्यांच्या पगाराचा बोजा मासिकांवर पडला नाही. तेव्हां मासिकांच्या बाबतीत काही तोटा झाला असेल तर त्याला इतरही अनेक कारणे होती. कै. वासुकाकांच्या मृत्युपत्रानुसार त्यांचे धोरण चालविण्याची जबाबदारी संपादक व चालक यांच्यावर होती. ती त्यांनी एकनिष्ठेने पाळली. त्याचाही परिणाम मासिकांवर झाला असेल. प्रकाशन विभागामुळे फायदा झाला असे भासविले जाते. पण चित्रशाळा प्रेसचा फायदा प्रकाशनालाही झाला हे कबूल केलेच पाहिजे. मासिकांप्रमाणेच प्रकाशन विभागाच्या पुस्तकांमुळे चित्रशाळा कामगारांना काम मिळाले व प्रेसमुळे पुस्तके

निघू शकली. असा दोहोंचा अन्योन्याश्रयी संबंध आहे. प्रकाशन विभागाचे स्वतंत्र अस्तित्व मानल्यामुळे चित्रशाळा प्रेसला स्वतंत्र अस्तित्वच नाही, तो प्रकाशन विभागाच्या जिवावर चालला आहे, असा काहींचा ग्रह होण्याचा संभव आहे. पण तो खरा नाही. चित्रशाळा छापखाना, मासिके व प्रकाशन हे तिन्ही विभाग वेगवेगळे नाहीत; त्या सर्वांचा मिळून एक समवाय आहे आणि त्या दृष्टीनेच त्यांचे मूल्यमापन करणे यथायोग्य होईल.

पुरवणी

पृ. १७ वर 'शालापत्रक' मासिकाच्या शेवटी पुढील मजकूर समाविष्ट करावा :

'शालापत्रक' १९२९ साली मुलांचे मासिक झाल्यानंतर धों. स. कुलकर्णी व सि. वा. सुभेदार हे अनेक वर्षे संपादकीय काम पहात होते. पण ते सरकारी शिक्षक असल्यामुळे शालापत्रकावर संपादक म्हणून शंकर नरहर जोशी यांचेच नाव वर्षानुवर्षे छापले जात असे. पुढे १९४२ साली दा. पां. रानडे हे संपादक झाले व त्यांचे नाव मासिकावर येऊ लागले. संपादकीय कार्य करीत असतानाही ते चित्रशाळेच्या प्रकाशन खात्याचे व्यवस्थापक होते. त्यांनी अनेक नवीन पुस्तके प्रकाशित करून चित्रशाळेचा प्रकाशन विभाग ऊर्जितावस्थेला आणला, याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला पाहिजे. १९६२ साली रानडे चित्रशाळा सोडून गेल्यावर १९६८ पर्यंत दा. त्र्यं. जोशी आणि पुढे व. ग. देवकुळे शालापत्रकाचे संपादक झाले. त्यानंतर भालचंद्र पवार यांच्या संपादकत्वाखाली काही अंक निघाले व डिसेंबर १९७४ च्या अंकानंतर शालापत्रक बंद झाले.